सोलापूर तरुण भारत
आसमंत



# महाराष्ट्र आता थांबणार नाही!

**हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी, राज्यातील महायुती सरकारने तब्बल ३५ हजार, ७८८.४० कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या तर मंजूर केल्याच, त्याशिवाय धर्मांतरविरोधात कायदा आणण्याचे सूतोवाचदेखील केले. त्यामुळे विकास असो वा हिंदुत्वाचा मुद्दा, महायुती सरकारच्या उक्तीनुसारच महाराष्ट्र आता थांबणार नाही! हेच सरकारने अधोरेखीत केले आहे.**

### लक्ष्यवेध

**प्रतिनिधी**

नागपूर येथे सुरू असलेल्या, राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात पहिल्याच दिवशी तब्बल ३५ हजार, ७८८.४० कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मंजूर करण्यात आल्या. यामध्ये विधानसभा निवडणुकीत महत्त्वाची भूमिका बजावलेली 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' या योजनेसाठी १ हजार, ४०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. याशिवाय, 'मुंबई मेट्रो ३' साठी ६५५ कोटींची अतिरिक्त तरतूद करण्यात आली आहे. त्याचवेळी, राजकोट येथील शिवरायांच्या पुतळ्यासाठी राज्य सरकारकडून ३६ कोटी रुपये देण्यात येणार आहेत. एकूण पुरवणी मागण्यांपैकी सर्वाधिक म्हणजेच ७ हजार, ४९०.२४ कोटी रुपयांचा निधी हा सार्वजनिक बांधकाम विभागाला देण्यात येणार असून, त्यापैकी ३ हजार, १९५ कोटी रुपये हे केंद्र सरकारकडून राज्य सरकारला बिनव्याजी देण्यात आले आहेत. हा निधी इमारती, रस्ते आणि पूल बांधण्यासाठी होणार आहे. त्याशिवाय शेतकऱ्यांना मोफत वीजपुरवठा, साखर कारखान्यांना आर्थिक मदत करण्यासाठी, दूध उत्पादक शेतकऱ्यांना अनुदान देण्यासाठीही भरीव निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्याशिवाय, गडकिल्ल्यांवर मद्यपान करणाऱ्यांना आता एक लाख रुपयांच्या दंडाची तरतूद करण्यात आली आहे, तर धर्मांतरबंदी विरोधात कायदा आणण्याचे सूतोवाच करण्यात आले आहे.

महाराष्ट्रात महायुती सरकारने लाडक्या बहिणींसाठी योजना सादर केल्यानंतर, सर्वच विरोधी पक्षांनी त्याविरोधात भूमिका घेतली. ही योजना विधानसभेत महत्त्वाची ठरणार असल्याचे लक्षात आल्यानेच, उद्धव ठाकरे, शरद पवार यांच्यापासून काँग्रेसने त्याविरोधात अपप्रचार केला. महायुती सरकार या योजनेसाठीची तरतूद कशी करणार, असा प्रश्न उपस्थित करण्यापासून ते 'आमचे सरकार आल्यानंतर, महायुतीच्या सर्वच योजना थांबवण्यात येतील,' असेही मविआच्या नेत्यांनी जाहीरसभांमध्ये म्हटले. तथापि, 'लाडकी बहीण योजना' लोकप्रिय ठरते आहे, हे लक्षात येताच ज्या पक्षांनी यासाठीचा निधी कसा आणणार, असा प्रश्न उपस्थित केला होता, त्यांनीच १ हजार, ५०० ऐवजी तीन हजार रुपये दरमहा देण्याचे आश्वासन आपल्या जाहीरनाम्यातून दिले. आता पुन्हा एकदा या योजनेसाठी स्वतंत्र निधी ठेवण्याचे काम महायुती सरकारने मंत्रिमंडळाचा शपथविधी झाल्यानंतर लगेचच केले आहे. निवडून आल्यानंतर महायुती सरकार ही योजना बंद करेल, असा अपप्रचार करणाऱ्या विरोधकांना ही चपराकच.

पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी देण्यात आलेला भरीव निधी, राज्यातील पायाभूत सुविधांचे जाळे कसे विस्तारेल, याची काळजी घेणारे ठरते आहे. शेतकरी बांधवांना मोफत वीज देण्याचा जो निर्णय मागील कार्यकाळात घेण्यात आला होता, तो आताही सुरू राहणार आहे. त्याचवेळी दूध उत्पादक शेतकरी सध्या आर्थिक संकटात सापडला आहे. मागणीअभावी दुधाचे संकलन कमी झाल्यानंतर, राज्यातील दूध उत्पादक संघांनी दुधासाठीच्या दरात जवळपास तीन रुपये इतकी कपात केली असल्याने, दूध उत्पादक अडचणीत आले आहेत. त्यांना आर्थिक साहाय्य करण्यासाठीही या सरकारने निधी राखून ठेवला आहे. एकूणच, राज्यातील उद्योजक, शेतकरी, कामगार, मध्यमवर्ग या साऱ्यांसाठीचे हे सरकार आहे, असा संदेश पुरवण्या मागण्यांतून देण्यात देवेंद्र फडणवीस यांचे सरकार यशस्वी ठरले आहे.

महाराष्ट्रातील जनतेने २०१९ सालानंतर उद्धव ठाकरे यांनी जेव्हा राज्यातील जनतेने दिलेला स्पष्ट जनादेश नाकारत, काँग्रेस-राष्ट्रवादी यांचे पाय पकडत स्वतः मुख्यमंत्री होण्यासाठी हिंदुत्व खुंटीवर टांगत भाजपच्या विरोधात जात सरकार स्थापन केले, तेव्हा राज्यातील जनतेने सरकार कसे नसावे, हे अनुभ 'स्थगिती सरकार' असा लौकिक उद्धव ठाकरे यांच्या सरकारचा झाला होता. 'ब्रह्मांडातील बेस्ट सीएम' असे त्यांनी स्वतःला म्हणवून घेतले, असले तरी प्रत्यक्षात 'कोमट सल्ले' आणि 'टोमणे मारणारे मुख्यमंत्री' म्हणून उद्धव यांना जनता सदोदित लक्षात ठेवेल. आदित्य याचा बालहट्ट पुरवण्यासाठी आरे येथील मेट्रो कारशेड हलवण्याचा निर्णय तर त्यांनी घेतला. परिणामी, 'मेट्रो-३' प्रकल्पाची किंमत त्यांनी सुमारे दहा हजार कोटींनी वाढवली.

उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांच्या राजकीय महत्त्वाकांक्षेतून राज्याच्या बोकांडी बसवलेल्या या महाभकास आघाडी सरकारमुळे राज्य कित्येक वर्षे मागे गेले. ठाकरे यांचे 'वसुली सरकार' असा लौकिक झाल्यामुळे राज्यातील उद्योग बाहेरच्या राज्यात स्थलांतरित झाले. उद्योगपती अंबानीही यांच्या तावडीतून सुटले नाहीत. त्यांच्याच निवासस्थानाखाली स्फोटके ठेवली गेली. हा सगळा इतिहास पुन्हा सांगण्याचे कारण इतकेच की, अशा स्थगिती सरकारपासून राज्यातील जनतेला दिलासा देण्याचे काम महायुती सरकारने केले. ज्या 'मेट्रो' प्रकल्पाला ठाकरे यांनी स्थगिती दिली. त्याच 'मेट्रो' प्रकल्पासाठी महायुती सरकारने पहिल्याच दिवशी निधी मंजूर केला.

महायुती सरकार हे कार्यक्षम आणि गतिमान सरकार आहे, हे गेल्या अडीच वर्षांत स्पष्ट झाले आहेच. विदेशातून गुंतवणूक आणण्यापासून ते राज्यातील उद्योगांना चालना देण्याचे काम असो,

महायुती सरकारने आपल्या कामाचा झपाटा दाखवून दिला आहे. म्हणूनच, महायुती सरकारकडून जनतेला मोठ्या अपेक्षा आहेत. फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पहिल्या दिवसापासूनच या नव्या सरकारने कृतिशील अजेंडा राबवत, येत्या पाच वर्षांच्या काळात हे सरकार कसे काम करेल, याची झलक दाखवली आहे, असेही म्हणता येईल. महाराष्ट्राला लाभलेले हे कार्यक्षम सरकार पूर्ण क्षमतेने कार्यरत झाले आहे. (पान ४ वर)

# कळवळा नव्हे ढोंग!

**नुकतेच प्रियांका गांधी- वाड्रा लोकसभेत पॅलेस्टाईनच्या समर्थनार्थ संदेश असलेली बॅग खांद्यावर मिरवत दाखल झाल्या. पॅलेस्टाईन-गाझामध्ये इस्रायलकडून होणाऱ्या मानवी हक्कांच्या हननाविरोधात निषेधासाठीचा प्रियांका वाड्रांनी निवडलेला हा मार्ग असल्याचा कांगावा केला केला. कारण, शेवटी प्रश्न भारतातील मुस्लीम मतपेढीला खुश करण्याचा! त्यासाठी पॅलेस्टाईनचे समर्थन करणे हे प्रियंकासाठी क्रमप्राप्त होतेच. तेव्हा नवीन खासदार झालेल्या प्रियांका वाड्रा यांनी मुद्दाम पॅलेस्टाईनच्या झेंड्यातील रंगांची बॅग घेऊन त्या लोकसभेत दाखल झाल्या. तर नागपूर येथे शिवसेना उबाठाचे नेते उद्धव ठाकरे यांनी आपण लोकशाही, संविधानाचे रक्षक असल्याचा कळवळा दाखविला असला तरी प्रियंका व ठाकरे यांचा हा कळवळा नसून प्रसिध्दीसाठीचे ढोंग असल्याचे स्पष्ट होते.**

### वेधक

**विजय कुलकर्णी**

प्रियांका वाड्रांनी पॅलेस्टाईनच्या झेंड्यातील रंगांची बॅगेसह लोकसभेत प्रवेश केला तेव्हा अपेक्षेप्रमाणे माध्यमांच्या कॅमेऱ्यांनीही त्यांची ही बॅग टिपली आणि त्यावर प्रियांका यांनी पॅलेस्टाईनच्या समर्थनार्थ आपली भूमिका विशद केली. त्यांच्या या कृत्यामुळे भारतातील पुरोगामीच नव्हे, तर थेट पाकिस्तानच्या माजी मंत्र्याकडूनही त्यांच्यावर स्तुतिसुमने उधळण्यात आली. प्रियाकांच्या या बॅगबाजीवर भाजपनेही सडकून टीका केली. परिणामी, काल प्रियांका यांनी बॅग बदलली आणि 'बांगलादेश के हिंदूओ और ईसाइयों के साथ खडे हो' अशा संदेशाची दुसरी बॅग झळकावली.

संसदेत बोलतानाही एका वाक्यात मोदी सरकारने बांगलादेशातील हिंदू-ख्रिश्चन या अल्पसंख्यांकांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात आवाज उठवावा, अशी मागणी त्यांनी केली. त्यामुळे बांगलादेशमधील हिंदूवरील अत्याचारांच्या प्रश्नांवर अवघ्या दोन ओळींची तोंडदेखली भूमिका मांडण्यासाठी काँग्रेसला इतका विलंब लागला. परवा पॅलेस्टाईनची बॅग झळकवत, तर काल हिंदूंच्या समर्थनार्थ बॅग दाखवली की, आपण किती सेक्युलर आहोत, हे दाखवण्याचाच खरं तर हा सगळा केविलवाणा खटाटोप. जर बांगलादेशमधील प्रश्नाबाबत काँग्रेस पक्ष खरोखरीच इतका गंभीर होता, तर मग काँग्रेसने कार्यकर्त्यांना याआधीच हा मुद्दा घेऊन रस्त्यावर निदर्शने, आंदोलनांसाठी का उतरवले नाही? कार्यकर्त्यांचे सोडा, पण लोकसभेतील विरोधी पक्षनेते असलेले राहुल गांधी यांनी याविषयी अवाक्षरही उच्चारले का? त्यामुळे हा बांगलादेशातील हिंदूप्रति काँग्रेसला आलेला कळवळा नव्हे, तर केवळ सेक्युलरपणाचे ढोंग असल्याचे स्पष्ट दिसले. (पान ४ वर)




### समाजभान

**नि. कर्नल अनिल आठल्ये**
ज्येष्ठ अभ्यासक

गेल्या काही महिन्यांपासून देशामध्ये विरोधी पक्षांनी काही ना काही कारणे देऊन आंदोलने आणि अराजकाची स्थिती निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू ठेवला आहे. या आंदोलनांदरम्यान सरकारला लक्ष्य करण्यासाठी पाश्चिमात्य सरकारे, तेथील प्रसारमाध्यमे आणि गैरसरकारी संघटनांच्या हवाल्यावर सर्व भिस्त असते. आजही आपल्या देशातील अनेक लोकांसाठी पाश्चिमात्य देशांमधून आलेली बातमी म्हणजे जणू वेदवाक्यच...!

जवळपास १०० वर्षांपूर्वी म्हणजेच ऑक्टोबर १९३१ मध्ये बंगालमधील प्रसिद्ध तत्त्ववेत्ते कृष्णचंद्र भट्टाचार्य यांनी 'विचारांचे स्वराज्य' नावाचा एक महत्त्वपूर्ण लेख लिहिला होता. त्यात ते म्हणतात, 'राजकारणाच्या क्षेत्रात भारतीयांना आत्ता कुठे आपण पाश्चिमात्य देशांच्या तत्त्वनिष्ठतेवर भोळसटपणाने विश्वास ठेवत असल्याची थोडीफार समज येत आहे. आपल्याला कळलेच नाही की, ही सर्व तत्त्वे आणि न्यायोचित भूमिका फक्त आपापसातील संबंधांपुरती मर्यादित होती. भारतीयांना 'पॉवर' आणि त्याच्याभोवती फिरणारे खरे जागतिक राजकारण याबाबत अत्यंत अंधुक जाणीव आहे. मात्र, आज २१ व्या शतकातही या मनोवृत्तीमध्ये फार बदल झालेला नाही. आपल्या देशातील अनेक इंग्रजाळलेले लोक पाश्चिमात्य अहवाल, बातम्या यावरच डोळे झाकून विश्वास ठेवून स्वकीयांवरुद्ध मते बनवतात. या सर्व पाश्चिमात्य प्रयत्नांमागे जागतिक सत्तासंतुलन आपल्या बाजूला ठेवण्याची धडपड अशा मंडळींना दिसतच नाही. काही उदाहरणे देऊन हे सर्व वास्तव वाचकांपुढे मांडण्याचा प्रयत्न आहे. पुरावे बघून वाचकांनीच मत बनवावे हे उत्तम.

१९९० च्या दशकात शीतयुद्ध समाप्तीनंतर अमेरिकेच्या नेतृत्वाखाली पाश्चिमात्य देशांनी जगभर सत्ताबदलाचा एक मोठा प्रयोग आरंभला. शीतयुद्ध काळात सोव्हिएत रशियाच्या जवळच्या असणाऱ्या सर्व देशांना या प्रयत्नात लक्ष्य केले गेले. अशा प्रकारे पूर्व आणि मध्य युरोपमधील अनेक देशांमध्ये सत्ताबदल घडवून पश्चिमधार्जिणी सरकारे स्थापन केली गेली. मध्यपूर्वेतही लिबिया, इजिप्त, इराक, अल्जेरिया इत्यादी देशांमध्ये अंतर्गत अराजकाचा शस्त्र म्हणून उपयोग करून सत्ताबदल घडवून आणला गेला. या रणनीतीमध्ये सर्वप्रथम निवडणुकांच्या निकालांवर प्रश्नचिन्ह उभे केले जाते. त्याचबरोबर न्यायपालिका आणि इतर सरकारी संस्थादेखील पक्षपाती असल्याचा गवगवा केला जातो. त्यानंतर देशात रस्त्यारस्त्यावर हिंसाचार घडवून आणत सरकारला पायउतार होण्यास भाग पाडले जाते. अलिकडेच अशा प्रकारचा प्रयोग अमेरिकेने आपल्या शेजारील बांगलादेशमध्ये यशस्वीपणे राबविला. तेथील विरोधी पक्षांनी निवडणुकांवर बहिष्कार घातला आणि नंतर सरकारवर निवडणुका निष्पक्ष घेतल्या नसल्याचा आरोप केला. तद्नंतर देशाच्या मोठ्या शहरांमध्ये दंगे घडवून सरकारला राज्य करणे कठीण करून टाकले. याआधी इराकमध्ये अण्वस्त्रे आहेत, अशा खोट्या बातम्या पसरवून अमेरिकेने तेथे आक्रमण केले आणि सद्दाम हुसेनचे सरकार उलथवून टाकले. आज सत्य बाहेर आल्यानंतर स्पष्ट झाले आहे की, इराककडे अण्वस्त्रे नव्हती. म्हणजेच अण्वस्त्रांचा बहाणा पुढे करून अमेरिकेने इराकवर आक्रमण केल्याचे उघड आहे. या प्रक्रियेमध्ये संपूर्ण पाश्चिमात्य प्रसारमाध्यमे, गैरसरकारी संघटना अशा सर्वांची अमेरिकेला साथ होती.

आज पाश्चिमात्य न्यायसंस्थांबद्दल अनेक भारतीयांना मोठा पुळका आला आहे. मात्र, आजच्या पिढीला माहिती नसेल की, ब्रिटिश काळातही त्यांची न्यायव्यवस्था दोन्ही बाजूंचे पक्ष भारतीय असतील तरच निष्पक्ष होती. एखाद्या गुन्ह्यामध्ये इंग्रजांचा सहभाग असला, तरी भारतीयांना कधीही न्याय दिला गेला नाही. याच कारणामुळे हुतात्मा अनंत कान्हेरे यांनी नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याचा वध केला होता. त्याचे झाले असे की, एका निष्पाप शेतकऱ्याने चुकून गोल्फचा चेंडू उचलला असता तिथे असणाऱ्या इंग्रजांनी त्याची निर्घृण हत्या केली. मात्र याच जॅक्सनसाहेबांनी त्या इंग्रजांना शिक्षा करण्याऐवजी निर्दोष सोडले. इंग्रजांच्या या कृत्याचा सूड उगवण्यासाठी अनंत कान्हेरे यांनी जॅक्सनचा वध केला. या केवळ जुन्या गोष्टी आहेत असे नाही. अगदी १० वर्षांपूर्वी पाकिस्तानी वंशाची आफिया सिद्दिकी नावाची शास्त्रज्ञ अमेरिकेद्वारे कैद केली गेली होती. प्रथम तिला पाच वर्षे एकांतवासात ठेवले गेले. तीन-चार वर्षे वयाच्या मुलांना तिच्यापासून वेगळे केले गेले. अखेरीस २०१० च्या फेब्रुवारीमध्ये आफियावर अमेरिकन सैनिकावर गोळी झाडल्याचा आरोप करून ८६ वर्षे कारावासाची शिक्षा ठोठावली गेली. खरे तर पाच वर्षे एकांतवासात राहिल्यानंतरच आफियाची तब्येत इतकी खराब झाली होती की, तिला धड उभेही राहता येत नव्हते. अशा परिस्थितीतही तिने अमेरिकन सैनिकावर गोळी झाडल्याच्या कपोलकल्पित आरोपावरून अमेरिकन न्यायाधीशाने तिला ही शिक्षा दिली. ही दोन उदाहरणे द्यायचे कारण म्हणजे एक लक्षात ठेवायला हवे की, पाश्चिमात्य न्यायव्यवस्था देशांतर्गत गुन्ह्यांबाबत निष्पक्ष असते; परंतु कोणत्याही तथाकथित गुन्ह्यामध्ये परकीय व्यक्ती वा दुसरा देश सहभागी असल्यास अमेरिकन न्यायसंस्था केवळ अमेरिकेच्या हिताचेच काम करते. आज अमेरिकन न्यायव्यवस्था, तेथील प्रसारमाध्यमे आणि काही गैरसरकारी संघटना अदानींच्या कंपन्यांना लक्ष्य करीत आहेत. अदानींच्या कंपनीने भारतामध्ये लाच देण्याचा कट रचल्याचा आरोप केला गेला आहे. प्रत्यक्षात लाच दिली गेली की नाही, ती कोणाला दिली गेली, किती दिली गेली हे सर्व गुलदस्त्यातच आहे. मात्र इथे वाचकांना आठवण करून द्यावीशी वाटते की, १९९३ मध्ये महाराष्ट्रात एन्रॉन कंपनी वीज केंद्र उभे करण्यासाठी आली असता कंपनीच्या सर्वेसर्वा रिबेका मार्क यांनी उघडपणे त्यांच्या कंपनीने भारतीय अधिकाऱ्यांचे मन वळवण्यासाठी दोन कोटी डॉलर्स दिले असल्याचे मान्य केले होते. नंतर ही कंपनी दिवाळखोरीत निघाली ही बाब वेगळी, पण त्यावेळी त्यांच्यावर अमेरिकेत कोणताही खटला चालल्याचे ऐकिवात नाही. बांगलादेशमध्ये सत्ताबदलामागे अमेरिका असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यानंतर अदानींच्या कंपनीने वीज बिल थकले असल्याने बांगलादेशला वीज देणे बंद केले. त्यामुळे अमेरिकेने बांगलादेशमध्ये बसवलेले बाहुले सरकार अडचणीत आले. अमेरिकेच्या दृष्टीने यापेक्षाही धोक्याची घटना म्हणजे अडाणी आणि एल.बीट नावाच्या इस्रायली कंपनीने मिळून अत्याधुनिक ड्रोन तयार केले आहेत. हे ड्रोन हैदराबादमध्ये बनवले जात आहेत. त्यातून अमेरिकेला भविष्यकाळात आपला शस्त्रास्त्रांचा बाजार गमावण्याची भीती वाटत आहे. या सर्व कारणांमुळे अमेरिका अडाणींच्या कंपन्यांना लक्ष्य करत आहे. अमेरिका आपल्या हिताच्या दृष्टीने हे सर्व करत असल्याचे स्पष्ट असले, तरी काही भारतीय त्यांचीच री ओढत आपल्या देशातील उद्योगपतीच्या विरोधात जातात, हे अनाकलनीय आहे. अमेरिका वा फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष भारतभेटीवर आले असता त्यांनी आपापल्या देशातील 'बोईंग' वा 'एअर बस' या कंपन्यांना भारतात आपला माल विकणे सुकर होण्यासाठी इथल्या राज्यकर्त्यांशी प्रत्येक वेळी बोलणी केली आहेत. सर्व भारतीय प्रसारमाध्यमांमध्ये या गोष्टी चवीने लिहिल्याही जातात. पण भारतीय पंतप्रधानांनी भारतीय उद्योगांना परदेशात भांडवल गुंतवणुकीसाठी मदत केल्यास मात्र या मंडळींची आग मस्तकाला जाते. हे सर्वच एक गौडबंगाल आहे. (पान ४ वर)

**सध्या देशात अनेक अशांत केंद्रे असून जागतिक पातळीवर अराजकता निर्माण करण्यात काही देशांचा पुढाकार स्पष्टपणे दिसतो. जगात हे सर्व घडत असताना पाश्चिमात्य देश भारतातदेखील अराजक माजवून प्रगतीमध्ये खीळ घालण्याचा प्रयत्न करीत आहेत. भारतीयांनी हे ओळखणे गरजेचे आहे. देशहितापुढे सरकारी पक्ष वा विरोधी पक्षामध्ये मतभेद असणे आता अजिबात परवडणारे नाही.**



# कटकारस्थान ओळखणे गरजेचे

राष्ट्ररक्षा

ब्रि. हेमंत महाजन
भ्र. ९०९६७०१२५३

# दक्षिण कोरिया, युरोप, चीन जपानची घटती लोकसंख्या; भारताकरिता प्रचंड संधी

चीनच्या लोकसंख्येत अनुकूल धोरणानंतरही घट चीनची लोकसंख्या २०२३ मध्ये २८ लाखांनी घटली. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक संख्येचे वाढते प्रमाण आणि उत्पादनक्षम लोकसंख्येचे घटते प्रमाण असे आर्थिक संकट चीनपुढे उभे आहे. यापूर्वी देशात लोकसंख्या आणिबाणी घोषित करण्यात आली होती. कारण लोकसंख्या घटल्याने देशात दीर्घकाळपर्यंत श्रमशक्ती कमी होण्याची भीती आहे. वृद्ध लोकसंख्येने अर्थव्यवस्थांसमोर आव्हान उभे केले असताना आरोग्यसेवा आणि इतर सामाजिक सुरक्षा खर्च यांवर आर्थिक भार वाढत आहे.

लोकसंख्येचा दर घटला; चीनवर आर्थिक परिणाम चीनची अर्थव्यवस्था जगातील दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था मानली जाते. मात्र, लोकसंख्येचा दर घटत असल्याने २०३० च्या पुढे हा लोकसंख्याशास्त्रीय ताण चीनच्या अर्थव्यवस्थेवर परिणाम करणार आहेत. चीनमध्ये कमावत्या नागरिकांची संख्या २०१२ पासून घसरत चालली आहे. या शतकात १५ ते ६४ वयोगटातील चिनी नागरिकांची संख्या ६० टक्क्यांपेक्षा कमी होण्याची शक्यता आहे. बेरोजगारी आणि कमावत्या नागरिकांची घटती संख्या यामुळे उत्पादन व बांधकाम क्षेत्रांत कमालीचा सुस्तपणा आला आहे. ही दोन्ही क्षेत्रे अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची आहे.

दक्षिण कोरिया गंभीर संकटात एकेकाळी वेगवान आर्थिक वाढ, आधुनिकीकरणासाठी प्रसिद्ध असलेल्या दक्षिण कोरियातील जन्मदर वेगाने कमी होत आहे. २०२३ पासून प्रजनन दरात दिवसेंदिवस घट होत आहे. शतकाच्या अखेरपर्यंत देशाची लोकसंख्या सध्याच्या लोकसंख्येपेक्षा एक तृतीयांशपर्यंत कमी होऊ शकते. घटत असलेला जन्मदर बघता दक्षिण कोरिया हा देश लवकरच पृथ्वीवरून गायब होऊ शकतो. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी दक्षिण कोरियाचे सरकार घटत्या जन्मदराच्या समस्येचा सामना करण्यासाठी पालकांना जन्मलेल्या प्रत्येक मुलासाठी १०० दशलक्ष वॉन रोख देण्याचा विचार करत आहे. हा प्रस्तावित निधी कमी जन्मदराच्या समस्येसाठी समर्पित राष्ट्रीय अर्थसंकल्पाच्या अंदाजे अर्धा भाग असेल; जे वार्षिक सुमारे ४८ ट्रिलियन वॉन आहे.

सध्या दक्षिण कोरियामधील पालकांना त्यांचे मूल सात वर्षांचे होईपर्यंत विविध प्रोत्साहने आणि समर्थन कार्यक्रमांच्या माध्यमातून ३५ दशलक्ष वॉन आणि ५० दशलक्ष वॉन मिळतात. दक्षिण कोरियाने जन्मदर वाढविण्यासाठी विविध उपाययोजना सुरू केल्या आहेत. जसे की, बालसंगोपनासाठी परदेशी कामगारांची भरती करणे, कर सवलती देणे आणि ३० वर्षांच्या वयापर्यंत तीन किंवा त्याहून अधिक मुले असलेल्या पुरुषांना लष्करी सेवेतून सूट देणे. परंतु, या प्रयत्नांचा आतापर्यंत मर्यादित परिणाम झाला आहे. जगाची घटती लोकसंख्या भारताकरिता एक प्रचंड संधी केवळ दक्षिण कोरियाच नाही तर युरोप, चीन आणि जपानमध्येही प्रजनन दर मोठ्या प्रमाणात घटला आहे. चीनमधील प्रजनन दर २०२२ मध्ये १.०९ आणि जपानमधील जन्मदर १.२६ या विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचला आहे.

जपानमध्ये २०२३ मध्ये जन्माच्या संख्येपेक्षा मृत्यू झालेल्यांची संख्या दुप्पट असल्याची नोंद करण्यात आली आहे. युरोप, कोरिया, चीन, जपानच्या घटत्या लोकसंख्येचा परिणाम जगाच्या अर्थव्यवस्थेवरही होत आहे. मात्र, भारताकरिता ही एक प्रचंड संधी आहे. अनेक वर्षांपासून काम करू शकणाऱ्यांची संख्या अधिक असल्याने जगातील अनेक देशांसाठी भारतामधून कर्मचारी वा कामगार पुरविले गेले होते. भारतातील कमावत्या वयाची लोकसंख्या जागतिक आर्थिक प्रक्रियेला गती देत आहे. कमी खर्चात उपलब्ध होणाऱ्या मजुरांच्या बळावर उत्पादित होणारा माल जगभरात निर्यात केला जातो. मात्र, आता जगभरात लोकसंख्यावाढीचा दर घटत असल्याने कमावत्या वयाची लोकसंख्या कमी होत आहे व कारखान्यातील मजुरांची संख्याही मोठ्या प्रमाणात घटली आहे. त्यामुळे महागाई वाढत आहे.

अमेरिकेसह अनेक विकसित देश आयात केल्या जाणाऱ्या वस्तूंवर अवलंबून आहेत. मजुरांच्या खर्चात वाढ झाल्याने या देशांमध्ये महागाई वाढण्याची शक्यता आहे. चीनमध्ये कामगारांच्या वाढत्या खर्चाचा सामना करावा लागत असल्याने बऱ्याच कंपन्यांनी चीनमधून काढता पाय घेत भारतासारख्या देशांत आपला मोर्चा वळविला आहे. याशिवाय आज युरोप, आखाती देशांमध्ये आणि अनेक ठिकाणी युद्ध सुरू आहे. खास तर



युक्रेनइस्रायलमध्ये. तिथे मोठ्या प्रमाणात पुनर्बांधणी करण्याकरिता वेगवेगळ्या श्रमजीवींची गरज आहे. ही गरज भारतच पूर्ण करू शकतो. याचा पुरेपूर फायदा आपण उठवला पाहिजे.

प्रगत देशांमध्येसुद्धा वेगवेगळी कौशल्य असलेल्या श्रमजीवींची गरज आहे. त्या त्या देशांना लागणारे कौशल्यपूर्ण कामगारांचे भारतात ट्रेनिंग देऊन, आपण या देशांची गरज पूर्ण केली पाहिजे. त्याचा फायदा आपल्या तरुणाईला होईल. 'लोकसंख्या लाभांश' घेण्यासाठी घटत्या लोकसंख्येचे संकट भारतात पुढच्या काही वर्षांत येण्याची शक्यता आहे. त्यावर गंभीर विचार जरूरी आहे.

सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांने, देशातील घटता जननदर ही चिंताजनक बाब असून तो विशिष्ट मर्यादेखाली राहिला तर संबंधित लोकसमूहच नष्ट होऊ शकतो, असा इशारा दिला आहे. व्यापक अर्थाने घटता जननदर आणि त्या अनुषंगाने घटती लोकसंख्या हे आव्हान भारतासमोर येणार आहे. प्रगत देशांमध्ये स्त्रियांना मिळणाऱ्या स्वातंत्र्यामुळे मूल जन्माला घालण्याविषयी त्यांच्या मताला प्राधान्य आले. एकीकडे नोकरी, व्यवसाय, छंद अशा अनेक क्षेत्रांमध्ये स्वत:ला सिद्ध करण्याचे स्वातंत्र्य आणि दुसरीकडे मूल जन्माला घातल्यानंतर येणाऱ्या स्वाभाविक शारीरिक, सामाजिक जबाबदाऱ्यांमुळे अनेक स्त्रिया 'मुले नको' हा पर्याय स्वीकारू लागल्या आहेत.

भारताने स्वातंत्र्यानंतरच्या लोकसंख्या नियंत्रणाच्या धोरणाचा अवलंब केला. भारताच्या दृष्टीने लोकसंख्या नियंत्रणाचा मुद्दा सर्वांगीण आर्थिक आणि सामाजिक प्रगतीच्या दृष्टीने अत्यंत कळीचा होता. १९५० मध्ये भारताचा जननदर-प्रत्येक स्त्रीने जन्माला घातलेली सरासरी मुले ६.१८ होता; तो १९८० मध्ये ४.८० वर आला.वैद्यकीय संशोधक लॅन्सेटने यावर्षी मार्च महिन्यात ही आकडेवारी प्रसृत केली. २०२१ मध्ये जननदर १.९० पर्यंत खाली आला.

लॅन्सेटच्या मते सध्या तो १.२९ पर्यंत आला असून पुन्हा वर जाणार नाही. २.१ च्या वर जननदर नसेल, तर लोकसंख्येचा ऱ्हास होतो व उत्पादक लोकसंख्याही कमी होते. काही उपाययोजना लॅन्सेटच्या अंदाजानुसार, २०५० साली दर पाच भारतीयांमध्ये एक ज्येष्ठ नागरिक असेल. या प्रचंड लोकसंख्येची काळजी घेण्यासाठी पुरेशी युवा लोकसंख्याच त्यावेळी उपलब्ध नसेल. मध्यंतरी भारतामध्ये आर्थिक विकास साधण्यासाठी 'लोकसंख्या लाभांश' या संकल्पनेचा आधार घेतला गेला. म्हणजे अधिक लोकसंख्या हा बोजा न ठरता, ते समृद्धीचे साधन ठरू शकते. कारण यातून अधिक उत्पादक हात, अधिक कौशल्य, अधिक क्रयशक्ती, अधिक मागणी होते.

लोकसंख्या लाभांशाचा उपयोग चीनने करून घेतला. भारत आता तो फायदा घेत आहे. तीन मुलांना जन्म घालावा ही सूचना प्रत्यक्षात आणण्याकरिता भविष्यात सरकारी पातळीवर धोरण बदल आवश्यक आहे. शिवाय प्रगतिशील समाजामध्ये मुले जन्माला घालण्याच्या निर्णयप्रक्रियेत महिलांचे स्थान प्राधान्याचे असेल. किती महिला ही वाटचाल स्वीकारतील, असा प्रश्न आहे. मुले जन्माला घालायची असतील तर आधी तरुण-तरुणींनी लग्न केले पाहिजे. लग्न करण्याआधी हे तरुण-तरुणी आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असणे आवश्यक आहे. परंतु गेल्या काही वर्षांत देशात बेरोजगारी वाढलेली आहे. त्यामुळे बेरोजगार तरुणांना लग्नासाठी मुली मिळत नाहीत.

परिणामी विवाहेच्छुक मुला-मुलींचे वय वाढत आहे आणि लग्न होत नाही. महागाईदेखील आहे. आरोग्य, शिक्षणावरील खर्च वाढला आहे. या परिस्थितीत लग्न करून, संसार सांभाळून वर दोन-तीन अपत्ये जन्माला घालणे, त्यांना वाढवणे आव्हानात्मक आहे. तरुणांमधील बेरोजगारी दूर करून, त्यांचे उत्पन्न वाढवून, महागाई सुसह्य करून, आरोग्य, शिक्षण सुविधा उपलब्ध करून दोन-तीन अपत्ये जन्माला घालण्यास योग्य अशी आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती निर्माण करण्याची गरज आहे. मात्र, जन्मदर घटण्याचे संकट काही वर्षांनंतर येण्याची शक्यता आहे, तोपर्यंत लोकसंख्या लाभांशाचे अधिकाधिक लाभ पदरात पाडून घेण्याची गरज आहे.

देशाचा जन्मदर वाढविण्याकरिता वेगवेगळ्या देशांनी विविध उपाययोजना केल्या आहेत. काहींमध्ये मिळाले यश मिळाले आहे. या उपाययोजनांचे विश्लेषण करून भारतासाठी योग्य अशा उपाययोजना येणाऱ्या काळात राबविणे गरजेचे आहे. (लेखक संरक्षणविषयक तज्ज्ञ आहेत.)

संत प्रबोधन

प्रा. डॉ. हरिदास आखरे

# ईश्वरी प्रार्थनेचे महत्व व फायदे

वैदिक संप्रदायात म्हणजेच भारतीय संस्कृतीत कोणाच्याही केवळ बुद्धीला प्रामाण्य नसून ज्याला शास्त्र प्रामाण्य असेल तेच स्वीकृत केले जाते. श्रीमद् भगवद्गीता सांगतेतस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्य व्यवस्थितौ। (गीता १६/२४) विष्णू पुराण व स्कंद पुराणातही प्रार्थनेचे महत्त्व स्पष्ट केले आहे. ज्याच्या स्मरणाने अशुभाचा नाश होतो व शुभाचा विस्तार वाढतो, अशा ब्रह्माची विद्वत्जन प्रार्थना करतात.

आज सर्वत्र शोषण, अत्याचार, अनाचार यांचा एकछत्री



अंमल आहे. प्रत्येकाकडे नजर टाकल्यास तो अशांत व असंतुलित दिसतो. दरिद्री आणि दुःख, कष्टाने पिचलेला दिसतो. निसर्ग आणि मानवामध्ये एक प्रकारची तीव्रता व उग्रता यांची रस्सीखेच चालू आहे. या भयावह संकटापासून सुटका करावयाची असल्यास अध्यात्माचीच कास धरावी लागेल. या संकटासाठी मनुष्याचे विचारभाव आणि कर्मच जबाबदार आहेत. त्यांना सात्त्विक व व्यवस्थित करण्यासाठी साधना करणे आवश्यक आहे आणि प्रत्येक साधनेची सुरुवात प्रार्थनेने होत असते.

सर्वशक्तिमान परमेश्वरच मुंगीपासून हत्तीपर्यंत सर्वांचा स्वामी आहे. कुंभाराच्या धगधगत्या आव्यात अडकलेल्या मांजरीच्या पिल्लांचे संरक्षण त्यानेच केले आहे. खोल पाण्यामध्ये राहणाऱ्या मगरीच्या मगरमिठीतून त्यानेच हत्तीची सुटका केली आहे. कौरवांच्या भरसभेत द्रौपदीचे वस्त्रहरण होताना त्या ईश्वरानेच तिचे लज्जारक्षण केले होते. या सर्वांनी भगवंताची निर्मळ अंतःकरणाने आर्त होऊन प्रार्थना केली होती. आपल्या सर्वांमध्ये व्याप्त असलेली, वास करीत असलेली दैवी चेतना म्हणजे परमेश्वराची अमूल्य भेटच आहे; परंतु ही दैवी चेतना अर्धजागृतीमध्ये सुप्त, निद्रिस्त पडून असते. या दिव्य चेतनेस जागृत करण्यासाठी प्रार्थना केली जाते. प्रार्थनेमध्ये हे मागितले जाते की, आमचे मन पवित्र व्हावे. आमच्या अंतःकरणात निर्मळता यावी. हृदयामध्ये उदारता विकसित व्हावी. आम्ही दुसऱ्याची सेवा करण्यास सदैव तत्पर असावे. परमेश्वराकडून चांगले विचार, सद्बुद्धी, सद्भावना यांची मागणी करून त्यांचा जीवनात अंगीकार करणे व त्या आचरणात आणणे हेच आपले जीवनलक्ष्य असले पाहिजे. भारतीय स्वातंत्र्यलढ्याचे अग्रणी असणारे महात्मा गांधी ऊर्जाप्राप्तीसाठी व मनःशांतीसाठी नेहमी प्रस्तुत प्रार्थना करीत असत. त्यातूनच त्यांना सामाजिक मूल्य प्रतिष्ठापनेचा मार्ग सापडत असे- **ईश्वर अल्लाह तेरो नाम। सबको सन्मती दे।। रघुपती राघव राजाराम । पतित पावन सीताराम ।।** (गांधीजींची प्रार्थना) हीच प्रार्थना सर्वश्रुत आहे. सद्बुद्धीचा अवलंब करून सत्कर्म करणे म्हणजेच धर्म होय. धर्माचे पालन न केल्यास प्रार्थनेला अर्थ उरणार नाही. गायत्री मंत्राचा भावार्थ हेच स्पष्ट करतो. **ओम भुर्भुस्वः। तत्स वितुर्वरेण्यम। भर्गो देवस्यधीमही। धियोयोनः प्रचोदयात ।।२६।।** (यजुर्वेद संहिता ३६.१) हे प्राणस्वरूप, दुःखनाशक, श्रेष्ठ, तेजस्वी, पापनाशक, देवस्वरूप परमात्मा आमच्या अंतःकरणामध्ये विराजमान हो व आमच्या बुद्धीस सन्मार्गाकडे प्रेरित कर. थोड्या वेळासाठी का होईना, देवालयामध्ये ईश्वराजवळ बसून त्याच्या गुणांचे स्मरण करावे, चिंतन करावे. त्यांना आत्मसात करून व्यवहारामध्ये आणल्यास अंतःकरणापासून आर्त प्रार्थना केल्याचे समाधान प्राप्त होईल. **सर्वदा सर्वकार्येषू नास्ति तेषाममंगलम। येषा हृदिस्थो भगवान मंगलायतनो हरिः ।।२७।।** (स्कंदपुराण ५।३।१५७।१)

प्रत्येक व्यक्तीच्या निरामय जीवनासाठी प्रार्थना आवश्यक आहे. दुर्लभ नरदेहाच्या सार्थकतेसाठी प्रभूची प्रार्थना ही एक श्रेष्ठ शक्ती आहे. व्यक्तीच्या मनात श्रेष्ठ विचार निर्माण होतात. अशुभ विचारांचा नायनाट होतो. माणूस हा खूप शक्तिमान आणि बुद्धिमान असला, तरी विश्व प्रभूच्या बलाढ्य शक्तीपुढे तो अगदीच लहान आहे. ज्याने मानवी जीवनामध्ये बहुमूल्य देह दिला त्याचे स्मरण करणे, हे प्रत्येकाचे आध्यात्मिक कर्तव्य आहे. संत तुकारामांची विचारधारा अशी आहे की, शुद्ध मनाने ईश्वराची प्रार्थना केल्यास तुमचे मानसिक सामर्थ्य निश्चित वाढेल.

केवळ विज्ञानच माणसाला सुखी करू शकत नाही. मानवी जीवनात विज्ञान आणि अध्यात्माचा समतोल हा आवश्यक आहे. पाश्चात्त्य विचारवंत ॲण्ड्रू कार्नेजी यांच्या मतानुसार पाश्चात्त्य देशांमध्ये आज सर्व सुखसमृद्धी असतानाही आत्महत्येचे प्रमाण वाढलेले आहे. त्याचे कारण काय, तर तेथे मानसिक शांतीचा अभाव आहे. मानसिक सामर्थ्यप्राप्तीसाठी प्रार्थना आवश्यक आहे. ईश्वराची प्रार्थना ही एक महान शक्ती आहे. ती सर्वांनी आपल्या आयुष्यात स्वीकार करावयास पाहिजे. प्रार्थनेमुळे मनातील वाईट विचारांचा नाश होतो. त्यामुळेच सर्व संतांनी व मानसशास्त्रज्ञांनी मनःस्वास्थ्यासाठी एकच उपाय सांगितलेला आहे. तो म्हणजे 'देवाची प्रार्थना.' जीवनसार्थकतेचा गोपनीय संदेशही त्यातच आपल्याला आढळेल.

जगातील सर्वांत मोठे तेज, सर्वांत मोठे तप, सर्वांत मोठे पवित्र, सर्वांत श्रेष्ठ दैवत, सर्वांत मंगल असे ब्रह्म आहे. म्हणूनच कोणत्याही कार्याची सुरुवात ही मंगल प्रार्थनेने करण्याचा आदर्श शिष्टाचार आपल्या भारतीय संस्कृतीत आहे. त्यामुळेच प्रार्थना हे एक आदर्श भारतीय जीवनमूल्य आहे. प्रार्थना केल्याने मनःशांती व एकाग्रता यांसारख्या महान गोष्टी साध्य होतात. विश्वाच्या कल्याणाकरिता खळांचा कुटिलपणा नाहीसा होऊन त्याच्याऐवजी सत्कर्माची आवड वाढावी व सर्व प्राण्यांची एकमेकांशी जिवाभावापासून मैत्री व्हावी. पापांचा अंधकार जाऊन विश्वात स्वधर्मरूपी सूर्याचा उदय व्हावा. प्राणिमात्रात जो ज्याची इच्छा धरील ते त्याला मिळावे. संपूर्ण कल्याणाचा वर्षाव करणारे ईश्वरनिष्ठांचे समुदाय या भूतलावर निरंतर सर्व प्राण्यांना भेटोत, अशी विश्वात्मक प्रार्थना संत ज्ञानेश्वरांनी आपल्या ज्ञानेश्वरीच्या १८ व्या अध्यायात पसायदान मागताना केलेली आहे. **आता विश्वात्मकें देवें। येणें वाग्यज्ञें तोषावें। तोषोनि मज द्यावे। पसायदान हें।।** आपल्या प्रत्येक कार्याला ईश्वराचे अधिष्ठान लाभावे, सद्प्रवृत्तीचे विचारबळ मिळावे, यासाठी भारतीय लोकजीवनात प्रार्थना हा सर्वश्रेष्ठ आचारधर्म प्रत्येक कार्यारंभी पाळला जातो.

सिनेजगत

देवेंद्र प्रभुणे

## हाय ओ रब्बा...!


# जखम अश्वत्थामाची; भारताच्या फाळणीची...

एक भारतभूला स्वातंत्र्य प्राप्त होण्याच्या आनंदाला फाळणीच्या वेदनांची धगधगीत किनार होती. ही नुसती भूभागाची फाळणी नव्हती तर लाखो नागरिकांचे भावविश्व उद्ध्वस्त करणारी नृशंस शस्त्रक्रिया होती. आपले सर्वस्व गमावून शारीरिक, मानसिक अंतर्बाह्य उन्मळून गेलेले, कालपर्यंत स्वामी असलेले, परंतु आज निर्वासित झालेले नागरिक सीमेपार आवागमन करीत होते. या भळाळत्या जखमा चिरंतन उराशी बाळगून भारतात प्रवेश केलेल्या नागरिकांनी पुनश्च आपल्या जीवनाचा प्रारंभ केला. या आकस्मिक निर्घृण भूमी विच्छेदनाचे उत्तरपरिणाम भारतीय कला व साहित्य यांच्यामध्ये सदोदित उमटत असतात.

विशेषत: उपयोजित कलांमध्ये फाळणीचा दृश्य-परिणाम फार गडद व ठसठशीत प्रत्ययास येतो. समृद्ध व प्रतिष्ठित आयुष्य अर्ध्या रात्री त्यागून 'शरणार्थी' हा ठप्पा जीवनभर भालावर गोंदवून उद्ध्वस्त आयुष्याचे जर्जर वस्त्र आशेच्या तंतूने शिवण्याचे आपद्कर्म वाट्याला आलेल्या संवेदनशील कलावंतांनी आपापल्या दृष्टिकोनातून व मनोवृत्तीनुसार फाळणीचा चित्रकृतींमधून वेध घेतला. भारतीय चित्रपटसृष्टीत १९४० च्या दशकात पंजाबी वर्चस्व सर्व पातळ्यांवर वाढू लागले. चित्रपट ही मूलत: व्यावसायिक कला असल्यामुळे व्यवसायाची जाण व समज असलेला निर्माता ही या व्यवसायाची पूर्वअट असते. सृजनात्मक योगदान देणारे कलावंत व्यवसायाच्या वास्तवाला फारसे उपयुक्त नसतात, असा एक साधार निष्कर्ष आहेच. लाहोर हे स्वातंत्र्यपूर्व काळातील एक महत्त्वाचे चित्रपट निर्मिती केंद्र होते. दलसुख पंचोली यांचे कार्य कर्तृत्व लाहोरमध्येच फुलले. शमशाद बेगम, प्राण, ओ. पी. नय्यर हे लोकोत्तर कलावंत लाहोरमध्येच आपल्या चित्रपट पदार्पण करते जाहले होते. भारताच्या फाळणीचे विदारक सत्य म्हणजे आज पाकिस्तान व बांगलादेश म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भूभागातून बहुसंख्य हिंदूंना परागंदा व्हावे लागले. यात सर्व स्तरांवरील व व्यवसायातील नागरिक होते. लाहोर चित्रपटसृष्टीतील बहुसंख्य हिंदू कलावंतांनी नाईलाजास्तव का होईना, मुंबईच्या चित्रपट क्षेत्राकडे आपला मोर्चा वळवला. फाळणीच्या कटू अनुभवांपासून स्फुरलेला पहिला स्वातंत्र्योत्तर चित्रपट म्हणजे 'लाहौर' (१९४९). लाहौरच्या खुश-मिजाज व दिलदार वातावरणात आकारास आलेली प्रणयकथा व फाळणीमुळे प्रेमीजनांची झालेली ताटातूट ही मध्यवर्ती कथा-कल्पना घेऊन बनलेल्या या चित्रपटात लाहोर शहराची विहंगम दृश्ये दिसतात. एम. एल. आनंद या लाहोर निवासी दिग्दर्शकाने हा चित्रपट आपल्या शहराच्या प्रेमापोटी बनवला होता. पंजाबी निमिर्ती, दिग्दर्शक व कलावंत यांच्या त्रिवेणी संगमाने १९५० च्या दशकात फाळणी व त्या अगोदरचे जीवन हिंदी चित्रपटांमध्ये सदैव जिवंत ठेवले. १९५४ सालच्या 'नास्तिक' चित्रपटात भारताच्या फाळणीची वास्तविक दृश्ये वापरण्यात आली होती. फाळणीमध्ये डोळ्यांसमोर आई-वडिलांची हत्या होताना बघितल्याने व निर्वासित छावणीत बहीण-भावांचा मृत्यू झाल्याने देवावरचा विश्वास उडाल्याने नास्तिक झालेल्या व शेवटी परत आस्तिक झालेल्या तरुणाची कथा या चित्रपटात चितारली होती. १९६० साली आलेल्या 'छलियां' चित्रपटात फाळणीच्या वेळी लाहोरमध्ये राहून गेलेल्या विवाहित स्त्रीची हृदयद्रावक कथा मांडण्यात आली होती. यश चोप्रा यांच्या 'धर्मपुत्र' (१९६१) चित्रपटात भारताच्या फाळणीचा एक वेगळा पैलू दाखविण्यात आला होता. हिंदू संस्कारात वाढलेल्या एका मुस्लिम मुलाच्या वर्तणुकीचे मूल्यमापन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न या चित्रपटात केला होता. जन्मभूमी ही महान असून धर्म दुय्यम स्थानावर असतात, हा उदात्त दृष्टिकोन मांडणारा 'गर्म हवा' (१९७४) हा एम. एस. सत्थू दिग्दर्शित एक अप्रतिम चित्रपट. फाळणीनंतर आग्रा येथील आपला परंपरागत चर्मोद्योग चालविताना मुस्लिम व्यक्तीला आलेल्या अडचणी, पाकिस्तानात स्थायिक झालेले नातलग, त्यांचा पाकिस्तानात येण्याचा आग्रह व एकंदरीतच अविश्वास व द्वेषाचे वातावरण यांचा प्रभावी वेध या चित्रपटात घेतला आहे. बलराज साहनी यांनी साकारलेली 'सलीम मिर्झा' ही भूमिका खरोखर संस्मरणीय! पण, हिंदी चित्रपटात भारताची फाळणी पडद्यावर जिवंत करणारा चित्रपट म्हणजे 'तमस' (१९८८). दूरदर्शनवर मालिकेच्या रूपात प्रदर्शित झालेला हा चित्रपट ज्या पद्धतीने भारतीय फाळणीचे भयावह वास्तव प्रकाशात आणतो, ते अंगावर काटे आणते. सर्वसामान्य नागरिकांची झालेली ससेहोलपट, समाजधुरिणांनी परिस्थितीचा घेतलेला अचूक फायदा व अंतिमत: माणुसकी आणि सहिष्णुतेचा विजय या चित्रपटात गोविंद निहलानी यांनी चितारला होता. यातील बहुतांश कलावंतांनी भारताची फाळणी अनुभवली होती व त्यामुळेच त्यांच्या प्रस्तुतीकरणात एक स्वाभाविक क्षोभ व उद्वेग पदोपदी जाणवत होता. वनराज भाटिया यांनी संगीतबद्ध केलेले, शीर्षक संगीत व पार्श्वसंगीत चित्रपटातील क्रौर्य गडद करते. १९९० च्या दशकात फाळणीचा वैयक्तिक पातळीवर झालेला परिणाम अभ्यासणारे अनेक चित्रपट आले. फाळणीची ठाशीव दृश्ये न दाखवता फाळणीचे पडसाद परिस्थिती, भाव व संवादांमध्ये दर्शवणारे 'मम्मो' (१९९४) व 'नसीम' (१९९५) हे चित्रपट या बाबतीत लक्षणीय होते. दुर्दैवाने हे चित्रपट सर्वसामान्य रसिकांपर्यंत पोहोचू शकले नाही. पण, भारताच्या फाळणीमुळे ताटातूट झालेल्या प्रेमिकेस पाकिस्तानात जाऊन सोडवून आणणाऱ्या अक्खड सरदाराची कथा मनोरंजन व देशभक्ती यांच्या जबरदस्त संगमाने मांडणारा 'गदर : एक प्रेमकथा' (२००१) हा एक लोकप्रिय चित्रपट. गंमत म्हणजे, ज्याच्या मूळ कथेवर हा अती-नाटकी चित्रपट बनला होता, त्या बूटासिंगच्या जीवनावर 'शहीद-ए-मोहब्बत बूटासिंग' हा पंजाबी चित्रपट १९९९ सालीच प्रदर्शित झाला होता, आता बोला..! १९९८ साली खुशवंत सिंह यांच्या कालजयी 'ट्रेन टू पाकिस्तान' या कादंबरीवर आधारित पामेला रुक्स दिग्दर्शित याच नावाचा चित्रपट शीख तरुण व मुस्लिम तरुणी यांच्या प्रेमकथेचे फाळणीच्या काळातील सीमेवर घडणाऱ्या घटनांच्या परिप्रेक्ष्यात चित्रित करतो.









(पान ६ वर)

# या सुखांनो या...!



यशासाठी

डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

**१.** सुमन करीअर कौन्सेलिंगसाठी माझ्याकडे आली तेव्हा इंजिनीअरिंगची विद्यार्थिनी होती. तिच्या क्षमतेनुसार मी तिला सॉफ्टवेअर प्रोग्रामरचे करीअर सांगितले. घरी फक्त आई-वडील आणि ती एकूण तिघेच. वडील लिपिक म्हणून निवृत्त झाले व अचानक आईची तब्येत बिघडली. घरी आणले तेव्हापासून आई नेहमी अंथरुणावरच असायची. त्यामुळे सुमनला घरकाम व कॉलेजचा अभ्यास दोन्ही करावे लागायचे. त्यामुळे पदवी परीक्षेत तिला फक्त ६० टक्के गुण मिळाले. नोकरी मिळेना, म्हणून एका कंपनीत तिने इंटर्नशिप सुरू केली. पगार मिळणार नव्हता, पण अनुभव महत्त्वाचा होता. तिच्या कामसू स्वभावाने तिने लवकरच सगळ्यांची मने जिंकली; पण सगळेच लोक चांगले असतील, याची खात्री नसते.

राकेश नावाच्या तिच्या टीम लीडरने तिच्या मेहनतीचा व गरजू परिस्थितीचा फायदा घ्यायला सुरुवात केली. त्याच्या वरिष्ठांना तो तिने केलेलं काम मी केलंय, असे सांगू लागला. त्याच दरम्यान एका मोठ्या कंपनीचे काम त्यांच्याकडे आले. ते काम खूप मोठे होते. पगार मिळत नसतानाही सुमन रोज १४ तास काम करीत होती. तिचा टीम लीडर राकेश ते पूर्ण काम सुमनच्या भरवशावर सोडून निवांतपणे कॅन्टीनमध्ये जाऊन बसायचा. सुमनच्याच कंपनीत एक दुसरी टीम लीडर रश्मी या सर्व प्रकाराचे जवळून निरीक्षण करीत होती. सुमनवर जास्त काम लादून तिचे कर्तृत्व राकेश स्वत:च्या नावावर खपवतोय, हे सर्व तिला स्पष्ट माहीत होते. तिने सुमनला सावधही केले होते; पण चांगले काम केल्यामुळे मला इथे नोकरी मिळेल, या आशेने पूर्ण शक्तिनिशी सर्वोत्तम काम करीत होती. शेवटी तो दिवस उजाडला. बाहेरच्या मोठ्या कंपनीचे अधिकारी त्यांच्या कामाचे परीक्षण करण्याकरिता आले. सुमनच्या क्षमतेचा गैरफायदा घेणारा तिचा टीम लीडर राकेश त्या बाहेरच्या अधिकाऱ्यांसमोर बोलायला उभा झाला. सुमनच्या कंपनीचे सर्व टीम लीडर व वरिष्ठ अधिकारी मिटिंगला हजर होते. त्यात रश्मीही होती. इंटर्न असल्यामुळे सुमनला मात्र प्रवेश नव्हता. मिटिंग सुरू झाल्यावर सगळे रिझल्ट्स पाहून बाहेरचे अधिकारी खूश झाले. अनुभवी लोकांना कठीण जाईल असे जबरदस्त काम सुमनने एकटीने केले होते. पण म्हणतात ना 'सत्यमेव जयते' तसेच झाले. बाहेरच्या अधिकाऱ्यांनी सुमनच्या कंपनीला हे काम देण्याआधी स्वत: काही प्रयत्न त्या प्रोजेक्टवर केले होते. त्यामुळे त्यांनी राकेशला काही सखोल प्रश्न विचारायला सुरुवात केली तेव्हा तो गुळमुळीत उत्तरे देऊ लागला. कारण त्याने ते काम स्वत: केलेच नव्हते. शेवटी एका प्रश्नाचे तर त्याला उत्तरच देता आले नाही. तेव्हा ही संधी साधून रश्मी उभी झाली. तिने सांगितले, 'जिने या पूर्ण प्रोजेक्टवर काम केलंय तीच याचे उत्तर देऊ शकेल.' हे ऐकून सगळ्यांनाच धक्का बसला. मोठ्या अधिकाऱ्यांची अनुमती घेऊन तिने सुमनला बोलावले.

सुमनने त्यांच्या सगळ्या प्रश्नांची अगदी समर्पक उत्तरे दिली. सुमनने घेतलेली मेहनत व तिचे कामावरचे प्रेम पाहून बाहेरील अधिकाऱ्यांनी ती कोणत्या पोस्टवर आहे, असे विचारले. तेव्हा ती फक्त एक नवीन इंटर्न आहे, हे ऐकून सगळ्यांनाच धक्का बसला तसेच राकेशचे पितळ उघडे पडले. रश्मीने पूर्ण सत्य सांगितल्यावर सुरुवातीला मिळणाऱ्या पगारापेक्षा तीन पगारवाढीचे भत्ते देऊन व त्यानुसार एक महिन्याचा पूर्ण पगार तत्काळ सुमनला बक्षीस देऊन लगेच सन्मानाने नोकरी देण्यात आली. सुमनच्या सकारात्मक विचारांचे व मेहनतीचे सोने झाले. सर्वांनी व रश्मीने सुमनचे अभिनंदन केले. तिने अत्यानंदाने रश्मीला मिठी मारली. सुमनच्या चेहऱ्यावर हसू तर डोळ्यात आसू अशी परिस्थिती होती. तिने मनोमन आईवडिलांना व देवाला नमस्कार केला. मनात म्हणाली, 'या सुखांनो या...!'

**२.** गेल्या वर्षीच मंगेश व आशाचे लग्न झाले. आता लवकरच त्यांना बाळ होणार होतं. तशी त्यांची परिस्थिती जेमतेमच होती. मंगेश एक साधारण अनाथ मुलगा होता. बी.कॉम. झाल्यावर एका खाजगी कंपनीत काम करीत होता. एका कार्यक्रमात त्याची व आशाची भेट झाली. तीसुद्धा अनाथ असल्याचे त्याला कळले. ती कला शाखेतील पदवीधर होती व नोकरी शोधत होती.

एकमेकांना आधार होईल म्हणून दोघांनी कोर्ट मॅरेज केले. लग्नाच्या वाढदिवसाला दोघेजण एका साध्या हॉटेलात जेवायला गेले. आपण खूप खर्च करू शकत नाही म्हणून त्याला वाईट वाटत होते. आशाने सांगितले, तू असा विचार करून दु:खी होऊ नकोस. आपण दोघेही मेहनत करून आपल्या बाळाला मोठे करू. मला पैशाची हाव नाही. मला तुझा सहवासच जास्त महत्त्वाचा आहे. पण जगात पैसाच जास्त महत्त्वाचा आहे असे मंगेश मानत होता. आपण आपल्या मालकाशी पगारवाढीबद्दल बोलायचे त्याने मनोमन ठरवले. त्याचा मालक म्हणाला, ''ठीक आहे. तुला पगारवाढ व बढती दोन्ही मिळतील, पण त्यासाठी तुला जास्त वेळ देऊन मेहनत करावी लागेल.'' त्या दिवसापासून मंगेशने स्वत:ला कामाला जुंपून घेतले. तो घरून लवकर निघायचा व रात्री उशिरा घरी पोहोचायचा. आशाने त्याला पुन्हा सांगितले, ''माझ्या प्रसूतीनंतर मी यथाशक्ती तुला मदत करीनच; पण तू एवढा जास्त वेळ नुसतेच काम काम करू नकोस.'' मंगेशने त्याकडे जास्त लक्ष दिले नाही. त्याच्या मालकाला त्याची मानसिकता कळल्यामुळे तो त्याला नवनवीन जबाबदाऱ्या देत होता. आशाच्या प्रसूतीच्या दिवशी तिला पोट दुखू लागल्यावर तिने मंगेशला फोन केला व लगेच मला प्रसूती केंद्रावर घेऊन जाण्याची गरज आहे, असे सांगितले. तो मालकाकडे गेला व लगेच जाणे गरजेचे आहे असे सांगितले; पण एक मोठे काम त्याच दिवशी करणे गरजेचे आहे, याची मालकाने आठवण करून दिली.



रुग्णवाहिकेला फोन करून तुझे घरचे काम होईल, पण ऑफिसचे काम कुणी करू शकणार नाही, असे सांगितले. ऑफिसमधून घरी पोहोचायला त्याला कमीत कमी एक तास लागायचा. तेव्हा तसेही रुग्णवाहिका लगेच पाठवावीच लागणार होती. त्याने घरी रुग्णवाहिका पाठवली व मी काही वेळात इस्पितळात पोहोचतो असे आशाला कळवले. प्रत्यक्षात त्याला सगळी जबाबदारी आटोपून रुग्णालयात पोहोचायला चार तास उशीर झाला. तोपर्यंत आशाची सुखरूप प्रसूती होऊन त्यांना मुलगी झाली होती.

आशाच्या मनावर प्रसूतीच्या वेळीच्या त्याच्या अनुपस्थितीचा कठोर आघात झाला. बघता-बघता मुलगी एक वर्षाची झाली. मुलीच्या वाढदिवसाला त्याला लवकर घरी जायचे होते; पण एका कार्यक्रमामुळे उशीर झाला. त्या दिवशी मंगेश खुशीत होता. कारण त्याच्या पूर्ण समर्पित प्रयत्नांना यश आले होते. त्याच्या मालकाने त्याला बढती व भरघोस पगारवाढ दिली होती. त्याचे तसे पत्र त्याला समारंभपूर्वक देण्यात आले. ऑफिसातील सर्वांनीच त्याचे मनापासून कौतुक केले. मात्र घरी पोहोचायला त्याला अनेक अर्थाने खूप उशीर झाला होता. आशाने घरात मुलीच्या वाढदिवसाची सजावट केली होती; पण घरी मंगेशला दोघीही दिसल्या नाहीत. मंगेशच्या रोजच्या घरी उशिरा येण्याने नेहमी वाट पाहून कंटाळलेल्या आशाने त्याच्यासाठी एक हृदयद्रावक पत्र लिहून ठेवले व मुलीला सोबत घेऊन ती घर सोडून निघून गेली. कुठे गेली ते मात्र लिहिलेले नव्हते. जिथे ती जाण्याची शक्यता होती तेथे त्याने फोन करून शोध घ्यायचा प्रयत्न केला, पण व्यर्थ! रात्रभर तो झोपू शकला नाही. दोघींच्या आठवणीने तो खूप रडला.

एक तर अनाथ; आशानेच त्याच्यावर मनापासून प्रेम केले होते. पण गेल्या वर्षभरात बढती व पगारवाढ मिळविण्याच्या वेडापायी तो दोघींकडे लक्ष देऊ शकला नव्हता. खरे तर त्याचेही आशा व त्याच्या मुलीवर खूप प्रेम होते. जास्त पैसा मिळाला तर आयुष्य आणखी छान होईल, असा विचार करून त्याने स्वत:ला कामात जुंपून घेतले होते. आता मंगेशला बढती व पगारवाढ मिळाली खरी; पण मुलगी आणि बायको गमावली होती. रात्री एकांतात विचार करताना आणखी एक महत्त्वाची गोष्ट त्याला लक्षात आली होती. त्याच्या बढतीमुळे आता त्याला जी नवीन जबाबदारी मिळाली होती त्यातसुद्धा पुन्हा त्याला तेवढाच वेळ व मेहनत पुढेही करावी लागणार होती. म्हणजे पुन्हा पत्नी व मुलीला वेळ देता आला नसता.

सकाळ झाल्यावर त्याने शांतपणे विचार केला व मालकाला काय घडले ते कळवले आणि बायको आणि मुलीला शोधायला सुटी घेतली. शांतपणे विचार करताना त्याला आशाच्या एका मैत्रिणीचे नाव आठवले. पण तिचा फोन नंबर नव्हता. मग त्याने जुन्या माहितीच्या आधारे तिचा पत्ता शोधला; आदल्या रात्री आशा आपल्या मुलीला घेऊन तिथेच पोहोचली होती. रात्रभर रडून तिचेही डोळे सुजले होते. मुलगी झोपली होती.

मंगेश आशाच्या पुढ्यात जाऊन बसला. तिची नजर जमिनीकडे रोखली होती. मंगेश म्हणाला, ''आशा मला माफ कर. कालच मला बढतीचे व पगारवाढीचे पत्र मिळाले. माझ्या मेहनतीमुळे आमच्या कंपनीला मोठा फायदा झाला. त्यामुळेच त्यांनी मला सरप्राईज देण्यासाठी कालचा कार्यक्रम ठरवला आणि पुन्हा मला उशीर व तुला मनस्ताप झाला. मात्र तुमच्या दोघींशिवाय मला या जगात कुणीच नाही. मी पैशाचा लोभी नाही. आपले आयुष्य सुखात जावे म्हणूनच मी धडपड केली, पण आता मला माझी चूक कळली.'' त्याने बढतीच्या पत्राचे फाडून तुकडे केले. 'मी आता बढती घेणार नाही व घरी लवकर येत जाईन' असे तिला सांगितले. भावनातिरेकाने दोघांनी एकमेकाला मिठी मारली.

दुसऱ्या दिवशी मंगेशने मालकाला त्याचा निर्णय कळवला. पण आता जास्त वेळ न देता मंगेश पुन्हा उत्तम परिणाम देणार, याची मालकाला व सर्वांनाच खात्री पटली होती. त्यामुळे मालकाने मंगेशसाठी एक विशेष मदतनिसाची नेमणूक करून त्याची बढती व पगारवाढ कायम ठेवली. कारण आता त्याच्या वेळेपेक्षा त्याच्या अनुभवाचा कंपनीला उपयोग होणार होता. यातून काय शिकायचे? महत्त्वाकांक्षा असावी; सोबतच कुटुंबाला वेळ देता यावा यासाठी वेळ आणि कामाचे योग्य नियोजन व संतुलन साधावे. कारण एकदा गेलेली वेळ, कुटुंबासोबतचे कोवळे व अमोल क्षण परत येत नसतात. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत)

## महाराष्ट्रस्य देवेन्द्रः!

(देवेन्द्र-दशकम्)

पुनश्चैवागमिष्यामि वदन्नेवं स आगतः !
प्रज्ञावान् मुख्यमन्त्री स देवानाम्-इन्द्र एव च ।।१।।
देवाभाऊ स देवेन्द्रः महाराष्ट्रे प्रियः खलु !
नागपुरसुपुत्रेऽस्मिन् प्रसन्ना हि सरस्वती ।।२।।
छात्रो यस्य सुशीलः स विद्यालयः सरस्वती
आधुनिकोऽभिमन्युः स विनम्रो नीतिमान् गुणी ।।३।।
दिग्विजयी च देवेन्द्रो विनेताऽयं विचक्षणः
देवेन्द्रपर्वमेतद्धि सफलं सिद्धिदं सदा ।।४।।
बुधः सौम्यः गुणोपेतः धवलं तद् यशो महत्
वाचि वाणी मराठी च रमते राजते शुभा ।।५।।
सुराज्येऽस्मिन् महाराष्ट्रे प्रभा छत्रपतेः
खलु भाति देवेन्द्र एवात्र तं वन्दन्ते जनाः हृदि ।।६।।
मुख्यमन्त्रिपदं नूनम्अर्हति च भवान् तदा
अभिनन्दनमेवात्र हार्दाः शुभाशयाः पुनः ।।७।।
आरम्भः सुमुहूर्ते च फडणवीसपर्वणः
आशिषो हि नरेन्द्रस्य देवेन्द्राय विशेषतः ।।८।।
सुशासितं महाराष्ट्रं प्रगत्याः पथि
सर्वदा ईर्ष्याद्वेषौ न चैवात्र मुख्यमंत्री वदाम्यहम् ।।९।।
सरिता सुविचारस्य गङगाधर शुभाशिषः
देवेन्द्र दृढसङ्कल्पः महाराष्ट्रं महन् मम ।।१०।।

रेखा लक्ष्मण मोघे

## माझ्या अंगणात...

एकदा माझ्या अंगणात, आले सारे पक्षी..
सूर्य उधळीत होता नभी, रंग गुलबाक्षी.
चिऊताई लगेच आली, छोट्या पिल्लासंगे.. कावळा
काव काव करीत आला, कोकिळेच्या संगे.
काऊला बघून कबुतरही, आले करीत गुटूरगूं..
राघू-मैनेची जोडी साजरी, गोष्टी त्यांच्या किती सांगू.
ऐटीत मान हालवीत, भाषण देई काकाकुआ बगळेदादा
एका पायावरती, ध्यान का करती बुवा?
शेवटी अंधार होता क्षणी, उडाले सारे पक्षी..
आकाशातून दिसत होती, पक्ष्यांची ती नक्षी.

संगीता बापट

## शाळेतल्या पावसात

किती काळाचे आठव भरून वाहतोय
ऊर नको वळून पाहाया खोली उठते
काहूर संदर्भ जुने उरी जपता अंग अंग येती
शरारून पोटात घेऊन भूक अवघी पक्षी सारे
जाती भरारून रिमझिम पाऊस पेरतो
सप्तरंग जणू आकाशात गात्र गात्र चिंब आजही
शाळेतल्या पावसात बेधुंद, बेभान वादळासवे
पाऊस आज अमाप कोसळतो शीणलेल्या बुरुजापरी
मात्र मी आतल्या आत ढासळतो सतत सोबत करतो
हा जीर्ण शीर्ण जीवन प्रवसात स्वत:स विसरून आलो
मी शाळेतल्या पावसात...

पुंडलिक आंबटकर

## शांततेचा ध्वनी

भोवतालचा मिट्ट काळोख उघड्या डोळ्यांनी बघावा,
मनातले काहूर शांत होईतो बसून राहावे,
गतायुष्यातील रणकंदन त्याच्या खुणा,
उमटलेल्या अंतर्मनावर कुठलीशी सल राहून गेलेली
विचार आणि आठवणी विरत जाव्यात हळूहळू
समर्पित व्हावे शांततेला, काही काळ...
आणि साठवावा मनात शांततेचा ध्वनी..

डॉ. रमेश जलतारे

# यूपीआय चर्चेत; सेमी कंडक्टर तेजीत


अर्थोद्योग

महेश देशपांडे


बहुचर्चित 'यूपीआय'ची सध्या जागतिक व्यासपीठावर चर्चा होत असताना मोफतच्या योजनांमुळे देशाच्या विकासावर गंभीर परिणाम होत असल्याचे आढळून आले आहे. याच सुमारास भारत सेमीकंडक्टर उत्पादनाचे केंद्र बनणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, बाजारात घसरण होत असली, तरी भारताचे बाजार भांडवल आणि जीडीपी गुणोत्तर उच्च पातळीवर असल्याचे दिसून आले आहे.

गेल्या काही दिवसांपासून प्रशंसेला पात्र ठरत असलेल्या 'यूपीआय'ची सध्या जागतिक व्यासपीठावर चर्चा होत आहे. दुसरीकडे मोफतच्या योजनांमुळे विकासावर गंभीर परिणाम होत असल्याचे आढळून आले आहे. याच सुमारास भारत सेमीकंडक्टर उत्पादनाचे केंद्र बनणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. दरम्यान, बाजारात घसरण होत असली, तरी भारताचे बाजार भांडवल आणि जीडीपी गुणोत्तर उच्च पातळीवर असल्याचे दिसून आले आहे. भारताच्या 'युनिफाईड पेमेंट्स इंटरफेस' (यूपीआय) ने जागतिक स्तरावर विशेष ओळख निर्माण केली आहे. एका संशोधन अहवालानुसार, २०१६ मध्ये लाँच झालेल्या 'यूपीआय'ने भारतात आर्थिक प्रवेश आणि डिजिटल व्यवहार पूर्णपणे बदलून टाकले आहेत.

प्लॅटफॉर्मने ३० कोटी व्यक्ती आणि पाच कोटी व्यापाऱ्यांना अखंड डिजिटल व्यवहाराचा अनुभव दिला. ऑक्टोबर २०२३ पर्यंत भारतातील एकूण किरकोळ डिजिटल पेमेंटमध्ये 'यूपीआय'चा वाटा ७५ टक्के आहे. 'आयआयएम' आणि 'आयएसबी'च्या प्राध्यापकांनी तयार केलेल्या या संशोधन अहवालानुसार, 'यूपीआय'ने ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये आपले स्थान निर्माण केले आहे. संशोधनानुसार, परवडणारे इंटरनेट आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर 'यूपीआय'चा व्यापक अवलंब करण्यात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. 'यूपीआय' केवळ आर्थिक व्यवहार सुलभ करत नाही, तर वंचित घटकांना औपचारिक कर्ज देण्याचा मार्गही खुला करत आहे. संशोधन पत्रानुसार, 'यूपीआय'ने सबप्राईम आणि नवीन-टू-क्रेडिट कर्जदारांना औपचारिक कर्ज मिळविण्यास मदत केली. फिनटेक कंपन्यांनी 'यूपीआय'च्या मदतीने २०१५ ते २०१९ दरम्यान लहान आणि वंचित कर्जदारांना दिलेल्या कर्जाची रक्कम ७७ पट वाढवली. 'यूपीआय' व्यवहारांमध्ये १० टक्के वाढीसह कर्ज उपलब्धतेत सात टक्के वाढ झाली आहे. डिजिटल आर्थिक इतिहासाने कर्जदारांना चांगले निर्णय घेण्यास मदत केली आहे. 'यूपीआय'च्या यशाचे आणखी एक मुख्य कारण म्हणजे कर्जात वाढ होऊनही डिफॉल्ट दरांमध्ये कोणतीही वाढ झालेली नाही. डिजिटल व्यवहारांद्वारे प्राप्त झालेल्या डेटामुळे कर्जदारांना जबाबदारीने विस्तार करण्यास मदत झाली. संशोधनानुसार, उच्च 'यूपीआय' वापर असलेल्या भागात सबप्राईम आणि नवीन-टू-क्रेडिट कर्जदारांना दिलेली कर्जे अनुक्रमे आठ आणि चार टक्क्यांनी वाढली आहेत. भारताचे 'यूपीआय' मॉडेल इतर देशांसाठी रोल मॉडेल असू शकते, असेही या पेपरमध्ये सुचविण्यात आले आहे. 'यूपीआय'चे फायदे केवळ देशापुरते मर्यादित न राहता जागतिक स्तरावर स्वीकारले जावेत, ही भारत सरकारची प्राथमिकता आहे. 'यूपीआय'च्या या क्रांतीने केवळ भारतातील आर्थिक समावेशनाला प्रोत्साहन दिले गेले नाही, तर जागतिक स्तरावर एक प्रभावी फिनटेक सोल्यूशन म्हणून प्रस्थापित केले आहे. आता हे मॉडेल स्वीकारून इतर देश डिजिटल व्यवहार आणि आर्थिक समावेशनात कितपत बदल करू शकतात हे पाहायचे आहे.



दुसरीकडे निवडणुका जिंकण्यासाठी मोफत योजना जाहीर करणे ही राजकीय पक्षांची लोकप्रिय रणनीती बनली आहे. या योजनांच्या माध्यमातून गरीब आणि मध्यमवर्गीय मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला जातो. ही रणनीती निवडणुकीमध्ये यशाकडे घेऊन जात असली, तरी राज्याच्या आर्थिक स्थितीवर खोलवर परिणाम करते. परिस्थिती एवढ्या पातळीवर पोहोचली आहे की, वित्त विभागाने चिंता व्यक्त केली असून गरज पडल्यास केंद्र या प्रकरणात हस्तक्षेप करू शकते, असे म्हटले आहे. महाराष्ट्रातील निवडणुका हे त्याचे ताजे उदाहरण आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी भाजपा आणि त्यांच्या मित्रपक्षांनी दीड हजार रुपये २.५ कोटी महिलांना दरमहा देण्याची योजना सुरू केली. या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांचा पाठिंबा मिळविणे हा होता. परिणामी भाजपा



महायुतीने दणदणीत विजय नोंदविला. या योजनेमुळे लोकसभा निवडणुकीतील पराभव धुवून काढून एक मोठे पुनरागमन झाले. त्याच धर्तीवर दिल्ली सरकारने 'मुख्यमंत्री महिला सन्मान योजनें'तर्गत महिलांना दरमहा एक हजार रुपये देण्याची योजना आखली आहे. १८ वर्षांवरील महिलांना या योजनेचा लाभ मिळणार आहे; मात्र दिल्लीच्या वित्त विभागाने यावर गंभीर चिंता व्यक्त केली आहे. या योजनेवर वर्षाला अंदाजे ४५६० कोटी रुपये खर्च केले जातील. त्यामुळे सरकारच्या बजेटवर मोठा ताण पडेल. दिल्ली सरकार आधीच अनुदानावर ११ हजार कोटी रुपये खर्च करत आहे. वित्त विभागाचा विश्वास आहे की, ही योजना लागू झाल्यास २०२५-२६ या आर्थिक वर्षात दिल्ली सरकारची बजेट तूट वाढू शकते. परिणामी केंद्र सरकारलाही हस्तक्षेप करावा लागू शकतो. आता एक महत्त्वाची बातमी. भारत लवकरच सेमीकंडक्टर चिप्सचे केंद्र बनणार आहे. यासाठी सरकारने 'सेमीकॉन इंडिया' प्रकल्प सुरू केला आहे. याद्वारे विदेशी गुंतवणूकदार सरकारी सुविधांसह सेमीकंडक्टर चिपचे उत्पादन भारतात सुरू करू शकतात.

गेल्या वर्षीच्या तुलनेत अलिकडेच देशातील सेमीकंडक्टर चिप्सचे प्रमाण १८.५ टक्क्यांनी वाढले आहे. सरकारची योजना यशस्वी झाल्यास भारत सेमीकंडक्टर चिप्स आयात करण्याऐवजी निर्यात करण्यास सुरुवात करेल, तो दिवस दूर नाही. सरकारने संसदेत सांगितले की, २०२३-२४ मध्ये देशातील सेमीकंडक्टर आयात १८.५ टक्क्यांनी वाढून १.७१ लाख कोटी रुपये झाली आहे. २०२३-२४ या आर्थिक वर्षात भारताने १८.४३ अब्ज सेमीकंडक्टर चिप्स आयात केल्या. वाणिज्य माहिती आणि सांख्यिकी महासंचालनालय पोर्टलनुसार, २०२२-२३ मध्ये देशात १.२९ लाख कोटी रुपयांच्या १४.६४ अब्ज चिप्स आयात करण्यात आल्या. आकडेवारीनुसार, २०२१२२ मध्ये देशाने १.०७१ लाख कोटी रुपयांचे १७.८९ अब्ज चिपसेट आयात केले. देशांतर्गत उत्पादनाला चालना देऊन आणि परदेशी गुंतवणूक आकर्षित करून आयातीवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी भारत सरकारने 'सेमिकॉन इंडिया'सारखे कार्यक्रम सुरू केले आहेत. सेमीकंडक्टर आणि मायक्रोनचे भविष्य पाहता २.७ अब्ज डॉलर खर्चून असेंब्लिंग, टेस्टिंग, मार्किंग आणि पॅकेजिंग युनिट उभारण्यास सुरुवात केली आहे. आता टाटा ग्रुप, मुरुगप्पा ग्रुप आणि केन्स सेमीकॉन या देशांतर्गत दिग्गज कंपन्यांनी सेमीकंडक्टर चिप उत्पादन क्षेत्रात रस दाखवायला सुरुवात केली आहे.

सेमीकंडक्टर चिप्सचा वापर स्मार्टफोन, स्मार्ट टीव्ही, उच्च-तंत्रज्ञान वैशिष्ट्यांसह कार, इलेक्ट्रिक खेळण्यांसह इतर अनेक उत्पादनांमध्ये केला जातो. सेमीकंडक्टर चिप ही एक प्रकारे इलेक्ट्रॉनिक उपकरणाची मज्जासंस्था असते. दरम्यान, शेअर बाजारात नुकतीच घसरण झाली असली, तरी भारताचे बाजार भांडवल आणि जीडीपी गुणोत्तर उच्च पातळीवर असल्याचे दिसून आले आहे. सर्व बीएसई सूचिबद्ध कंपन्यांचे एकत्रित बाजार भांडवल गेल्या १२ महिन्यांमध्ये जवळपास २४ टक्क्यांनी वाढले आहे, तर भारताचे सकल देशांतर्गत उत्पादन सध्याच्या किमतींवर, ज्याला नाममात्र जीडीपी म्हणूनही ओळखले जाते, वार्षिक ९.५ टक्क्यांनी वाढले आहे. डिसेंबर २०२३ अखेर हे प्रमाण १२६.४ टक्के तर डिसेंबर २०२२ अखेर १०७.२ टक्के होते. कोविड काळात मार्च २०२० मध्ये बाजारातील विक्रीदरम्यान हे प्रमाण ११ वर्षांच्या नीचांकी ५६.५ टक्क्यांवर आले होते. यावर्षी सप्टेंबरमध्ये शिखरावर असताना बीएसई सूचिबद्ध कंपन्यांचे एकत्रित बाजार भांडवल ४७४.४ अब्ज रुपयांवर पोहोचले होते. बीएसई सूचिबद्ध कंपन्यांचे एकत्रित बाजार भांडवल डिसेंबर २०२३ अखेरीस ४५३.५ लाख कोटी रुपयांपर्यंत वाढले. २००५ ते २००७ या कालावधीनंतर बाजार भांडवल ते जीडीपी गुणोत्तरासाठी हा दुसरा विजयी सिलसिला आहे. त्यानंतर सलग १३ तिमाहींमध्ये बाजार भांडवल वेगाने वाढले होते. भारताचे मार्केट कॅप ते जीडीपी गुणोत्तर हे प्रमुख अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. विश्लेषक इतर उदयोन्मुख बाजारांच्या तुलनेत भारतातील उच्च प्रमाणाचे श्रेय इक्विटी मूल्यांकनाला देतात. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)


# ‘एका मुंगीचे महाभारत’ मधील शैक्षणिक संदर्भ

**गंगाधर गाडगीळ यांचा जन्म मुंबई या शहरात २५ ऑगस्ट १९२३ रोजी झाला. कथेला नवीन वळण देण्याचे काम गंगाधर गाडगीळ यांनी केलेले आहे. कथा ललित समीक्षा या तिन्हीमध्ये त्यांचा हातखंडा होता. १९९६ चा साहित्य अकादमीचा पुरस्कार त्यांच्या एका मुंगीचे महाभारत हे आत्मकथनाला मिळालेला आहे. एका मुंगीचे महाभारत हे मराठी नवकथेचे शिल्पकार म्हणून ओळखल्या जाणार्या गंगाधर गाडगीळ यांचे आत्मचरित्र. १९९६ साली या आत्मचरित्राला साहित्य अकादमी पुरस्काराने गौरवण्यात आले. ह्या आत्मचरित्राबद्दल स्वत: गाडगीळ म्हणतात, आपलं जीवन ही एक महाभारतासारखीच कथा आहे. अशी उत्कट जाणीव प्रत्येकाला असतेच असं नाही.**

साहित्य शिक्षण
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

माझ्या आसपासचं सर्व जीवन ही एक महान कथा आहे. हा सारा कथासागर आत्मसात करण्यासाठी लागणारी प्रतिभा आणि कर्तृत्व एखाद्या व्यासाला लाभतं. मला त्या गोष्टी लाभलेल्या नाहीत ते उत्तरोत्तर अधिकाधिक जाणवत गेलेलं आहे. पण असं असूनही जिद्द मात्र बाळगली ती व्यासानं केलं तसं काही करण्याची. हे किती हास्यास्पद आहे, किंवा खरं म्हणजे माणसाचं एकंदर जगणंच किती हास्यास्पद आहेत हे कळण्याइतकी विनोदबुद्धी मला सुदैवाने लाभली आहे. पण म्हणून जिद्द काही कमी झाली नाही. आणि म्हणून या आत्मकथेला मी एका मुंगीचे महाभारत म्हटलं आहे.

सामान्य माणसाचे जीवन हे महाभारतापेक्षा कमी नसते असा विचार करून स्वतःच्या आत्मचरित्राला महाभारत म्हणण्याचे काम गंगाधर गाडगीळ यांनी केले आहे. मराठीतील बहुतांश आत्मकथने हे संघर्ष, अशिक्षित आणि दारिद्र्याने पिचलेल्या व्यक्तींनी काळावर मात करत घेतलेली झेप दर्शवणारे आहेत. मात्र गंगाधर गाडगीळ यांचे आत्मकथन हे एका सुखवस्तू मध्यमवर्गीय व्यक्तीचे आत्मकथन आहे असे म्हणावे लागते. मुंबईसारख्या शहरातील वावर आणि मध्यमवर्गीय जीवनशैली यामुळे या आत्मकथनात शिक्षण हा एक महत्त्वाचा भाग आहे. एका मुंगीचे महाभारतमधील शैक्षणिक संदर्भांचा विचार करत असताना आपल्याला गंगाधर गाडगीळांच्या कालखंडातील समाज दर्शन आणि त्या समाजात असलेली शिक्षणाचे स्थान याबाबत माहिती मिळते. एका मुंगीचे महाभारत हा ग्रंथ दोन भागात असून पहिल्या भागातील सोनेरी बालपण या भागामध्ये लेखकाने आपल्या कुटुंबाबद्दल माहिती दिली असून, रामभाऊ गाडगीळ हे एलएलबी झालेले होते. आजच्या काळात जसा जो उठला तो डॉक्टर नाहीतर इंजिनीयर व्हायला पाहतो तसेच त्या काळात जो तो एलएलबी व्हायला पाहत असे असे लेखक संपत तेव्हा आपल्या शिक्षण प्रणालीत बहुतांश मेंढी वळणाने त्या पुढील ध्येय ठरवले जाते असे लेखक सुचवतात. समाजमनात ज्या पेशाबद्दल आदर आहे. त्या पेशाकडे विद्यार्थी वर्ग ओढला जातो, किंवा त्यांचे पालक त्यांना तो अभ्यासक्रम घेण्यास बाध्य करतात. अशावेळी अभिव्यक्ती स्वातंत्र्यानुसार शिक्षण घेणे म्हणजे काय हे आपल्याला शंभर वर्षांपूर्वी कळले नाही आणि आजही कळत नाही असे म्हणावे लागते. या भागात लेखकाच्या वडिलांना म्हणजे गोपाळरावांना शिक्षण घेताना माधुकरी मागणे, पुढे विल्सन कॉलेज मुंबई येथे शिक्षण घेत असताना सुट्टीत शेतावर काम करणे अशा खरतड परिस्थितीत बीए आणि पुढे एलएलबी होणे या बाबींचा लेखकाने उल्लेख केला आहे. रामभाऊ किंवा विद्यार्थ्यांच्या चाळीच्या समोरच्या वाडीत राहणार्या साठे नावाच्या गृहस्थाचा उल्लेख करत त्या काळातील लोक शिक्षणासाठी आपल्या नातलगांच्या लेकरांना शिकवायचे असे दिसून येते. त्यावरून तत्कालीन तत्कालीन समाज व्यवस्थेतील शिक्षणाचे महत्त्व लक्षात येते. लेखकाचा जन्म झाला तेव्हा गोपाळरावांचे वकिली चांगली चालत होती. लेखकाची कुंडली तयार करण्यात आली होती. मात्र, ज्योतिष हे शास्त्र आहे किंवा नाही याबाबत न बोलता लेखकाने, माझं भवितव्य मी




ठरवणार’ या भावनेने जगता आले पाहिजे तर जगण्यात मौज आहे असे सांगितले यावरून ज्योतिष्यासारख्या बाबीवर त्यांचा विश्वास नसावा असे वाटते. बॅरिस्टर असलेल्या गोपाळरावांनी लेखकाला सुद्धा बॅरिस्टर करायचे ठरवले असल्यामुळे त्यांनी त्यांना लवकरच शिकवायला सुरुवात केली. संस्कृतसारखा विषय शिकवायला पंचतंत्राच्या पुस्तकाची मदत होते. इथपासून मुळाक्षरे, त्यांच्यासोबत फिरायला गेले की खगोलशास्त्र अशा विविध बाबींवर चर्चा करून ते मुलांचं ज्ञान वाढवत. सामाजिक आणि सांस्कृतिक गोष्टी रस घेणार्या मंडळीच प्रमाण त्याकाळी कमी असलं तरी जे करत ते निष्ठेने केले जात असे असे लेखकाने या भागात सांगितले आहे. कायद्याचे पुस्तके सोडली तर लेखकाच्या वडिलांच्या संग्रहात लोकमान्य टिळकांचे गीतारहस्य हे एकमेव पुस्तक होते. यावरून टिळकांना सुशिक्षित मंडळी गांभीर्याने घेत हे लक्षात येते.

सोनेरी बालपण या प्रकरणाला लागूनच गंगाधर गाडगीळ आणि शाळेतील दिवस हे प्रकरण लिहिले आहे. यात लेखकाच्या शाळेतील दिवसांच्या आठवणी आणि त्या काळातील शैक्षणिक विचार आपल्याला कळतात. मराठी चार इयत्ता पूर्ण करून मुलाला सरळ इंग्रजी शाळेत घालावे असा विचार लेखकाच्या वडिलांनी केला यावरून त्या काळात इंग्रजी शिक्षणाचे महत्त्व जास्त होते ते आजही आहेच. अनेक लहान मुले शाळेत जाताना घाबरतात मात्र लेखक पहिल्या दिवसापासून शाळेत उत्साहाने जात होते. मात्र पुढे शिक्षकांनी मोडी शिका म्हटले म्हणून मुळी शिकायची, पुस्तकातले पाठवायचे, थोडक्यात विद्यार्थ्यांची अभिरुची लक्षात न घेता सरळसोट शिक्षण दिले जायचे अर्थात त्यात आजही विशेष बदल झाला आहे असे मला वाटत नाही. कविता पाठ करून घेण्याचे काम लेखकाची आई करून घ्यायची. शाळेत धार्मिक शिक्षण दिले जायचे, मिशनऱ्याच्या शाळातून जसे बायबल शिकवले जाईल असे लेखकाच्या शाळेत पहिला तास गीतेचा असे, तुकाराम शिकवले जात, आणि संस्कृतही शिकवले जात असत यावरून धार्मिक शिक्षणाचे त्या काळात महत्व चांगलेच होते.

रामकृष्ण परमहंस आणि गौतम बुद्ध यांचे चरित्रही शिकवले जात, मात्र विद्यार्थ्यांचे वय आणि धार्मिक शिक्षण यांचा मेळ बसत नसे, कधी कधी विषय कसा शिकवावा ते मास्तरांना कळत नसे असेही लेखक सांगतात. त्यातल्या त्यात इंग्रजी कविता शिकवणारे नाईक सर, देवल सर, चित्रे मास्तर, रानडे सर असे लोक लेखकाच्या लक्षात राहिले. शाळेत उद्योग शाळा असायची त्यात कागदाची फुले तयार करणे, प्लायवूडच्या वस्तू तयार करणे यासह वक्तृत्व स्पर्धा, गायन वादन अशा बाबी शिकवल्या जात, यावरून त्या काळातच सर्वांगीण शिक्षण दिले जात असे हे लक्षात येते. आपले मुलं कॉम्प्युटर चालवतात हे पाहून आपण हे कॉम्प्युटर चालवावे असे लेखकाला वाटते. यावरून लेखकातील विद्यार्थी अजूनही जिवंत आहे हे लक्षात येते. सायकल चालवणे, पोहायला शिकवणे अशा अनेक गोष्टी शिकायला त्या काळात प्राधान्य दिले जायचे. नाथ माधव हरिभाऊ यांच्या कादंबरी लेखक वाचू लागले, शिवाजी महाराजांच्या कथा वाचून लेखकाने घोडा मागणे आणि त्यांच्या वडिलांनी तट्टू खरेदी करून आणणे अशा प्रसंगातून लेखक किती सुखव वस्तू घरातील होते ते आपल्याला समजते. नाईट स्कूलच्या मदतीसाठी गोपाळरावांनी भावबंधन आणि बेबंदशाही अशी नाटके विद्यार्थ्यांकडून बसून घेतली आणि ऑपेरा हाऊसमध्ये त्याचे प्रयोग केले. अशा प्रसंगातून रात्र शाळेचे महत्त्व, कलेच्या माध्यमातून आर्थिक उभारणी अशा बाबींना त्या काळात चांगलेच महत्त्व होते असे लक्षात येते. लेखकाची आई कुशाग्र बुद्धीची होती. शाळेत तिचा नेहमी पहिला नंबर यायचा, शाळा तपासणीसाने तिला बक्षीस दिलेले होते मात्र, आमची हुशारी सगळी चुलीत जायची, असे वाक्य जेव्हा ती बोलायची तेव्हा स्त्रियांची बुद्धिमत्ता वस्तू कुटुंबातही गुदमरून जायची हे लक्षात घ्यावे लागते. वाचनाची सवय लेखकाला त्यांच्या आईकडून मिळाली असे ते म्हणतात.

शाळेच्या ग्रंथालयातून हवी ती पुस्तके लवकर मिळावे म्हणून मधल्या सुट्टीत लेखक तेथे स्वयंसेवक म्हणून काम करू लागले. मधल्या सुट्टीचा खेळण्याचा वेळ प्रसंगी जेवणाकडे दुर्लक्ष करून त्या ग्रंथालयात पुस्तकाच्या सहवासात राहू लागले. क्रिकेटच्या मैदानावर पुस्तक वाचण्याचे काम लेखक करू लागले त्यावेळी इतर मुले त्रास देतात म्हणून त्यांनी मैदानावरील खेळणे बंद करून पुस्तक वाचण्यात गढून जाण्यात आनंद मानला. शाळेत असतानाच तात्यासाहेब केळकर, सावरकर, या साहित्यिकांसह सुभाषचंद्र बोस आदी विभूतींना त्यांनी शाळेतच जवळून पाहिले. लेखकाने शाळेत असताना जे लिखाण केले त्याचे शाळेतील शिक्षकांनी भरपूर कौतुक केले. मुलांच्या प्रतिभेला प्रोत्साहन देण्याचे काम त्या काळातील शिक्षक करत असत असे आपल्या लक्षात येत. शाळेमध्ये मुले हरताळ करत असत, त्या मागचे कारण देशभक्ती हे असे. देशप्रेमाचे बाळकडू त्या पिढीतील लोकांना त्यांच्या शाळेतच मिळत असे. लेखकाच्या नात्यातले एका मुलाने मॅट्रिक झाल्यावर नोकरी नाही म्हणून अफू खाऊन जीव देण्याचा प्रयत्न केला असा उल्लेख लेखक जेव्हा करतात तेव्हा सुशिक्षित बेरोजगारी ही समस्या आपल्या देशात फार पूर्वीपासून आहे हे लक्षात घ्यावे लागते. त्या काळात मुली शाळेत जात असत पण पुढे लवकर लग्न झाले म्हणून त्यांची नावे काढून घेतली जात असत. लग्नाला प्राधान्य देता मुलींचे शिक्षणाकडे दुर्लक्ष होत असे. मॅट्रिक नंतर लेखक विल्सन कॉलेज इथे पुणे शिक्षणासाठी गेले. तेथे शिकवणारे बहुतांश शिक्षक मराठी होते. कॉलेजमध्ये मुलींचे प्रमाण फार कमी असायचे. (पूर्वार्ध)

पान १ वरून

## कटकारस्थान ओळखणे गरजेचे

मंत्रिमंडळाचे खातेवाटप जाहीर झालेले नसले, तरी आज जगामध्ये, विशेषत: मध्य पूर्वेमध्ये अत्यंत अस्थिर परिस्थिती आहे. एकीकडे गाझामध्ये इस्रायलचे हमासविरुद्ध युद्ध सुरू आहे तर दुसरीकडे इस्रायलने लेबनॉनमध्ये हल्ले करून इराणसमर्थित हिजबुल्लाहच्या विरोधात मोहीम सुरू केली आहे. हिजबुल्लाहला सीरियामार्गे इराणकडून शस्त्रास्त्रे पुरवली जात होती. परंतु, गेल्या काही दिवसांमध्ये सीरियातील इराणधार्जिणे सरकार कोसळल्याम ळे इस्रायलचा मार्ग सुकर झाला आहे. बांगलादेश, लीबिया आणि इराकमध्ये पाश्चिमात्य गुप्तचर संघटनांनी वापरलेले डावपेचच आज सीरियामध्येही वापरले गेले आहेत. सीरियातील उठावामागे तुर्कस्थान असल्याचे मानले जाते. त्यामुळे भविष्यकाळात सीरियाचे सरकार कोणत्या दिशेने जाईल, हे सांगणे कठीण आहे. मध्यपूर्वेत इस्लामी जगाचे नेतृत्व करण्यासाठी इराण, तुर्कस्थान आणि सौदी अरेबिया या तिन्ही देशांमध्ये चढाओढ सुरू आहे. सीरियातील ताज्या घटनांवर त्याचेच प्रतिबिंब पडले आहे. त्यातच असद शियापंथी तर त्यांचे बहुतांश विरोधक सुन्नी पंथी आहेत.




त्यामुळे नजिकच्या काळात सीरियामध्ये शिया-सुन्नी संघर्ष पाहायला मिळाला तर नवल नाही. जगात हे सर्व घडत असताना पाश्चिमात्य देश भारतातही अराजक माजवून प्रगतीमध्ये खीळ घालण्याचा प्रयत्न करीत आहेत. हे सर्व भारतीयांनी ओळखणे गरजेचे आहे. देशहितापुढे सरकारी पक्ष वा विरोधी पक्षामध्ये मतभेद असणे देशाला परवडणारे नाही.

## कळवळा नव्हे ढोंग



नागपूर येथे नुकतेच उद्धव ठाकरेंनी पत्रकार परिषद घेतनेहमीप्रमाणे आपल्या टोमणेदार शैलीत त्यांनी सरकारवर निशाणा साधला. खातेवाटप, लाडकी बहीण, एक देश, एक निवडणूक, सावरकर ते अगदी नेहरुंपर्यंत ठाकरेंनी सर्वच विषयांवर भाष्य केले. यावेळी बोलताना ठाकरे म्हणाले की, वन नेशन, वन इलेक्शनच्या आधी निवडणूक प्रक्रिया ही पारदर्शक झाली पाहिजे. माझं तर असं स्पष्ट मत आहे की, निवडणूक आयुक्त हेदेखील निवडणुकीतून निवडले गेले पाहिजेत. एवढेच नाही, तर निवडणूक आयुक्त हे नेमले जाणार असतील आणि ते जर आम्हाला निवडणुकीचे कायदे शिकवणार असतील, तर ती प्रथा योग्य नाही. अशा व्यक्तीच्या अधिपत्याखाली ‘वन नेशन, वन इलेक्शन’ होता कामा नये. निवडणूक आयुक्तसुद्धा निवडून आला पाहिजे, तरच त्याला निवडणूक आयुक्त मानलं पाहिजे. मग त्याच न्यायाने जनतेमधून निवडून आलेल्या व्यक्तीनेच राज्याच्या मुख्यमंत्रिपदाची धुरा सांभाळली पाहिजे, हेही उद्धव ठाकरे मान्य करणार का?

ठाकरे आज विधिमंडळाचे सदस्य असले तरी ते लोकांमधून, मतदान प्रक्रियेतून निवडून आलेले नाहीत. मविआ सरकारच्या काळात विधान परिषदेतील आमदारकीवर ठाकरे मुख्यमंत्री झाले. पण, याचा ठाकरेंना आता सोयीस्कर विसर पडलेला दिसतो. म्हणूनच निवडणूक आयुक्त हे निवडणूक प्रक्रियेतून निवडावे, असे अतर्क्य विधान करताना ठाकरेंना काहीच गैर वाटले नसावे. पण, त्यांचे हे वक्तव्य निवडणूक आयोग, निवडणूक आयुक्त आणि पर्यायाने लोकशाही व्यवस्थेविषयी सर्वस्वी अविश्वास व्यक्त करणारेच आहे. म्हणा, विधानसभा निवडणुकीच्या काळात निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांनी बॅग तपासणी केल्यानंतर, ठाकरेंचा अनावर झालेला संताप अवघ्या महाराष्ट्राने पाहिला.

‘आता माझा टॉयलेट पॉटही तपासा’ अशा अत्यंत खालच्या शब्दांत आपले कर्तव्य निभावणाऱ्या निवडणूक आयोगाच्या कर्मचाऱ्यांना ठाकरेंनी अपमानित केले. पोलिसांनाही ‘तुम्हाला बघून घेऊ’ म्हणून उघड धमक्या दिल्या. त्यामुळे निवडणूक आयोग, प्रशासकीय अधिकारी, पोलीस व्यवस्था यांसारख्या लोकशाही व्यवस्थांप्रति ठाकरेंचे विचार आणि मविआ काळातील या यंत्रणाचा केलेला गैरवापरही जगजाहीरच! त्यामुळे ठाकरेंनी आपण लोकशाही, संविधानाचे रक्षक असल्याचे सोंग घेणे बंद करावे.

## कटकारस्थान ओळखणे गरजेचे

आज जगामध्ये, विशेषत: मध्य पूर्वेमध्ये अत्यंत अस्थिर परिस्थिती आहे. एकीकडे गाझामध्ये इस्रायलचे हमासविरुद्ध युद्ध सुरू आहे तर दुसरीकडे इस्रायलने लेबनॉनमध्ये हल्ले करून इराणसमर्थित हिजबुल्लाहच्या विरोधात मोहीम सुरू केली आहे. हिजबुल्लाहला सीरियामार्गे इराणकडून शस्त्रास्त्रे पुरवली जात होती. परंतु, गेल्या काही दिवसांमध्ये सीरियातील इराणधार्जिणे सरकार कोसळल्यामुळे इस्रायलचा मार्ग सुकर झाला आहे. बांगलादेश, लीबिया आणि इराकमध्ये पाश्चिमात्य गुप्तचर संघटनांनी वापरलेले डावपेचच आज सीरियामध्येही वापरले गेले आहेत. सीरियातील उठावामागे तुर्कस्थान असल्याचे मानले जाते. त्यामुळे भविष्यकाळात सीरियाचे सरकार कोणत्या दिशेने जाईल, हे सांगणे कठीण आहे.

मध्यपूर्वेत इस्लामी जगाचे नेतृत्व करण्यासाठी इराण, तुर्कस्थान आणि सौदी अरेबिया या तिन्ही देशांमध्ये चढाओढ सुरू आहे. सीरियातील ताज्या घटनांवर त्याचेच प्रतिबिंब पडले आहे. त्यातच असद शियापंथी तर त्यांचे बहुतांश विरोधक सुन्नी पंथी आहेत. त्यामुळे नजिकच्या काळात सीरियामध्ये शिया-सुन्नी संघर्ष पाहायला मिळाला तर नवल नाही. जगात हे सर्व घडत असताना पाश्चिमात्य देश भारतातही अराजक माजवून प्रगतीमध्ये खीळ घालण्याचा प्रयत्न करीत आहेत. हे सर्व भारतीयांनी ओळखणे गरजेचे आहे. देशहितापुढे सरकारी पक्ष वा विरोधी पक्षामध्ये मतभेद असणे देशाला परवडणारे नाही.

## at एनी कॉस्ट

पुस्तक परिक्षण
चन्द्रशेखर टिळक
भ्र. ९८२०२९२३७६

अगदीं आत्ताच एका पूर्णपणे वेगळ्या संदर्भात कोरियन अर्थव्यवस्था आणि जागतिक क्रमवारीत त्याचे सुधारते स्थान या विषयावर एक लेख लिहित होतो. त्यावेळी लक्षात आलेली गोष्ट म्हणजे कोरिया (अर्थातच दक्षिण कोरिया) अर्थव्यवस्था सुधारण्यात वाढती विदेशी गुंतवणूक या घटकाचा फार महत्त्वाचा मोठा वाटा आहे. अशा गुंतवणुकीत करमणूक क्षेत्राचा, विशेषत: TV मालिका फार महत्त्वाचा वाटा आहे. आणि अशा पध्दतीने स्वतःच्या करमणूक क्षेत्रात अशी विदेशी गुंतवणुकीचा ओघ लक्षणीय स्वरूपात खेचण्यासाठी कोरियन सरकारने स्वतःच्या करमणूक क्षेत्राची के कल्चरच्या नावाखाली पद्धतशीरपणे जागतिक पातळीवर जाहिरात केली आहे.




या के कल्चरचे महत्त्वाचे वैशिष्ट्य हे आहे की कोणतीही कोरियन दूरदर्शन मालिका कधीही १९ भागापेक्षा जास्त भागांची नसते आणि यातला कोणताही एकही भाग कधीही कधीच सव्वा तास या वेळेपेक्षा जास्त मिनिटाचा नसतो. एकोणीस भाग मिळून जास्तीत जास्त २० तासांचीच मालिका हा त्यांचा अलिखित, पण न चुकता पाळला जाणारा असा नियम आहे. हे लक्षात आले आणि मला देशातील अशा मालिकांचे स्मरण झाले. आणि अशावेळी मला पटकन आठवले ते अभिराम भडकमकर यांची जानेवारी २०१५ मध्ये पहिली आवृत्ती आणि जानेवारी २०१७ मध्ये तिसरी आवृत्ती प्रसिद्ध झालेली ॲट एनी कॉस्ट ही ३७२ पानी कादंबरी आठवली. (किंमत ३२५ रुपये). एक सांगू? हा कोरियन अर्थव्यवस्थेचा लेख मी लिहीत होतो तेव्हा मी रात्रभर कारने प्रवास करत होतो. बाहेरच्या अंधारात अधूनमधून काजवे चमकत होते. आणि ते काजवे बघून अभिराम भडकमकर यांच्या ॲट एनी कॉस्ट पुस्तकातले वाक्य मनात चमकायला लागले. त्या पुस्तकात अभिराम भडकमकर एके ठिकाणी म्हणतात, काजवे म्हणजे निसर्गाचे आधारावरचे स्मितहास्य! म्हणून राजहंस प्रकाशनने प्रसिद्ध केलेली ही कादंबरी पुन्हा एकदा वाचली.

काय गंमत आहे पाहा! खरं म्हणजे अभिराम भडकमकर यांची सगळ्यात आधी ॲट एनी कॉस्ट ही कादंबरी २०१५ साली प्रकाशित झाली. मग २०२० साली इन्शाअल्लाह आणि त्यानंतर २०२४ साली सीता. पण गेल्या महिनाभरात माझ्याकडून सीता, इन्शाअल्लाह, ॲट एनी कॉस्ट या उलट्या क्रमाने त्यांची पुस्तके वाचली गेली. असो. तशीही ही कादंबरी विधानसभेची निवडणूक झाल्यापासून, विशेषत: या निवडणुकीचे निकाल लागल्यापासून तर फारच आठवत होती. या निवडणूक निकालात महायुतीला इतके निर्विवाद बहुमत मिळूनही मुख्यमंत्री ठरवण्यात झालेला विलंब, हा निर्णय झाल्यानंतरही मंत्रिमंडळाचे सदस्य आणि खातेवाटप याबाबतही सुरू असलेली चर्चा या पार्श्वभूमीवर अभिराम भडकमकर यांच्या ॲट एनी कॉस्ट या कादंबरीतील एक वाक्य तर मला फारच आठवत होते. अगदीं निष्कारण म्हणालात तरी चालेल...अभिराम भडकमकर असे लिहितात, गिधाडांनी वाघाच्या शिकारीतील उरलेले जमेल तितके लंपास करून खावे. वाघाशीच झुंज देण्याचा गाढवपणा करु नये. या कादंबरीत अरविंद नावाचे एक व्यक्तिमत्त्व रंगवले आहे. ज्याची मूळची पार्श्वभूमी रंगभूमीची आहे. वैचारिक वारसा वगैरे गोष्टी ज्याच्या डोक्यात धुमाकूळ घालत राहतात असे हे व्यक्तिमत्त्व आहे. काही विचाराअंती तो नाट्य क्षेत्र सोडून मालिकांच्या दुनियेत येतो. तसे कुठेही स्पष्ट सांगितले नसले तरी कादंबरीचा बराचसा भाग हा तुमच्या- माझ्यासारखा सर्वसामान्य वाचक या अरविंदच्या नजरेतून, शब्दातून वाचत राहतो.

सदसद्विवेकबुद्धी बुद्धी जागृत असल्याने स्वतःला प्रश्न पडण्याची आणि ते निदान स्वतःला विचारण्याची सवय असणारा असे स्वतःचे वर्णन करून घ्यायला आपल्या सगळ्यानाच आवडत असते. हा अरविंद नेमका तसाच आहे. कादंबरीच्या शेवटच्या टप्प्यावर तोच या क्षेत्राचा अविभाज्य भाग झाल्यासारखा प्रश्नाचे उत्तर शोधून देतो आणि त्यामुळे स्वतःला यशस्वी समजतो. हे तर एकदम आपल्या सगळ्यांच्याच व्यावसायिक आयुष्याचे यथार्थ चित्रण वाटायला लागते. आवडो, न आवडो; तो महिन्याचा पगार देतो अशी आपल्या आपल्या बॉसविषयीची भावना पदोपदी जाणवत राहते. का कोण जाणे? पण या कादंबरीत असणारे अरविंद हे पात्र वाचत असताना मला राहून राहून निर्मला देशपांडे यांच्या टिकली येवढं तळ या जुन्या कादंबरीतले निशिकांत हे व्यक्तिमत्त्व सारखे आठवत होते. या पुस्तकाचा सगळ्यात लक्षणीय भाग म्हणजे मालिका सुरू करणे आणि मालिका सुरू ठेवणे या दोन्हीत असणारी अस्सल व्यावसायिक गणिते या विषयाची झालेली मांडणी! अशा मालिकांचा चित्रीकरणाच्या निमित्ताने एखाद्या ठिकाणी तीन-चार महिने मुक्काम पडला की तिथली स्थानिक अर्थकारणाची समीकरणे कशी बदलत जातात आणि बदलत राहतात याचे प्रत्ययकारी वर्णन व चित्रण हा या कादंबरीचा लक्षणीय पैलू आहे. रामायण मालिका सुरू असताना बदललेले उंबरगाव, चॅनल्सची वाढती संख्या आणि त्यांचे अहोरात्र प्रक्षेपण व त्याआधी चित्रीकरण यातून ठाणे ते बोरिवली या घोडबंदर पट्ट्यात निर्माण झालेले असंख्य स्टुडिओ आणि त्यातून तिथले बदललेले अर्थकारण याची संगती ही कादंबरी वाचताना नकळत लागत जाते. अगदी तो या कादंबरीचा उद्देश नसला तरी! आता हे पुस्तक वाचावे असे वाटण्याचे अजून एक कारण म्हणजे या पुस्तकाचे लेखक सध्या गाजत असलेल्या संयुक्त मानापमानची गोष्ट या नाटकाशीही संबंधित आहेत. या नाटकाचे दोन महानायक स्वर्गीय केशवराव भोसले आणि बालगंधर्व हे त्यांच्या काळातील माध्यमांतरचे साथीदार आणि साक्षीदार आहेत. नाटकाकडून सिनेमाकडे असे ते माध्यमांतर! तर ॲट एनी कॉस्ट या पुस्तकाचा विषय आहे दुसरे माध्यमांतर... सिनेमाकडून दूरदर्शनकडे आणि एकमेव अशा दूरदर्शनकडून असंख्य अशा वाहिन्याकडे असे हे माध्यमांतर!

या पुस्तकात अशा बदलाचे वर्णन करताना अभिराम भडकमकर लिहितात...फक्त नवे माध्यम आलेले नाहीये. फक्त व्यक्ततेच माध्यमच बदललेले नाहीये तर व्यक्ततेच्या सगळ्या आपल्या जुन्या समजुती आणि निकषच मुळापासून हलताहेत माझ्या ४० वर्षाच्या व्यावसायिक आयुष्यात मी वित्तीय सेवा क्षेत्रातील प्रत्येक बदलाचा साक्षीदार, साथीदार असल्याने मला या पुस्तकाचा हा पैलू अगदीं मनापासून पटला आहे. हे पुस्तक प्रकाशित झाल्या झाल्या मी हे पुस्तक वाचले होते. आत्ता परत वाचले.

या दोन्हींवेळा माझ्या मनात आले की एकंदरीतच आपल्या सर्वांच्याच आयुष्यात आधीं व्हॉट्सप, फेसबुक, इंस्टाग्रामसारखी समाज- माध्यमे आणि आता कृत्रिम बुद्धिमत्ता यातून जे स्थित्यंतर घडले आहे आणि घडू घातले आहे त्याच्याशी या पुस्तकाचा आशय ताडून पाहाणे फार महत्त्वाचे आहे. अभिराम भडकमकर सर, तुम्ही या विषयावर तुमची पुढची कादंबरी लिहा प्लिज! अगदीं रीं एनी कॉस्ट! असे वाटण्याचे कारण म्हणजे कोणत्याही माध्यमांतर होण्याच्या काळात आपल्या सारख्या सर्वार्थाने मध्यमवर्गीय, मध्यममार्गीय माणसे आपल्या अस्तित्वाची खूणगाठ शोधत असतो. या पुस्तकात अशा परिस्थितीत कसे जगायचे, कसे वागायचे याबाबत भाश्य करताना असे म्हणले आहे. इथे टिकायचे तर पाठीचा कणा लवचिक हवा. कुणासमोरही झुकेल असा आणि जिभेला हाड असता कामा नये. कुणाच्याही स्तुतीसाठी तिला एका क्षणात सज्ज व्हायला हवे, आता यावर वेगळे काय...

(पान ६ वर)

आज आपण पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी श्रीक्षेत्र पंढरपूरमध्ये चंद्रभागा घाटावर स्थापित राम मंदिराची माहिती घेऊ. पु.अहिल्यादेवींचे त्रिशताब्दी वर्ष सर्वत्र साजरे चंद्रभागा घाटावर स्थापित राम मंदिराची माहिती घेऊ. पु.अहिल्यादेवी या शिवभक्त होत्या व त्यांनी सोमनाथ ते काशी विश्वनाथ अशा सर्व ज्योतिर्लिंग मंदिरांचा जीर्णोद्धार केला हे सर्वश्रुत आहे. पण त्यांनी पंढरपूरमध्ये स्थापन केलेले 'राम मंदिर' फारसे परिचित नाही.

लेखांक ५०

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी स्थापित 'होळकर राम मंदिर, पंढरपूर'

...रघुनंदन
विद्याधर ताठे
भ्र.९८८१९०९७७५

**बरवे बरवे पंढरपूर। विठुरायाचे नगर।**

भूवैकुंठ म्हणून संतांनी गौरव केलेले श्रीक्षेत्र पंढरपूर म्हणजे वारकरी भक्त-भाविकांच्या लाडक्या विठुरायाचे नगर. संतांचे माहेर. मंदिरे आणि असंख्य मठांचे गाव. विठ्ठल हा समस्त मराठी माणसांचा देव आहे. १२ व्या शतकातील देवगिरीच्या यादव राजघराण्यापासून ते थेट छ. शिवाजीमहाराज, शाहू महाराज, श्रीमंत पेशवे यांच्यापर्यंत सकल राजे, सरदार यांनी विठ्ठलमंदिरास वेळोवेळी देणग्या देऊन मंदिराचा विकास व विस्तार केलेला आहे.

एवढेच नव्हे तर परोपकार म्हणून अनेक धर्मशाळाही बांधल्या आहेत. विठ्ठलभक्तांच्या सोईसाठी बहुतेक सर्वच राजांनी व सरदारांनी पंढरपुरात छोटी-मोठी जनसेवेची कार्ये केलेली आहेत. त्यामध्ये इंदोरच्या पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी चंद्रभागा नदीच्या महाद्वार घाटावर बांधलेले श्रीराम मंदिर विशेष आहे. महाद्वार घाटांच्या डाव्या बाजूला शिंदे सरकारांचे द्वारकाधीश श्रीकृष्ण मंदिर आहे तर उजवीकडे भव्य असे पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांनी स्थापित 'श्रीराम मंदिर' डोळ्यात आहे.


पु. अहिल्यादेवी होळकर यांच्या घराण्यात पंढरीची वारी होती, विठ्ठलाच्या विष्णु-शिव एकरूप हरिहर स्वरूपावर त्यांची विशेष भक्ती होती. 'शिव तोचि विष्णु आणि विष्णु तोचि शिव' असा समन्वयी अद्वैत भक्ती विचार पु. अहिल्यादेवींच्या एकूण धर्मकार्याचे अधिष्ठान होते. म्हणूनच देशभर शिव मंदिरांचा भव्य दिव्य रूपात जीर्णोद्धार करून स्वधर्माचा स्वाभिमान जपणाऱ्या शिवभक्त पु.अहिल्यादेवींनी पंढरपूरमध्ये श्रीविष्णुचा अवतार असलेल्या श्रीराम मंदिराची स्थापना केली. हा त्यांचा धार्मिक समन्वयाचा विचार हिंदू ऐक्य निर्माण करणारा राष्ट्रविचारच होता. पुण्यश्लोक अहिल्याबाई यांचा जन्म महाराष्ट्रात चौंडी येथे झाला असून त्या महाराष्ट्र कन्या आहेत.

इ.स.१७६६ ते १७९५ अशी ३० वर्षे त्यांनी 'महेश्वर' येथून राज्यकारभार केला. त्या धर्मपरायण व प्रजा वत्सल राज्ञी होत्या. त्यांनी शेकडो मंदिरांचा जीर्णोद्धार केला व इस्लामी धर्मांध आक्रमकांनी उध्वस्त केलेल्या हिंदू मानचिन्हांची स्वाभिमानपूर्वक पुनःश्च प्रतिस्थापना केली. या साऱ्या धार्मिक दानधर्म व जीर्णोद्धारासाठीचा पैसा त्यांनी आपल्या खाजगी जहागिरीच्या उत्पन्नातून केला. 'इंदूर होळकर स्टेट'चा एक पै ही खर्च केला नाही. हा त्यांचा आदर्श सर्व सत्ताधिशांनी अनुकरण करावा असा वस्तुपाठ आहे. अशा शिवभक्त अहिल्याबाई यांचा पंढरपूरमध्ये भव्य वाडा व शिवमंदिरच बांधण्याचा विचार होता. पण त्यांच्या हातून श्रीराम मंदिर निर्माण झाले त्याची एक आश्चर्यकारक आख्यायिका आहे.

पु.अहिल्याबाईंना मुळातच अनेक मंदिरे असलेल्या पंढरपूरात केवळ आणखी एका मंदिराची भर घालायची नव्हती तर पंढरपूरच्या प्रमुख ४ यात्रांना जमणाऱ्या लाखो वारकऱ्यांच्या सोईसाठी एक मोठी धर्मशाळा, निवासस्थान वाडा बांधायचा होता. त्या वाड्याचे बांधकामाच्या पायासाठी जमिनीत खोदकाम करताना कामगारांना एक मारूतीची सुंदर वैशिष्ट्यपूर्व अशी मूर्ती सापडली. तेव्हा हा एक ईश्वरी संकेत आहे असे वाटून त्यांनी भव्य वाड्याच्या एका भागात 'श्रीराम- सीता-हनुमंताचे' मंदिर बांधण्याचा मनोदय केला आणि विठुरायाच्या पंढरीनगरीमध्ये श्रीराम-सीता मंदिराची पायाभरणी झाली.

इ.स.१७५४ मध्ये ही भूमीपूजनाची ऐतिहासिक घटना घडली. अखेर १२-१३ वर्षांनी ते काम पूर्णत्वास जाऊन इ.स.१७६७ मध्ये चैत्र पाडव्याला वास्तुशांती होऊन वाड्यावर भव्य गुढी उभारली गेली आणि श्रीराम मंदिराची प्राणप्रतिष्ठा संपन्न होऊन मंदिर लोकार्पण करण्यात आले.









चैत्र पाडवा ते हनुमान जयंती राजेशाही थाटात पहिला 'रामनवमी उत्सव' साजरा झाला. ती रामनवमी जन्मोत्सवाची परंपरा २५७ वर्षे झाली आजही अखंड, अव्याहत सुरू आहे.पहिल्या रामनवमी उत्सवाला व मंदिर उद्‌घाटनास स्वतः अहिल्याबाई,त्यांचे राजदरबारी मानकरी, पेशव्यांचे प्रतिनिधी, अनेक सरदार, जहागिरदार एवढेच नव्हे तर छ.शिवाजी महाराजांच्या सातारा गादीचे श्रीमंत छ.शाहूजी महाराज स्वतः जातीने उपस्थित होते. या उत्सवानिमित्त अहिल्यादेवींनी खूप मोठा दानधर्म केला. पुढे सुमारे एक महिनाभर अहिल्याबाईंनी पंढरपुरातच मुक्कम केला आणि विठ्ठलभक्तीच्या आनंदकल्लोळात आत्मानंदाचा अनुभव घेत त्यांनी नामभक्ती साधना केली.

महाद्वार घाट ते कुंभारघाट अशा या विस्तीर्ण होळकरवाड्याच्या दक्षिण भागामध्ये हे श्रीराम मंदिर असून मुख्य वाड्यातून ५-७ पायऱ्या उतरून राम मंदिरामध्ये प्रवेश करता येतो. गाभारा, दोन वेगवेगळे मंडप आणि राम मंदिर गाभाऱ्या समोर स्वतंत्र मंडपातील हनुमान मंदिर अशी या देवळाची रचना आहे. गाभारा ४-५ फूट उंच असून गाभाऱ्यात ३ फुटी चौथऱ्यावर श्रीराम, सीता, लक्ष्मणाच्या संगमरवरी सुंदर मूर्ती आहेत. पु.अहिल्यादेवींच्या निर्वाणानंतर दोन वर्षांनी गाभाऱ्यात श्रीराम चरणाजवळच अहिल्यादेवींची हात जोडलेली मूर्ती काशीराव दादा होळकर यांच्या हस्ते स्थापन करण्यात आली आहे. गाभाऱ्यास स्वतंत्र प्रदक्षिणा मार्ग आहे. पु. अहिल्याबाई यांनी बांधलेला हा ऐतिहासिक वाडा दोन एकर जागेत पसरला असून दोन चौकांचा आणि १२५ खणांचा लाकडी वाडा आहे. इ.स.१९६६ पर्यंत या होळकर वाड्यात वारकरी भाविकांची विनामूल्य राहण्याची व भोजनाची व्यवस्था सुरू होती. संस्थाने खालसा झाल्यानंतर ती व्यवस्था बंद पडली.रामा समोरील मंडपात स्वतंत्र गाभाऱ्यात मारुतीची स्थापना केलेली आहे. ही मारुती मूर्ती वैशिष्ट्यपूर्ण दासमारुती प्रकारची आहे. त्याला त्याचे वैशिष्ट्यपूर्ण रूप पाहून श्री 'विठ्ठलावतारी मारुती' म्हणतात. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या परोपकारी धार्मिक कार्यांपैकी एक कार्य, पंढरपूरश्रेत्री 'होळकर वाडा व श्रीराम-विठ्ठलावतारी मारुती' मंदिर रूपाने आपल्याला पुढे प्रेरणाचा नंदादीप आहे.

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

(भाग २७)

थोडं मनातलं
विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२



एखाद्या साहित्यिकाने साहित्यनिर्मिती किती केली किंवा त्याच्या साहित्यकृतीची संख्या किती आहे त्यापेक्षाही त्या कशा आहेत हे जास्त महत्त्वाचे. म्हणूनच साहित्यनिर्मिती हा हृदयसंवाद आहे असे रवींद्रनाथ म्हणत. ऋषिकेश मुखर्जींच्या 'आनंद' या चित्रपटात राजेश खन्नाच्या तोंडी एक वाक्य आहे, जिंदगी लंबी नही, बडी होनी चाहिये.

थोडक्यात म्हणजे आयुष्य असो की साहित्य, त्याच्या लांबीपेक्षा त्याची खोली, सकसता अधिक महत्त्वाची. या अर्थाने रवींद्रनाथांच्या सगळ्या साहित्यकृती लार्जर दॅन लाईफ अशा आहेत असं म्हणता येईल. त्यातही त्यांच्या स्वभावातील खेळकरपणा, त्यांची सौंदर्यासक्ती, जीवनाचे आणि जगण्याचे तत्त्वज्ञान उलगडून सांगणारा त्यांच्यातील तत्त्वचिंतक या सगळ्या गोष्टींना मुक्तपणे व्यक्त होण्यासाठी नाटक हे सशक्त माध्यम होते आणि त्याचा त्यांनी अतिशय सुयोग्य वापर करून घेतला. रवींद्रनाथ म्हणजे बहुश्रुत व्यक्तिमत्व होते. लोकसाहित्य, लोकनाट्य, परंपरा, रामायण महाभारतासारख्या विविध धार्मिक ग्रंथांचे वाचन यातून त्यांचे व्यक्तिमत्व घडत गेले. त्याशिवाय त्यांच्या घरातील वातावरण त्यांच्या साहित्यनिर्मितीसाठी पूरक ठरले. लहानपणी लोकनाट्याचे अनेक प्रयोग त्यांनी पाहिले होते. त्याचप्रमाणे अनेक संस्कृत नाटके वाचली होती, अभ्यासली होती. या सगळ्यांच्या निरीक्षणातून त्यांची स्वतःची एक वेगळी नाटकाची मांडणी, वेगळी शैली जन्माला आली पारंपारिक रंगमंच आणि नेपथ्याच्या मर्यादा ओलांडून त्यांनी स्वतंत्रपणे आपल्या नाटकांची मांडणी केली. त्यांचा मुळातच असलेला कवीचा पिंड या मांडणीसाठी पोषक ठरला. वयाच्या केवळ २० व्या वर्षी त्यांनी लिहिलेले 'वाल्मिकी प्रतिभा' हे संगीत नाटक रंगमंचावर आले. या नाटकात त्यांनी स्वतः वाल्मिकीची भूमिका केली होती तर त्यांची पुतणी प्रतिभा हिने सरस्वतीची भूमिका केली होती. या नाटकाच्या पहिल्या प्रयोगाला तत्कालीन श्रेष्ठ बंगाली कादंबरीकार बंकिमचंद्र चटर्जी उपस्थित होते.

'वाल्मिकी प्रतिभा' हे नाटक अनेक अर्थांनी आगळेवेगळे आहे. वाल्या कोळी वाल्मिकी ऋषी होण्याआधी एक दरोडेखोर होता हे आपल्या सगळ्यांना माहिती आहे. ब्रह्मदेव आणि नारदांच्या आज्ञेनुसार त्यांनी 'रामायणाची' रचना केली. परंतु ही रचना करण्याआधी त्यांनी क्रौंच पक्षाचे एक जोडपे एका झाडावर बसलेले पाहिले. त्या आपल्या आनंदात निमग्न असणार्या एका पक्ष्याला एका शिकार्याने बाण मारला. त्यामुळे त्या दुसर्या पक्ष्याचा विलाप पाहून वाल्मिकींचे हृदय द्रवले आणि त्यांच्या तोंडून रामायणातील तो प्रसिद्ध श्लोक बाहेर पडला.

**मा निषाद प्रतिष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः।**
**यत्क्रौंचमिथुनादेकमवधी काममोहितम्।।**

कधी नव्हे तो आपल्या तोंडून अशा प्रकारची सुंदर रचना कशी काय बाहेर पडली याचे त्यांना नवल वाटले. त्यानंतर त्यांनी ब्रम्हदेव आणि नारदांच्या आशीर्वादाने रामायणाची रचना केली हे आपल्या सगळ्यांना माहिती आहे. ही जी मूळ घटना आहे, ती रवींद्रनाथांना मान्य होती. पण आपल्या नाटकात त्या घटनेला त्यांनी वेगळीच कलाटणी दिली. त्यांच्या 'वाल्मिकी प्रतिभा' या नाटकात वाल्या आणि त्याचे साथीदार यांची दरोडेखोरांची एक टोळी असते. ही सगळी मंडळी अत्यंत क्रूर आणि आडदांड असतात. ते प्रतिभा नावाच्या एका निरागस मुलीला पकडून आणतात आणि कालीमातेपुढे तिचा बळी देण्याचं ठरवतात. या निष्पाप मुलीचा आक्रोश ऐकून वाल्याचे हृदय द्रवते. तो आपल्या साथीदारांशी वैर पत्करून तिची सुटका करतो. टोळीतील सहकार्यांना सोडून देऊन तिला घेऊन रानोमाळ भटकतो. त्यातूनच त्याचे हृदयपरिवर्तन होते. तो स्वतः विषयी विचार करू लागतो. अंतरात्म्याचा शोध घेतो. त्याची ही तळमळ पाहून ती मुलगी म्हणजे प्रतिभा आपल्या खऱ्या रूपात त्याच्यासमोर प्रकट होते. ती म्हणजे प्रत्यक्ष साहित्य, कला आणि विद्येची देवता सरस्वती असते. ती त्याला म्हणते, 'तुझ्यातील माणुसकी जागृत होते की नाही याची परीक्षा मी पाहिली. त्यासाठी मीच बालिकेचे रूप घेतले होते. तुझ्या पाषाणहृदयाला ज्या आर्त करुणेच्या स्वरांमुळे पाझर फुटला, त्याच तुझ्या हृदयातून आणि वाणीतून आता माणुसकीचे संगीत जन्म घेईल आणि लक्षावधी मनांना कोमल भावनांनी शुद्ध करेल. तुझी वाणी देशोदेशी चिरकाल घुमत राहील आणि त्यातून अनेक कवींना प्रेरणा मिळेल.' रवींद्रनाथांनी ज्या काळात हे नाटक रंगमंचावर सादर केले त्या काळात स्त्रियांच्या शिक्षणावर, बाहेर पडण्यावर बंदी होती. स्त्रियांनी नाटकात काम करणे ही तर फार दूरची गोष्ट होती. मुलींनी नाटकात काम करणे हे प्रतिष्ठेचे मानले जात नव्हते. थोडक्यात म्हणजे त्या काळात स्त्रियांवर अनेक प्रकारची बंधने होती. अशा काळात रवींद्रनाथांनी आपल्या कुटुंबातील मुलींना रंगमंचावर आणून स्त्री स्वातंत्र्याचा मानवतावादी विचार आपल्या नाटकातून मांडला. हे त्यांचे मोठेच धाडस म्हणता येईल. या नाटकाला दुसराही एक संदर्भ आहे. या नाटकात रवींद्रनाथांनी वाल्या कोळी लुटारूंपासून सरस्वतीला मुक्त करतो हे जे दाखवले आहे, ते प्रतिकात्मक आणि अतिशय महत्वाचे आहे. त्याचा अर्थ असा की 'सरस्वती' आज साहित्यरूपाने लुटारुंच्या, धनदांडग्यांच्या ताब्यात आहे. तिला त्यांच्यापासून मुक्त केले पाहिजे. समाजाला बळ देणारे साहित्य आणि एकूणच साहित्य आणि कलाक्षेत्र हे साहित्यिक आणि कलावंतांच्याच ताब्यात असले पाहिजे. राजकारणी, धनदांडगे यांच्यापासून ते मुक्त असले पाहिजे. समाजाच्या प्रगतीची दिशा त्यामुळे सापडू शकेल. साहित्यिकांना मोकळे आकाश मिळेल. रवींद्रनाथांनी त्याकाळी जे प्रतिकात्मक रूपाने सुचवले ते आजदेखील महत्वाचे आहे. या नाटकाने रवींद्रनाथांनी जणू प्रायोगिक रंगभूमीची पायाभरणी केली. अनेक गोष्टी नवीन आणल्या. त्या काळी नाटकांवर इंग्रजी नाट्यभूमीचा प्रभाव होता, संगीताचा आणि रागदारीचा प्रभाव होता,

(पान ६ वर)

# सागरी ध्वनिप्रदूषण रोखण्याचे संभाव्य उपाय

विश्वसंचार
मल्हार कृष्ण गोखले

वनवासाला निघालेल्या राम-लक्ष्मण-सीता यांनी शृंगवेरपूर या ठिकाणी गंगा ओलांडली. राजा दशरथाचा मित्र निषादराज गुहक याने आपल्या सुसज्ज नौकेतून रामप्रभूला गंगेपार नेले. नौका वल्हवता-वल्हवता लाटांच्या आणि वल्ह्यांच्या तालावर गुहक आणि त्याचे साथीदार गात होते... श्रीरामांचे नाम गात या श्रीरामांना पार करू; जय गंगे जय भागीरथी, जय जय राम दाशरथी. महाराष्ट्र वाल्मीकि माडगूळकर अण्णा आणि बाबूजी सुधीर फडके यांनी अजरामर केलेल्या 'गीत रामायण'मधील हे एक अतिशय मधुरगीत आहे. या शिवाय वल्ह्यांच्या तालावर गायलेले 'गोमू माहेरला जाते हो नाखवा, तिच्या घोवाला कोकण दाखवा' हे 'वैशाख वणवा' चित्रपटातले एक सुंदर गाणे आहे. हिंदी चित्रपटांत अशी नौकागीते भरपूर आहेत. चटकन आठवणारी दोन गाणी म्हणजे, आवारामधले नय्या तेरी मजधार, होशियार, होशियार आणि मिलनमधले सावन का महिना, पवन करे शोर. तर, अशाच सगळ्या रम्य फिल्मी कल्पना उराशी बाळगून आम्ही म्हणजे आमचा ट्रेकिंग ग्रुप तापोळ्याच्या कोयना धरणाच्या धक्क्यावर लाँचची वाट पाहात उभे होतो. मुंबई ते सातारा ते तापोळा एस.टी.ने आणि पुढे तोपाळ्याहून लाँचने कोयना धरणाच्या विस्तीर्ण जलाशयातून किल्ले वासोटा गडाचा पायथा गाठायचा होता. सुमारे तासाभराचा प्रवास होता. अनेक जण चांगले गातात; तर सगळेजण वेगवेगळी नौकागीते आठवत होतो...पण... कसले काय! लाँचच्या इंजिनचा कानठळ्या बसवणारा आवाज आणि डिझेलचा काळा




धूर भसाभसा ओकणारा एक्सॉस्ट यांच्या दुहेरी माऱ्यात आमची गाणीबिणी मनातच राहिली. मग आमच्या लक्षात आले की, आपण हिंदी चित्रपटात पाहिलेली सर्व नौकागीते ही शिडाच्या होड्यांवर गायलेली होती. तिथे इंजिनचा कर्णकटू आवाज नव्हता. नेमका हाच मुद्दा पकडून कॅनडातल्या व्हँकूव्हरजवळच्या ब्रिटिश कोलंबिया विद्यापीठातले संशोधक, नेदरलॅण्ड किंवा हॉलंडच्या 'मरीन' या समुद्र संशोधन संस्थेतले संशोधक असे प्रयोग करून पाहात आहेत की, ज्यामुळे पाण्यातले ध्वनिप्रदूषण कमी करता येईल.

छोट्या मच्छीमार होड्या किंवा प्रवासी वाहतूक करणाऱ्या छोट्या लाँचेस हा त्यांचा विषय नाही. माल वाहतूक करणाऱ्या विशाल बोटी-कंटेनर शिप्स आणि त्यांच्या पंख्यांमुळे प्रॉपेलर्समुळे होणारे समुद्री ध्वनिप्रदूषण हा त्यांच्या संशोधनाचा विषय आहे. समुद्रात साधारण एक हजार मीटर्स किंवा सुमारे तीन हजार फूट खोल अंतरापर्यंतच सूर्याची किरणे पोहोचतात. तरीसुद्धा तिथे लखलखीत सूर्यप्रकाश नसून संधिप्रकाशासारखा मंद उजेड असतो. त्यापेक्षा जास्त खोल अंतरावर काळोखच असतो आणि तो अधिकाधिक गडद होत जातो. अशा स्थितीत जलचर प्राणी हे डोळ्यांनी पाहण्यापेक्षा ध्वनीने जास्त पाहतात. म्हणजेच त्यांना त्यांच्या परिसरातल्या शूत्र-मित्र-भक्ष्य-खाद्य यांचे ज्ञान डोळ्यांनी पाहून होण्यापेक्षा त्या त्या वस्तूंपासून येणाऱ्या ध्वनींमुळे होते. म्हणजे साध्या भाषेत, अमुक फ्रिक्वेन्सीची ध्वनिलहर आली की, ती शत्रूकडून आली आहे. चला, पळा, लपा किंवा लढायला तयार व्हा किंवा अमुक फ्रिक्वेन्सीची ध्वनिलहर आली की, हे जिवंत भक्ष्य आहे किंवा वनस्पतीज खाद्य आहे, हे या जलचरांना कळते. मग त्यानुसार ते पुढची हालचाल करतात. आज जगातली ९० टक्के व्यापारी माल वाहतूक ही समुद्राद्वारेच होते. कारण स्पष्टच आहे. रोड ट्रान्सपोर्ट हा खर्चिक असतो नि वेळखाऊही असतो. एअर ट्रान्सपोर्ट हा झटपट खरा; पण फारच महाग पडतो. जहाज वाहतूक ही सर्वात स्वस्त. जोपर्यंत शिडाच्या बोटी होत्या, तोपर्यंत ठीक होते. पण एकदा वाफेचे इंजिन आल्यावर आगबोटी आल्या.

अलिकडे राक्षसी आकारची कंटेनर्स शिप आणि लक्षावधी लिटर्स कच्चे तेल वाहून नेणारे महाकाय ऑईल रिग्ज यांची प्रचंड वाहतूक जगभरच्या महासागरांमधून सुरू झालेली आहे. दर वर्षाला ती वाढतेच आहे. तुम्ही जर एखाद्या प्रवासी बोटीवरून प्रवास केलात तर तुम्हाला तिच्या प्रॉपेलरचा आवाज आणि मागच्या बाजूला पोटात असलेल्या इंजिनचा आवाज एवढेच ऐकू येतात. ते काही कर्णकटू नसतात. जमिनीवरच्या कोणत्याही स्वयंचलित वाहनाचा जितपत आवाज येईल, तितकेच ते असतात; किंबहुना कमीच असतात. कारण रस्त्यावरच्या उगीचच हॉर्न मारत पुढच्याला ओव्हरटेक करू पाहणाऱ्या आगाऊ ड्रायव्हर लोकांसारखे बेछूट गडी समुद्रावर नसतात. हे झाले माणसांचे. जलचरांना त्या ध्वनींचा फार त्रास होतो. शत्रू-मित्र-भक्ष्य-खाद्य यांना ओळखण्याच्या त्यांच्या ज्या ठरावीक फ्रिक्वेन्सीच्या ध्वनिलहरी आहेत, त्यांत प्रचंड विक्षेप येतो. परिणामी ते जलजर अतिशय गोंधळून जातात. जहाजाचा पंखा किंवा प्रॉपेलर हा अर्थातच अतिशय वेगाने फिरत असतो. त्याच्या फिरण्यामुळे एकतर पाणी गरम होते आणि दुसरे म्हणजे हवेचे लक्षावधी बुडबुडे निर्माण होतात. अनेक हौशी प्रवासी मुद्दाम बोटीच्या मागे बसून त्या बुडबुड्यांच्या रस्त्याची गंमत बघतात. खरोखरच ते दृश्य मोठे छान दिसते. पण या लक्षावधी बुडबुड्यांमुळे पाण्यात एक पोकळी निर्माण होते. क्षणार्धात ते बुडबुडे फुटतात. पाण्यात पाणी मिसळते आणि ती पोकळी मिटून जाते. हे असे आपल्या डोळ्यांना दिसते, पण त्या बुडबुड्यांमुळे नि ती पोकळी निर्माण होणे नि मिटून जाणे यांचा एक ध्वनी निर्माण होत असतो. तो पाण्यात टिकून राहतो. एवढेच नव्हे, तर तो खोलवर झिपरत जातो. त्याचा जलचर प्राण्यांना फार त्रास होतो आणि दिवसेंदिवस जागतिक समुद्री व्यापार हा वाढतच जाणार आहे. तो कमी नक्कीच होणार नाही. म्हणजेच जलचरांच्या ध्वनिलहरींमध्ये माणसांच्या उद्योगांमुळे अधिकाधिक विक्षेप येत राहणार. तर, व्हँकूव्हरच्या ब्रिटिश कोलंबिया विद्यापीठातले मूळ भारतीय वंशाचे संशोधक राजीव जयमान आणि नेदरलँडच्या मरीन या समुद्र संशोधन संस्थेचे जोहान बॉशर्स यांना असे वाटले की, या प्रश्नावर काही तोडगा काढता आला तर बघू या. दोघांनी जे काही संशोधन केले आहे, ते दोन टोकांचे आहे. त्यातला किचकट तांत्रिक तपशील टाळून आपण ते समजून घेऊ या.

बोटीच्या प्रॉपेलरमुळे लक्षावधी बुडबुडे निर्माण होतात. राजीव जयमान यांनी प्रॉपेलर हा नुसत्या लोखंडाचा न बनवता त्यात पॉलिमरचा वापर केला. त्यामुळे प्रॉपेलरची पाती नुसतीच गरागरा फिरून पाणी न कापता, झुकतील, वळतील, पाणी कापतील, पुन्हा सरळ होतील. यामुळे बुडबुडे कमी निर्माण होतील. त्यातून पोकळी निर्माण होणे, ती मिटणे आणि या क्रियेचा ध्वनी निर्माण होणे, यात लक्षणीय घट होईल. मरीन संस्थेचे जोहान बॉशर्स यांनी बुडबुडे कमी करण्याऐवजी ते अतोनात वाढवले. विज्ञानाचा एक गमतीदार सिद्धांत



आहे. समजा, एखादा सुगंध आहे. पण तो सुगंध अति प्रमाणात पसरला गेला, तर तो दुर्गंध होतो. तेच एखादा दुर्गंध अति झाला, तर तो सुगंध भासू लागतो. तसे समजा, प्रॉपेलरमुळे पाण्यात दहा लाख बुडबुडे उत्पन्न होतायत, तर ते वाढवा. त्याची संख्या दहा कोटी होऊ द्या; ज्यामुळे त्यांच्यामध्ये पोकळी निर्माणच होणार नाही. त्यामुळे अर्थातच ध्वनी निर्माणच होणार नाही किंवा झालाच तर अगदी अल्प प्रमाणात होईल. जोहान बॉशर्स यांचे असे म्हणणे आहे की, अशा कृत्रिम बुडबुड्यांचा एक पडदा जर आपण संपूर्ण जहाजाभोवती उभा केला तर जहाजाच्या इंजिनचा, जनरेटर्सचा जो अखंड धडधड आवाज येत असतो, तोसुद्धा कमीत कमी करता येईल. इतकेच नव्हे, तर त्यांचे असे म्हणणे आहे की, प्रगत देशांची हेरगिरी करण्यासाठी फिरणारी जहाजे अशा प्रकारचे तंत्रज्ञान वापरत आहेतच. कारण त्यांना कोणाच्याही रडार, सोनार इत्यादी शोध यंत्रणेला आपला माग लागू द्यायचा नसतो.

आता यावर युनिव्हर्सिटी कॉलेज, लंडनच्या नौदल वास्तुशास्त्र विभागाचे संशोधक टॉम स्मिथ म्हणतात, समुद्री वाहतूक अधिकाधिक ध्वनिविरहित व्हावी, यासाठी आणखी बरेच उपाय करता येतील. पण आपली मालवाहू जहाजे ध्वनिविरहित व्हावीत, असे किती कंपनी मालकांना वाटते? ते म्हणतील, ना खलाशांची तक्रार आहे, ना ग्राहकांची तक्रार आहे. मग आता मोठा आवाज, तर बिघडले कुठे? जलचर प्राण्यांच्या फ्रिक्वेन्सी बिघडू नयेत म्हणून आम्ही आमची जहाजे री-फिट करून घ्यावीत हा कुठला कायदा? म्हणजे प्रश्न पुन्हा पैशाशी आला आणि पर्यावरण दूषित वगैरे होऊ नये म्हणून जास्त पैसे खर्च करायला कुणीही तयार नसतो. काही ठरावीक वर्षे झाल्यानंतर वाहने रद्दबातल करावीत. कारण वयोमर्यादा संपलेली वाहने भयंकर वायुप्रदूषण करतात, हा कायदा पारित करताना किती बोंबाबोंब झाली होती, आठवतेय ना? 'पण आज नाही उद्या हे करावेच लागणार आहे', असे जोहान बॉशर्स म्हणतात. कारण 'इंटरनॅशनल मेरिटाईम ऑर्गनायझेशन'ने जहाज उद्योगातला कार्बन उत्सर्ग ७० टक्क्यांनी कमी करण्याचा चंग बांधला आहे. त्यामुळे आता नवी बांधली जाणारी जहाजे ध्वनिविरहित यंत्रणेने सुसज्ज अशीच येतील. जोहान बॉझर्स पुढे म्हणतात की, अशी जहाजे भाताच्या जहाजांपेक्षा अधिक कार्यक्षमतेने वाहतूक करतात असे दिसून आले की, जहाज मालक व्यापारी कंपन्या त्यांचा आनंदाने स्वीकार करतील. हुश्श! समुद्रावर हे सगळे जेव्हा होईल तेव्हा होवो. तूर्त आम्ही वाट पाहात आहोत मशिदींवरचे भोंगे केव्हा बंद होतात त्याची. (लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

# ग्रहसंकेत

**(रविवार, २२ डिसेंबर ते शनिवार, २८ डिसेंबर २०२४)**

**नारायण जगन्नाथ कारंजकर,** ज्योतिष भास्कर
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, २२ डिसेंबर-** कालाष्टमी, अयन करिदिन, यल्लमादेवी यात्रा गव्हाण ता. तासगाव, शितळादेवी यात्रा उर्से ता. मावळ, भारतीय पौष मासारंभ, भानुसप्तमी, श्री मार्कंडेय उत्सव कुडाळ ✻ **सोमवार, २३ डिसेंबर-** किसान दिन, रामवरदायिनी व नवलाईदेवी यात्रा खावली ता.जि. सातारा, श्री माऊली यात्रा आढावी, भैरवनाथदेव जयंती अपशिंगे (मि.) ता. खटाव ८ ✻ **मंगळवार, २४ डिसेंबर-** राष्ट्रीय ग्राहक हक्क दिन, पद्मनाभस्वामी जयंती कोल्हापूर, सेवागिरी महाराज पुण्यतिथी उत्सव पुसेगाव, सोमजाई देवी यात्रा श्रीवर्धन शिवडाव यात्रा कणकवली ✻ **बुधवार, २५ डिसेंबर-** ख्रिसमस, नाताळ, भगवान पार्श्वनाथ जयंती, रंगनाथस्वामी पुण्यतिथी निगडी ता. कोरेगाव, गोंदवलेकर महाराज पुण्यतिथी ✻ **गुरुवार, २६ डिसेंबर-** सफला एकादशी, श्री यल्लमा यात्रा खंडेराजुरी ता. मिरज, श्री मुकुंदराजस्वामी यात्रा अंबाजोगाई ✻ **शुक्रवार, २७ डिसेंबर-** स्वामी स्वरुपानंद जयंती, पावस, यल्लमा यात्रा जत व घानवड ता. खानापूर जि. सांगली, रेणुका यात्रा म्हसवड ता. माण, सोपानकाका पुण्यतिथी सासवड ✻ **शनिवार, २८ डिसेंबर-** शनिप्रदोष, यल्लमा यात्रा कलेढोण ता. खटाव व कोकळे ता. कवठेमहांकाळ, गुळवणी महाराज जयंती सांगली, श्री संताजी महाराज जगनाडे पुण्यतिथी.

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** २२, २३, २४ , २६ (१८ पर्यंत) डिसेंबर ✻ **डोहाळ जेवण-** १५, १७, १८ डिसेंबर (१० नंतर) ✻ **बारसे-** २२ डिसेंबर ✻ **जावळ-** २३ (९ नंतर) डिसेंबर, २५ (९ पर्यंत), २६ डिसेंबर ✻ **गृहप्रवेश-** २२, २३, २५ (९ पर्यंत) डिसेंबर, २६ डिसेंबर

### मेष :- आर्थिक प्रगती

ते काम करण्यासाठी सर्व वेळ खर्च करा, ज्यामुळे आपली वेळ, परिस्थिती बदलणार आहे. धनस्थ गुरुशी गुरुवारी होणारी बुधाची प्रतियुती आर्थिक बाबतीत प्रगती करणारी आहे. चिकाटीने केलेली वाटचाल शुभ फलदायी ठरेल. नव्या योजना मार्गी लावता येतील. फार दगदग करणे टाळावे. वितंडवादाचे प्रसंग संभवतात. जपून असावे. शुभ ता. २३, २५

### वृषभः- अपेक्षित संधी लाभतील

गेलेल्या दिवसांची व येणार्या दिवसांची चिंता करू नका कारण होणार होते ते झाले आहे, जे होणार आहे ते चांगलेच होईल. राशीतील गुरुशी होणारी बुधाची प्रतियुती हाती घेतलेले काम यशस्वी करणारी आहे. उत्साह धडाडी वाढेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित संधी लाभतील. अनुकूलता वाढेल. शुभ ता. २२, २४

### मिथुनः- अडचणीतून क्षार्ग निघेल

जीवनाचा खरा उद्देश आपल्यातील आनंद मिळविणे, आत्म्याचे आवाज ऐकल्यानुसार चाला. धनात मंगळ तर व्ययात गुरु त्यामुळे खर्च वाढला तरी प्राप्ती ही तशीच मनासारखी होत जाईल. अपेक्षित कामे होतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. प्रतिकूलतेवर मात कराल. कलागुणांचा विलंबाने पण विकास होत जाईल. शुभ ता. २३, २४

### कर्कः- प्रयत्नाने कार्यसिद्धी

नाती आणि बर्फाचे गोळे एकसारखेच असतात, ज्यांना बनवन सोपं पण टिकवून ठेवण अवघड असतं. राशीत मंगळ तर अष्टमात शनी, शुक्र त्यामुळे शांत चित्ताने राहून वाटचाल करावी. लाभातील गुरुची बुधाशी होणारे प्रतियुती आर्थिक प्रगती करणारी आहे. प्रकृतीकडे दुर्लक्ष करू नका. प्रयत्नाने कार्यसिद्धी होईल. शुभ ता. २४

### सिंहः- अपेक्षित कामे होतील

आपला विश्वासघात करणारा माणूस आपल्या स्वार्थासाठी चांगल्या माणसाला दूर करतो. व्ययात मंगळ तर अष्टमात राहू, नेपच्यून त्यामुळे महत्त्वाच्या कामासाठी दुसऱ्यावर फार अवलंबून राहू नका. माहिती तंत्रज्ञान, ज्ञानदान, बँक, विमा अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. डोळ्याच्या तक्रारींची दखल घ्यावी. शुभ ता. २४

### कन्याः- अडचणींवर मात कराल

ज्या घरात सर्वजण प्रेमाने, एक विचाराने राहतात ते घर स्वर्गासमान असते. राशी स्वामी बुधाचा गुरुशी होणारा प्रतियोग भाग्यवृध्दिंगत करणारा आहे. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने राहावे. प्रगतीच्या घटना घडतील. प्रकृतीची काळजी घ्यावी. अडचणी आल्या तरी त्यावर योग्य प्रकारे मात करू शकाल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. २५

### तुलाः- उत्साहवर्धक घटना

आपल्यासाठी कुणीही नसले तरी आपण सर्वांसाठी आहोत, ही सुंदर गोष्ट, सुंदर फुलांकडून शिकावी. धनस्थ बुधाचा गुरुशी होणारा प्रतियोग आर्थिक बाबतीत प्रगती करणार आहे. सुसंधीचा लाभ उठवावा. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने राहावे. अनुकूलतेचा लाभ उठवावा. नव्या संधी लाभतील. उत्साहवर्धक कालावधी आहे. शुभ ता. २३, २४

### वृश्चिकः- नव्या कामांना गती

दगड एक वेळ मंदिरात गेला भगवान झाला, माणूस जीवनभर मंदिरात केला पण चांगला माणूस नाही बनू शकला. राशीतील बुधाचा सप्तमातील गुरुशी होणारा प्रतियोग स्वास्थ्य मिळवून देईल. नव्या कमाना गती मिळेल. लाभ उठवावा. प्रगतीच्या घटना घडतील. स्थावर सौख्य लाभेल. कलेत प्रगती होईल. शुभ ता. २२, २५

### धनुः- नव्या विचारांना चालना

अश्रूमध्ये एक टक्का पाणी व ९९ टक्के भावना असते. त्यामुळे कोणाला दुःख देऊ नका. राशी स्वामी गुरुचा बुधाशी होणारा प्रतियोग कार्यक्षेत्रात प्रगती करणार आहे. आत्मविश्वास वाढेल. प्रगतीच्या घटना घडतील. प्रतिकूलतेवर मात कराल. स्वास्थ्य टिकून ठेवावे. नव्या कामाना गती मिळेल. पोटाच्या तक्रारी संभवतात. शुभ ता. २३, २४

### मकरः- योजना मार्गी लागतील

इमानदारीची ताकद फार मोठी असते. बेईमानदार माणूसही आपल्या घरासाठी इमानदार चौकीदार ठेवू इच्छितो, ठेवतो. बुध गुरुचा प्रतियोग आर्थिक प्रगती करणार आहे. कौटुंबिक जीवनात वादाचे प्रसंग टाळावेत. नव्या योजना मार्गी लावता येतील. सुख स्वास्थ लाभेल. अडचणींवर मात कराल. प्रगतीच्या घटना घडतील. शुभ ता. २३, २५

### कुंभः- अडचणींवर मात कराल

चार गोड शब्दाने जे काम होते, ते पैशाने होत नाही. बुध गुरुचा प्रतियोग कार्यक्षेत्रात प्रगती करणार आहे. नव्या कामांना गती मिळेल. नव्या संधीचा लाभ उठवावा. उत्साहवर्धक घटना घडतील. सुख स्वास्थ्य लाभेल. अनावश्यक खर्च टाळावा. अनुकूलता वाढत जाईल. अडचणीवर मात कराल. फार चिंता करू नका. शुभ ता. २४

### मीनः- मनासारख्या घटना

घराला आबाद किंवा बरबाद करण्यासाठी घरातील एखादा सदस्य पुरेसा होतो, हे एक कठोर सत्य आहे. बुध गुरुचा प्रतियोग कार्यक्षेत्रात प्रगती करणारा आहे. निर्णय विचारपूर्वक घ्यावेत. अनुकूलता वाढत जाईल. फार चिंता करू नका. वैद्यकीय क्षेत्रात मनासारखी प्रगती होईल. शुभ ता. २५

!! शुभ भवतु !!

# विविध आजारांवर उपयुक्त वनौषधी



**आजच्या लेखात आपण कोणत्या वनस्पती कोणत्या रोगावर उपयोगी पडतात आणि कोणत्य आजारावर कोणत्या वनस्पती वापराव्यात, यांचे तसेच काही घरगुती औषधोपचारांची माहिती घेऊ...**

आजीचा बटवा
नारायण कारंजकर
भ्र. ९४२३७५८४०१



**कोणत्या वनस्पती कोणत्या रोगावर उपयोगी?**

१) आघाडा- कफ, उपदंश, विंचूदंश रक्तार्श, ज्वर व कावीळ, २) अडुळसा- कफश्वास, ज्वर, ओकारी, सूज व मूत्राघात ३) अर्जुन सादडा- हृदयरोग, अस्थिभंग, कमी, उदावर्त, व्रणरोपक, ४) अंबोली- मुखरोग सूज, ज्वर, धुपणी, शूळ, खोकला, ५) अगस्ता अर्धशिशी, शोथ, अपस्मार, वात व कफ. ६) आले- अजीर्ण, अग्निमांद्य, आम्लपित्त, अर्धशिशी, अरूची, ओकारी, ७) अशोक- प्रदररोग, उदररोग, ८) आवळा- अरुची, ओकारी, अतिसार, उचकी, ज्वर, प्रमेह. ९) उंबर- उष्णता, उपदंश, मूळव्याध, सूज व गंडमाळा. १०) एरंड- कावीळ, संधीवात, गृधसी, गंडमाळा, आध्मान, ११) कडुनिंब- ज्वर, कावीळ, कृमी, मूळव्याध, विषमज्वर, व्रण. १२) कन्हेरी- शिरोरोग, सर्पदंश, विषमज्वर, मूळव्याध. १३) करंज- खरुज, गंडमाळा उरूस्तंभ, व्रण, १४) कवठ कावीळ, अतिसार, उचकी, अरुची, उष्णता. १५) कांचन- कंठमाळा, मूत्रकृच्छ, व्रण, कफ, वायू, दाह. १६) काजरा- नळगुंद, हिवताप, नारू, शूळ, अजीर्ण, मंदाग्नि १७) काशी- धुपणी, दाह, मोडशी, मूच्छ व पित्त. १८) कासविंदा गजकर्ण, सूज, उचकी, खास. १९) ब्राम्ही मगजराती, अपस्मार, चित्तब्रम्ह, अक्षत, भोवळ, २०) कुडा- अतिसार, संग्रहणी, पांडुरोग, नळगुंद, मूळव्याध. २१) केळ- कावीळ, दाह, उचकी, मूत्राघात. २२) कोथिंबीर दाह, रक्तपित्त, अरुची, कफ-श्वास, पित्त. २३) कोरांटी- दाढदुखी, स्वप्रदोष, सूज, दंतरोग, दमा, खोकला. २४) गवती चहा- सर्दी, पडसे, घाम येण्यासाठी, ज्वर व पोटदुखी. २५) गुंज- उपदंश, अर्धशिशी, प्रमेह, उष्णता, गंडमाळा. २६) गुलबाक्षी केशनाशक- वृणरोपक उष्णता, धातुक्षय २७) गुलाब- उष्णता, दाह, मूळव्याध, धातुविकार, मृदुरेचक, २८) गुळवेल- कावीळ, अरुची, मूळव्याध, प्रमेह, दाह, ज्वर, पित्त, कफ. २९) गोकीर्ण- कुष्ठ, शूळ, व्रण, दाह, पित्त, कृमी. ३०) गोरख चिंच- अतिसार आम्लपित्त, धुपणी, चट्टे, खांडुक. ३१) गोरखमुंडी- वायू, संधीवात, अतिसार, उदररोग, अपस्मार प्रमेह, ३२) गोखरु (सराटे)- मूत्रकृच्छ, कुष्ठ श्वासकास, रसायन, ३३) चिकणी (बला)- धातुपुष्टी, प्रमेह, जखम्, ज्वर, ३४) चिमक- उदररोग, संग्रहणी, सूज, मूळव्याध, कुष्ठ. ३५) जाई (चमेली)- जीर्णज्वर, मुखरोग, दंतरोग, नेत्ररोग, व्रणशोधक, ३६) जास्वंद- धुपणी, मूळव्याध, अतिसार, प्रमेह, पित. ३७) टाकळ- वायू, पांडुरोग, सूज, आमवात ३८) टॅटू (अरलू)- आमवात, अतिसार, अरुची, ३९) डाळींब- अग्निदीपक, मुखरोग, कंठरोग, अरुची, दाह, पित्त, ज्वर, कफ. ४०) डोरली- कफ, वायू, ज्वर, शूळ, अग्निमांद्य, दमा, ४१) तुळस- अरुची, ज्वर, कफ, वायू, उचकी, श्वास, ४३) तूपकडी (नागबला)- पित्त, कफ, अतिसार, व्रण, ज्वर, क्षयनाशक, ४४) चोत्रा- कुष्ठ, कंडू, व्रण, कृमी, गालगुंड, ४५) निर्गुडी- गृधसी, संधीवात, सूज. ४६) पारिजातक- गालगुंड, प्रमेह, गजकर्ण, दाह, ज्वर, ४७) लॅडपिंपळी (पिंपळी)- अजीर्ण, अरुची, उदररोग, पांडूरोग, गुल्म, खोकला, वात, त्यांचेच मूळ पिपरामूळ नावाने मिळते. ४८) पुदिनी- अरुचि, अजीर्ण, अतिसार, पोटसूळ, ज्वर, ४९) पुनर्नवा- सूज, प्रदर, हृदयरोग, पांडू, मूत्रकृच्छ (अपूर्ण). अशा अनेक वनौषधी विविध रोगावर कोणत्या वनौषधी वापराव्यात यांचा विचार करू या...

**विविध आजारांवर उपयुक्त वनौषधीः-**

१) अतिसार- कुडा, उंबर, जायफळ, गोरखचिंच २) अर्धशिशी- अगस्ता, करंज, सुंठ, जेपाळ, पोपचिनी. ३) अपस्मार- वेखंड, ब्राम्ही, कांदा, ज्येष्ठमध, ४) अजीर्ण- ओवा, आल, काजरा, लिंबू, ५) अस्थिभंग- अजून आघाडा, मॅदालकडी, गुग्गुल. ६) आम्लपित्त- अंबाडा, आले, लिंबू, गोरख, चिंच, ७) अग्निमांद्य- आले, लिंबू, ओवा, कांदा, लसूण. ८) उचकी- आवळा, कवळ, गुळवेल, केळ. ९) उष्णता- इसबगोल, ऊस, उंबर, कोथिंबीर, १०) कफश्वास- आघाडा, बेहडा, आले, ओवा, अडुळसा. ११) कावीळ- एरंड पान, कोरफड, हळद, बब्बुलचे पान. १२) उपदंश- पोपचिनी, जास्वंद, काटेथोत्रा, कडुनिंब, १३) उन्हाळे- काकडी, केळ, कुडा, कलिंगड. १४) गंडमाळा- कांचन, एरंड, कळलावी, कापूर मेंडी, देवकापूस, १५) नाकातून रक्त पडणे- डाळींब फूल, कांदा, नागरमोथा, कापशी. १७) नारू- कापूर, खाज कोलती, अळू, काजरा. १८) गजकर्ण- करंज, खाजकोलती, टाकळा, कन्हेर, लिंबू. १९) गालगुंड- ज्येष्ठमध, कडु भोपळा, काळी जिरी. २०) जखम - जाई, ज्येष्ठमध, नागबला, अर्जुन, २१) कृमी- कपिला, वावडिंग, उदिरकानी, किरमाणी, ओवा, २२) गजमा गुल्मरोग- ओवा, एरंडेल, बाळहिरडा. २३) ज्वर- तुळस, कडुनिंब, गुळवेल, काडे जिराईत. २४) झोप येणेस- पिपळा मूळ, कापूर काचली, अश्वगंधा. २५) धातू पुष्टीस- आस्कंद, मुसळी. २६) हृदयरोगावर - अर्जुन सादडा, अंबाडी, गुळवेल, आवळा. २७) आवळा, गुळवेल. २७) धुपणी- अबोली, आंबा, आवळा, अशोक. २८) सर्दी पडसे- आले, गवती चहा, तुळस, कांदा. २९) प्रमेह- उत्कटाटी, उन्हाळी, कोळसुंदा, खैर. ३०) मूळव्याध उंबर, उन्हाळी, एंड, आवळा, आपाडा. ३१) मगज शक्तीसाठी-बदाम, ब्राम्ही वेखंड, शंखपुष्पी ३२) विरेचनासाठी- सोनामुखी, हिरडा, नसात्तर, एरंडेल, रेवाचिनी. ३३) व्रणरोपक- अर्जुनसादडा, आघाडा, गंगेरण, हळद. ३४ शोथनाशक- धनसरीचे मूळ, पुनर्नवा, आपटा चित्रक, ३५) अग्निदग्धावर- कोरफडाचा गुदा, राळ, कोथिंबीर, खोबरेल तेल. ३६) खरजेवर- कडुनिंब, करंज, टाकळा, कवंडळ, लिंबू, ३७) अरुची- चिंच, लिंबू, आवळा, आले. ३८ ) अमांश- कुडा, बडीशेप, नागरमोथा, बेलफळ, सुंठ ३९) अदमान- सुंठ, हिरडा, ओवा, अमांश- कुडा, बडीशेप, नागरमोथा, बेलफळ लिंबू, लेंडपिंपळी, ४०) कर्णरोग- तरवड, वेखंड, लसूण, माका, सब्जा. ४१) कुष्ठरोग- बावची, करंज, जाई, कन्हेर, कडुनिंब, खैर. ४२) नासारोग- वेखंड, लवंग, सुंठ, लेंडपिपळी, वावडिंग, ४३) ओकारी- मिरे, जायफळ, लिंबू, सराटे, ४५) पांडूरोग- आवळे, चित्रक, हळदी, रातांबा. ४४) मूत्ररोग- आपटा, वेळू, कसई, कडुनिंब, गुळवेल, ४६) संग्रहणी- सुंठ, ताक, मिरे, आवळे, बेल.

**काही अनुभवसिध्द औषधेः-**

१) शिरीषाच्या पानाचा कल्फ करून कापडी फडक्यात ठेऊन डोळे बंद करून डोळ्यावर पट्टी ठेवल्यास डोळ्यातील उष्णतेचे विकार नाहीसे होतात. २) कोरांटीच्या पाल्याचा रस घावातून येणारे रक्त थांबविण्यासाठी उपयुक्त आहे. ३) नायटी आणि तुळशीचा रस दमा व खोकल्यावर फारच गुणकारी आहे. ४) बकुळीची साल जाळून सैंधव चौथा भाग मिसळून दंतमंजन करावे. बकुळाच्या बियाचा गर व काळी मिरी मूळव्याध बरी करतात. ५) डोकेदुखीवर नवसागराचे पाणी पाच थेंब नाकात घातल्यास त्वरित डोकेदुखी थांबते. ६) आम्लपित्तावर आवळ काठीचे चूर्ण दोन ग्रॅम आणि शंख भस्म अर्धा ग्रॅम पाण्यातून घ्यावे. ७) सुंठ दोन ग्रॅम आणि गुळ दोन ग्रॅम एक तोळा गाईच्या तुपात गरम करावा. नंतर तूप गाळून पाच थेंब नाकात टाकावे. जुनाट डोकेदुखी थांबते. ८) मुरड्यावर कुडासाल, कोवळ्या बेलफळाचा शीर आणि अति विषाची कळी समभाग घेऊन दोन ग्रॅम चूर्ण गोड ताकात दिल्यास मुरडा व परसाकडे थांबते. ९) आले व पुदिनाचा रस किंवा आले व लिंबाचा रस ५ ग्रॅम मधात चाटायला दिल्यास उलटा थांबतात. १०) हळदपूड २ ग्रॅम घेऊन त्यात एक ग्रॅम साखर घालावे. हे मिश्रण घेतलं असता टॉन्सिलची सूज उतरते.

**कांही घरगुती औषधोपचारः-**

लवंग भाजून सरसूच्या तेलात टाकावी व ते तेल ३-४ थेंब कानात टाकावे. कानदुखी थांबते.

मोहरीचे तेल थोडेसे कोमट करून कानात नित्याने घातले असता बहिरेपण दूर होते.

सकाळी कडुनिंबाच्या काडीने दात घासून रात्री मिठाच्या पाण्याने गुळण्या केल्या असता दाताचे रोग होत नाहीत.

झोप येत नसल्यास शेळीच्या दुधाने हातापायास मालिश करावी.

फोड व गळवे यावर आंबेहळदचा लेप लावावा.

दाढ दुखीवर दोन लवंगा चावून त्यांचा रस दाढेत घोळवत रहावे.

डोक्यातील कोंड्यावर आठवड्यातून एकदा डोक्याला दही, लिंबाचा रस एक तासभर लावून ठेवून नंतर डोके स्वच्छ धुवावे.

विंचवाच्या दंशावर सफरचंदाच्या रसात अर्धा ग्रॅम कापूर घोलून विंचू दंशावर लावावा. वेदना कमी होतील.

पान २ वरून

## जखम अश्वत्थामाची; भारताच्या...

एक सुन्न करणारा अनुभव.! १९९८ सालीच बाप्सी सिघवा यांच्या 'आईसकँडी मॅन' या कादंबरीवर आधारलेला '१९४७ द अर्थ' सर्वसामान्य नोकरांच्या जीवनात फाळणीने घडवलेल्या स्थित्यंतराचे विदारक दर्शन घडवतो. सहिष्णुता व बंधुभाव धार्मिक उन्मादात कसे बळी पडतात, याचे वास्तविक चित्रण करणारा हा चित्रपट अंतर्मुख करतो. 'ईश्वर अल्ला तेरो जहाँ मे नफरत क्यो है, जंग है क्यों' हा विलाप संवेदनशील मनाला अंतर्बाह्य छळतो. हिंदू तरुणीचे निरुपायाने मुस्लिम धर्मांतर व तिच्या भावविश्वात घडलेला आमूलाग्र बदल नेमकेपणाने चितारणारा 'पिंजर' (२००३) हा अमृता प्रीतम यांच्या कादंबरीचे चित्रपट रूपांतर फाळणीची विभिषिका प्रत्ययकारीरीतीने मांडतो. २००४ सालच्या 'वीर-झारा' चित्रपटात भारतीय तरुण व पाकिस्तानी तरुणीच्या प्रेमकथेचा संगीतमय आढावा घेतला होता. अप्रतिम चरित्रपट 'भाग मिल्खा भाग' (२०१३) या चित्रपटात पाकिस्तानातून विस्थापित झालेल्या एका गुणवान धावपटूची जीवनकथा मांडण्यात आली होती. जरी फाळणीचे संदर्भ नसले, तरीही भारत पाकिस्तान यांच्या संबंधांचा आढावा घेणारे 'फिल्मीस्तान' (२०१३), बजरंगी भाईजान (२०१५), 'एक था टायगर' (२०१२), 'सरबजीत' (२०१६), 'टायगर जिंदा है' (२०१७), राजी (२०१८), ओम्रेटा (२०१८), रामचंद्र पाकिस्तानी (२००८) असे अनेकविध चित्रपट बनले आहेत. २०२५ साली येऊ घातलेल्या 'लाहोर १९४७' या चित्रपटाची रसिक उत्सुकतेने वाट बघत आहेच.


भारत-पाकिस्तान यांच्या दरम्यान झालेल्या युद्धांवर आधारित 'हिंदुस्थान की कसम' (१९७३), 'बॉर्डर' (१९९७), 'एलओसी-कारगिल' (२००३), 'उरी-द सर्जिकल स्ट्राईक' (२०१९) या चित्रपटांनीदेखील भारतपाकिस्तान यांच्या सैनिकी संबंधांचा वेध घेतला आहेच. शेवटी, 'जंग तो चंद रोज होती है, जिंदगी बरसों तलक रोती है' हेच खरे! (लेखक सिनेमाचे अभ्यासक आहेत.)

पान ५ वरून

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

त्या चौकटीतून नाटकाला बाहेर काढण्याचाच त्यांचा हा प्रयत्न होता. त्यांचे हे नाटक म्हणजे सुरांचा आणि स्वरांचा अविष्कार होता. त्याला एक प्रकारची आंतरिक लय होती.

गाण्याच्या आणि रागदारीच्या बंधनांपासून काही अंशी मुक्त होत आपल्याला हवा तसा नाट्याविष्कार सादर करण्याचे आणि स्वरांच्या प्रकटीकरणाचे स्वातंत्र्य त्यांनी घेतले होते. ते नुकतेच इंग्लंडहून परतल्यामुळे या त्यांच्या प्रायोगिक नाटकावर काही अंशी पाश्चात्य संगीत आणि आयरिश संगीताचा प्रभावही होताच. हे नाटक केवळ वाचण्यासाठी नव्हेतच तर ते पाहावे आणि अनुभवावे अशा प्रकारचे होते. या नाटकाने वयाच्या केवळ विसाव्या वर्षी रवींद्रनाथांचे नाटककार म्हणून दमदार पदार्पण झाले. या नाटकातूनच साहित्यिक म्हणून आपल्या पुढील प्रवासाची दिशा रवींद्रनाथांना गवसली असे म्हणता येईल.



आपली पुढील वाटचाल कशी असेल याची झलकच जणू त्यांनी या नाटकाद्वारे दाखवली. दरोडेखोरांच्या किंवा धनदांडग्यांच्या तावडीतून सरस्वतीला मुक्त केल्याशिवाय कलावंताला सरस्वती प्रसन्न होत नाही हे त्यांना जाणवले होते. वाल्मीकींच्या अंतःकरणात जो दयेचा, करुणेचा झरा वाहू लागला, त्यामुळे जगाकडे आणि त्यातील क्रौर्याकडे पाहण्याची एक वेगळी दृष्टी वाल्मिकींना प्राप्त झाली. बालिकेला दरोडेखोरांच्या तावडीतून सोडवणे म्हणजेच सरस्वतीला नको असलेल्या व्यक्तींच्या ताब्यातून मुक्त करणे आवश्यक आहे हे त्यांच्या लक्षात आले. 'वाल्मिकी प्रतिभा' हे नावच खरोखर अगदी सुंदर आहे. त्याच्या नावातच रवींद्रनाथ यांच्या प्रतिभेचाही विलास आपल्याला दिसतो. त्यांच्या प्रतिभेची झेप आपल्याला दिसते. 'वाल्मिकी प्रतिभा' हे नाटक म्हणजे एक संगीत नाटिका होती. त्यामुळे त्यात नाटकाच्या गरजेनुसार रवींद्रनाथांनी संगीताचा वापर केला. तो करीत असताना भारतीय आणि विदेशी राग यांचे अनोखे मिश्रण केले. रागातील कित्येक पदे प्रथमच शुद्ध हिंदीत बसवली होती. ही पदे लिहिण्यात त्यांना त्यांचे जेष्ठ बंधू ज्योतिरिंद्रनाथ यांचेही सहकार्य लाभले. (क्रमशः)

पान ४ वरून



## at एनी कॉस्ट

अशी माध्यमांतर होण्याची परिस्थिती एक साशंकता, पराकोटीची साशंकता निर्माण करते. त्याच्या आनंदाचा अस्तित्वकाल अल्पायुषी असण्याचा त्याला अभिशाप आहे. त्यामुळे दुःख चोंबाळत बसायलासुद्धा फुरसत मिळत नाही. असलेले आणि नसलेले कोडगेपण मिरवत पशुवत वागावे लागते. पण ते सोपे नसते ना! सोवळे तर सुटले; ओवळे मात्र सापडत नाही. अशातली ही गत आहे. त्याबाबत या पुस्तकात आपल्यातले जनावर काही टाकवत नाही आणि माणूसपणाचे ओझे काही पेलवत नाही असा फार सुरेख उल्लेख आहे.

का कोण जाणे! पण हा उल्लेख या पुस्तकात वाचला आणि मला लख्खकन पु. ल. देशपांडे यांच्या वंगचित्रे पुस्तकातला एक उल्लेख आठवला. तो उल्लेख असा आहे. गाढवाचे पिल्लू सुद्धा त्याच्या लहानपणी सुंदर दिसते. काळाच्या ओघात त्याचे फक्त गाढवपण वाढत राहते आणि तेवढेच व तेच शिल्लक राहते. नवीन माध्यम हे अनेकदा असा गाढवा सारखा अनुभव देते!

तिथे पु. ल. देशपांडे असे म्हणतात. काळाच्या ओघात माणसाचे असे फक्त माणूसपण वाढत आणि शिल्लक राहत गेले तर! ते होत नाही हीच तर अडचण आहे. याचे यथार्थ वर्णन म्हणजे अभिराम भडकमकर यांचें ॲट एनी कॉस्ट हे पुस्तक! त्यामुळे अशी माध्यमांतरे सुबत्ता आणतात. यश आणतात. अगदीं नक्की आणतात पण त्यातून अगदी चिरस्थायी जरी नाही तरी दीर्घकालीन असे काय हाती लागते? आणि हे सगळे at What Cost ? ते मिळवण्यासाठीच सर्वंकष प्रयत्न म्हणजे ॲट एनी कॉस्ट! म्हणून या पुस्तकात एके ठिकाणी लेखक अभिराम भडकमकर प्रश्न उपस्थित करतात...

अर्जुन जिंकला; अर्जुन सुखी झाला का? या पुस्तकात हे वाक्य वाचले आणि मला महामहोपाध्याय साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांची महाभारतावरील व्याख्याने आठवली. त्या व्याख्यानात बाळशास्त्री हरदास हा पैलू अनेकदा अधोरेखित करतात.

एकंदरीतच ॲट एनी कॉस्ट ही कार्यपध्दती असते. at What Cost हा मोजमाप करण्यासाठी तयार केलेला निकष...एक निकष; एकमेव नव्हे!

सकारात्मकतेचे तत्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# कार्यस्थळावर मानसिक आरोग्य (भाग पहिला)




प्रथमतः एक वैश्विक सत्य मान्य करायलाच हवं- स्ट्रेस इज इंटिग्रल पार्ट ऑफ ह्यूमन लाईफ! व्यक्तिपरत्वे/ परिस्थितीनुरूप त्याचे प्रमाण कमीजास्त होत असेल. पण जगी सर्व सुखी (तणावरहित अशा अर्थाने) असा कोण आहे? या प्रश्नाचे उत्तर कोणीही नाही या सत्याकडे डोळेझाक करून चालत नाही.

**माणसे नोकरी सोडून कां जातात?**

जेव्हा आपण कर्मचारी अट्रिशन (काम सोडून जाण्याचे प्रमाण) वर विचारमंथन करून त्याचे पृथःकरण करतो तेव्हा खालील काही कारणे समोर येतात.

१) सूक्ष्म व्यवस्थापन (मायक्रो मॅनेजमेंट)
२) विषारी, जीवघेणी कार्यसंस्कृती
३) अति काम तसेच अवास्तव (फाजील) अपेक्षा
४) कामाच्या स्वरूपापेक्षा अधिक शिक्षण
५) संस्थेत अवमूल्यन होणे, पदोपदी उपेक्षा होणे
६) वाढ होण्याच्या संधींमध्ये कमतरता
७) काम आणि वेतन यांच्यातील फरक/विसंगती
८) नेतृत्वावर अविश्वास
९) संघाबरोबर, सहकाऱ्यांसमवेत संवादाचा अभाव, विसंवाद
१०) आव्हानात्मक कामाच्या संधींची उणीव, कमतरता
११) लवचिक, दूरस्थ कामाची अनुपलब्धता
१२) नवसर्जन, कल्पकतेला वाव नसणे
१३) नीतिमूल्यांमध्ये (स्वतःच्या आणि संस्थेच्या) अंतर
१४) अकार्यक्षम वरिष्ठ
१५) व्यक्तिगत आणि व्यावसायिक वेळेचे वाटप करण्यात येणारे अपयश

हा मुद्दा पुन्हा ऐरणीवर येण्याचे कारण म्हणजे नुक्तीच ईवाय मधील ॲनाच्या संदर्भातील दुर्दैवी घटना जिने मनाचा तळ ढवळून टाकला आणि पुन्हा कार्यस्थळावरील मानसिक आरोग्य हा विषय ऐरणीवर आला. आणि त्याचे (अप) श्रेय संस्थेतील कार्यसंस्कृतीला दिले जात आहे. तसेही कोरोनाने आपले बरेच मानसिक खच्चीकरण केलंय आणि अजून बरीच वर्षे त्याचे दुष्परिणाम भोगावे लागणार आहेत असे संकेत मानसशास्त्रज्ञ देताहेत.

गेल्या दोन हजार वर्षांमध्ये ब्लॅक डेथ, स्पॅनिश फ्लूपासून स्वाईन फ्लू, इबोलापर्यंत अनेक साथीचे रोग जगभर पसरले होते. या साथीच्या रोगांनी समाजात फूट पाडली, युध्दांमधली निर्णायकता ठरवली, अनेक ठिकाणच्या जमाती नष्ट केल्या हे खरं. पण याच रोगांनी वैद्यकीय विश्वातल्या अनेक शोधांना चालना दिली. समकालीन अर्थव्यवस्थेत आणि राजकीय व्यवस्थेत बदल घडवले. माणसाच्या वागण्यात आणि समाजाच्या धारणांमध्ये लक्षणीय बदल घडवले. पण या साथीच्या रोगांच्या काळात आणि त्यानंतर माणसांमध्ये व्यक्तिगत आणि सामूहिक पातळीवर कसे बदल झाले यावर मानसशास्त्रात आणि मनोविकारांच्या दुनियेत फारसं संशोधन आजतागायत झालेलं नाही.

साथीच्या रोगांबाबत शारीरिक बाबतीत त्याचा फैलाव किती होईल यावर गणिती आक़डेमोड करुन अंदाज वर्तवता येतात. पण लोकांच्या मानसिक आरोग्यावर किती परिणाम होऊ शकतो याचं मोजमाप आणि प्रिडिक्शन करता येत नाही. त्यामुळे त्यावरच्या उपाययोजनांबद्दल ठोस असं काही सांगता येत नाही. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बऱ्याचशा संस्थांमध्ये अर्धवेळ समुपदेशक आणि मनोविज्ञान तज्ञ नेमले जाताहेत. कामाचे तास, साध्य करावयास किंचित अशक्य उद्दिष्ट्ये, व्यवसायाची आव्हाने, दैनंदिन प्रवास, जीवनाचा वाढलेला आणि नकळत कह्याबाहेर गेलेला वेग, जीवनशैली, नोकरी जाण्याचे आणि तदानुषंगिक अस्थिरतेचे भय अशा अनेक घटकांमुळे ताणतणाव वाढलेले आहेत गेल्या २५- ३० वर्षांमध्ये. यालाही कारणीभूत मानलं गेलंय- १९९१ नंतरचे भारतातील एल पी जी (उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण) धोरण. त्यामुळे आपल्या जीवनाचे दोन दृश्य भाग पडले आहेत. १९९१ पूर्वीचे आयुष्य आणि १९९१ नंतरचे आयुष्य! भारतामध्ये काम आणि ते काम करण्यासाठी लागणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या यांच्यात कायम असमतोल आढळतो. बेरोजगारीमुळे (त्याचेही प्राथमिक कारण म्हणजे लोकसंख्या) जे काम कमी माणसांमध्ये होऊ शकते, ते करायला जास्त माणसे वापरायची ही आपली परंपरा. १९९१ नंतर व्यवसायापुढची चार आव्हाने दिवसेंदिवस गडद आणि अधिक मागणी करणारी होताहेत- ग्राहक, स्पर्धा, तंत्रज्ञान आणि संबंधित सरकारी कायदे! हे सगळे बाह्य घटक झालेत, पण संस्थेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून असलेल्या मागण्या त्याच प्रमाणात वाढलेल्या आहेत. आणि त्यांची दिलेल्या वेळेत, स्वीकारलेल्या अटी शर्तींसह पूर्तता करणे कर्मचाऱ्यांसाठी आव्हानात्मक झालेले आहे. काम जास्त पण उत्पादकता कमी या सूत्रीमुळे सगळं गणित बिघडलंय. कामाच्या वाढीव तासांमुळे (आठवड्यात किमान ४९ तास ते कमाल ५६ तास) आयएलओची आकडेवारी म्हणते- २०१६ साली साधारण २ लक्ष व्यक्तींना आपले प्राण गमवावे लागले आणि २०२३ साली कामाच्या तणावामुळे आत्महत्या केलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या २५०० पर्यंत गेली. हे भयानक आहे कारण काम हे आपल्या रोजीरोटी साठी अपरिहार्य असले तरी ते आनंदाने समरसून करणे अभिप्रेत आहे. ॲनाप्रमाणे ते जीवन संपविण्यापर्यंत जात असेल तर मानसिक आरोग्याचा विचार अपरिहार्य ठरतो. कामाचे तास वाढले तरी त्याप्रमाणात उत्पादकतेत वाढ झालेली नाहीए. मग काय चुकते आहे, किंबहुना आपण काय बरोबर करत नाहीए हा प्रश्न सगळ्यांनी स्वतःला विचारायला हवा. खासगी उद्योगांनी १९९१ नंतर कमी माणसे नेमायची आणि त्यांना ज्यादा कामाचे पैसे देऊन प्रोत्साहीत करायचे असे चक्र सुरु केले. प्रथम याचे परिणाम चांगले वाटले, पण या संरचनेमध्ये कामाचे वाढलेले तास कर्मचारी आणि त्याची संस्था दोघांनीही गृहीत धरले. खरा गोंधळ इथे सुरु झाला. आता तर आठ तासांऐवजी बारा तासांची पाळी हे मानक हळूहळू सर्वदूर पसरले आहे आणि आर्थिक गरज भागविण्यासाठी, वाढत्या खर्चांना तोंड देण्यासाठी रोज जास्त वेळ काम करण्याची मानसिकता स्थिर होत गेली. खरं तर योग्य प्रणाली, योग्य तंत्रज्ञान आणि योग्य कार्यपद्धती असतील तर संस्थेत घालवावा लागणारा वेळ कमी व्हायला हवा. प्रत्यक्षात मात्र मोठ्या विभागांमध्ये प्रभावी काम होत नसते, कार्यक्षमता कमी असते. आता तर आरोग्याच्या विविध प्रकारांमध्ये अंकीय आरोग्य (डिजिटल हेल्थ) हा नवीन प्रकार समाविष्ट करण्यात आलाय.

कोरोना या संसर्गजन्य विषाणूमुळे झालेल्या वाताहतीत एक मोठ्ठा आणि अपरिवर्तनीय बदल झालाय जगण्यामध्ये- ऑनलाईन. या लाटेमध्ये क्षेत्रसंन्यास घेऊन (लॉक डाऊन) जबरदस्तीने घरी बसण्यामुळे खरेदी, शिक्षण, करमणूक, मीटिंग्ज, वर्क फ्रॉम होम या सगळ्या गोष्टी अंकीय (डिजिटल) युगात नेणाऱ्या ठरल्या. त्यामुळे कार्यालय आणि घर ही विभागणी पुसली आणि आपण घरातच एकट्यापुरतं कार्यालय थाटलं. परिणामस्वरूपी दिवसभर संगणकाच्या पडद्यासमोर आणि भ्रमणध्वनीवर बोलणे हेच कामाचे बदलेलं स्वरूप झालं. माणसे २४७ कामाची गुलाम झाली. खासगीपण घटले आणि अंकीय आरोग्याच्या व्याधी सुरु झाल्या. डोळे दुखणे, व्यायामा अभावी (हालचाली नसणे) शरीराची दुखणी, मनआरोग्य विचलित होईल असं वातावरणातील सातत्य हे तोटे आता जाणवताहेत.

**कार्यस्थळावरील मागण्या**

रोज संस्थेत काम करताना जर तणाव जाणवत असेल तर तो खालीलपैकी एका घटकांमुळे असू शकतो असे क्विक आणि हेंडरसन यांनी २०१६ साली नमूद केले.

**१) कामाचे स्वरूप** - नोकरीतील अनिश्चितता, अतिरिक्त काम

**२) भूमिकेच्या मागण्या** - पद, तदानुषंगिक जबाबदाऱ्या, अधिकार आणि उत्तरदायित्व

**३) शारीरिक कष्ट-** कार्यस्थळावरील तापमान, उजेड, श्रम आणि थकवा

**४) सहकारी आणि कामाचे वाटप-** कर्मचारी संख्या, नेतृत्व, मतभेद यासाठी व्यावसायिक दबाव, दडपण आणि आरोग्य (शारीरिक, मानसिक, भावनिक) यांच्यातील तीन नातेबंध समजून घ्यावे लागतात

**(१) प्राथमिक पातळी** - सक्रिय आणि प्रतिबंधात्मक उपाय: विवाद व्यवस्थापन, कर्मचारी हिताचे, स्वास्थ्याचे उपक्रम, व्याधीमुक्तीचे प्रशिक्षण

**(२) द्वितीय पातळी** - सक्रिय पण प्रतिक्रियावादी, जोखीम व्यवस्थापन, कामाची पुनर्रचना, क्षमतांचा पुरेपूर वापर, परिस्थितीशी जुळवून घेणे

**(३) तृतीय पातळी-** समुपदेशन, आकलन वर्तन (सीबीटी) उपचार

**कार्यस्थळावर ताणतणावांना दूर ठेवण्यासाठी काही व्यूहरचना आवश्यक असतात.**

**(१)** तणाव नियोजन: मेंदूमध्ये सतत मागण्या, माहिती यांची रेलचेल असते, या शर्यतीमुळे आपले कामावर लक्ष एकाग्र होत नाही, समस्यांचे निरसन नीट होत नाही आणि वेळेच्या, मुदतीच्या लक्ष्मणरेषांमुळे तणाव निर्माण होतात. **यासाठी अनेक मार्ग आहेत-**

**(अ)** कामाचे नियोजन, चालढकल, टाळाटाळ टाळणे
**(ब)** पुरेशी निद्रा (सायंकाळी अति- आहार आणि मद्यपान कसोशीने टाळणे)
**(क)** शारीरिक हालचाली, पुरेसा व्यायाम, सकारात्मक भावनांची निगराणी, कामाच्या जागेपासून थोडा वेळ लांब जाणे, शक्यतो निसर्गात वेळ घालविणे
**(ड)** स्वजनांबरोबर ठरवून वेळ घालविणे

**(२) कामाचे दडपण -**

**(अ)** कामाची गती मंद ठेवावी. ताण आला की आपण पॅनिक होतो.
**(ब)** आवडत्या छंदात/ कृतीत स्वतःला रमवावे
**(क)** चक्कर मारावी, आसपासचे पर्यावरण बदलावे.
**(ड)** निःसंकोच मदत मागावी.

**(३) ऊर्जा वापर -**

अवघड कामे, कामाचे वाढीव तास, मदतीचा अभाव यामुळे कामातून भावनिकदृष्ट्या आपण विलग होण्याची शक्यता असते आणि आपण यंत्रवत जबाबदाऱ्या पार पाडण्याच्या स्तरावर घसरतो. शीण आणि थकवा यांच्या जाणिवा टोकदार झाल्या की विश्रांतीची गरज वाढते. अशावेळी आवडत्या कामांमध्ये, मन ताजेतवाने होईल (संगीत, बागकाम, वाचन, व्यायाम) अशा कृतींमध्ये स्वतःला वाहून घेतले तर झालेला ऊर्जाक्षय सुधारतो. स्वतःच्या मर्यादा ताणण्याच्या नादात आपण स्वतःची मूलभूत काळजी घेणे दृष्टीआड करतो. आपल्या शारीरिक, भावनिक, मानसिक, आध्यत्मिक, बौद्धिक ऊर्जेचे परीक्षण (ऑडिट) नियमित केले तर तिचा क्षय कोठे आणि किती होतो याचा अदमास लागतो आणि त्यानुसार पावले टाकता येतात.

**शारीरिक ऊर्जा-**

✻ दिवसातील कोणत्या प्रहरात दमल्यासारखे वाटते, कामावर एकाग्र होण्यात अडचणी वाटतात हे नोंदवून ठेवणे. अशावेळी खुर्चीतून सरळ उठावे, मित्रांशी/ सहकाऱ्यांशी गप्पा माराव्यात, किंवा वेगळ्या गोष्टींमध्ये स्वतःला गुंतवून ठेवावे.

✻ काम करीत असताना त्यांत नियमित खंड पडेल असे ठरवून काम करावे, कामाचे नियोजन करावे. सलग काम करीत राहिल्यास थकवा जाणवतो आणि दमल्यासारखे होते.

✻ दिवसात मिताहार घेण्यावर भर द्यावा म्हणजे ऊर्जानियमन जमते.

**भावनिक ऊर्जा-**

✻ पोटातून श्वास घेतला तर नकारार्थी भावनांना हाताळता येतात, उदा. चिडचिड, चिंता, उतावीळपणा, अधीरता

✻ कृतज्ञता व्यक्त करावी आणि शक्यतो कोणाचेही कौतुक करण्याचा प्रयत्न करावा. त्याचवेळी स्वतःवरही करुणा दाखवावी.

✻ उलट्या भिंगातून समोरच्या व्यक्तीच्या दृष्टिकोनातून परिस्थितीचे आकलन करण्याचा अवश्य प्रयत्न करावा. दूरच्या चष्म्यातून आपण कोणत्याही घटनेकडे कशा नजरेने बघतो याचेही अध्ययन करावे. कायम मोठा कालपट नजरेसमोर आणावा, म्हणजे किरकोळ घटना त्रासदायक होत नाहीत.

---

**जगभरातील १०० कोटींहून अधिक, विशेषत: भारत, पाकिस्तान, अफगाणिस्तान, सेंट्रल आफ्रिकन रिपब्लिक, चाड आणि नायजेरिया अशा कमी विकसित देशांमध्ये राहणाऱ्या मुलांना हवामान बदलामुळे वाढत्या धोक्यांचा सामना करावा लागतो. त्यांना आधीच स्वच्छ पाण्याचा अभाव, शिक्षणाचा अभाव, आरोग्यसेवांची कमतरता अशा समस्यांचा सामना करावा लागतो. त्याचबरोबर आता या धोक्याचा सामना करावा लागत आहे.**

पर्यावरण
मिलिंद बेंडाळे

# १०० कोटी मुले हवामान बदलाच्या विळख्यात



'युनायटेड नेशन्स चिल्ड्रेन्स फंड' (युनिसेफ) ने नुकताच एक अहवाल प्रसिद्ध केला आहे. त्यात येत्या काही वर्षात मुलांसाठी पर्यावरणाच्या वाढत्या धोक्यांबद्दल गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. या अहवालानुसार, येत्या काही दशकांत म्हणजे २०५० सालापर्यंत मुलांना उष्णतेच्या लाटा, पूर आणि जंगलातील आगीसारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागणार आहे.

अहवालानुसार २०५० च्या पिढीला आताच्या तुलनेत जास्त उष्णतेचा सामना करावा लागू शकतो. अभ्यासानुसार, २०५० पर्यंत जगातील तापमान आताच्या जवळपास आठ पट वाढू शकते. याचा अर्थ असा आहे की, मुलांना अधिक तीव्र उष्णतेचा सामना करावा लागेल. याव्यतिरिक्त पुराचा धोका २००० च्या तुलनेत तिप्पट होऊ शकतो. त्यामुळे मुले त्यांच्या घरातून आणि शाळांमधून विस्थापित होऊ शकतात. 'युनिसेफ'च्या अहवालानुसार, येत्या काही वर्षांत उष्णतेमुळे जंगलात आग लागण्याचा धोका वाढणार असून २०५० पर्यंत हा धोका २००० च्या तुलनेत दुप्पट होऊ शकतो. त्यामुळे मुलांच्या जीवाला आणि मालमत्तेला धोका निर्माण होऊ शकतो. वातावरणातील बदलामुळे, वाढलेली उष्णता, पूर, दुष्काळ यामुळे मुलांच्या भवितव्यासाठी मोठी आव्हाने निर्माण होऊ शकतात. कारण हवामान बदलामुळे त्यांच्या आरोग्यावर, सुरक्षिततेवर आणि जीवनमानावर खोलवर परिणाम होऊ शकतो. 'युनिसेफ'च्या ताज्या अहवालात असे म्हटले आहे की, हवामान बदलाच्या धोक्याचा सामना करणाऱ्या या मुलांसाठी तातडीने आणि प्रभावी पावले उचलण्याची गरज आहे. ज्या देशांमध्ये मुलांना आधीपासूनच आवश्यक प्रमाणात प्रथिने मिळत नाहीत, त्या देशांमध्ये हवामान बदलांना तोंड देण्यासाठी एक योजना तयार करावी लागेल; जेणेकरून मुलांचे सुरक्षित आणि निरोगी भविष्य सुनिश्चित करता येईल. जगातील कोट्यवधी मुले या मोठ्या धोक्याच्या छायेखाली आहेत. हवामान बदलामुळे मोठा विध्वंस होऊ शकतो. जगात सध्या ३३ देश आहेत, जिथे येणारा काळ मुलांसाठी सर्वात धोकादायक असू शकतो. हवामान बदल आणि पर्यावरणीय समस्यांचा या देशांवर सर्वाधिक परिणाम होऊ शकतो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे जगातील हरितगृह वायूंच्या उत्सर्जनात यादीत समाविष्ट असलेल्या या देशांचे योगदान फारच कमी आहे. यादीत समाविष्ट असलेले हे ३३ देश, ज्यात भारताचाही समावेश आहे, ते मिळून केवळ ९ टक्के वायू उत्सर्जित करत आहेत. असे असूनही या देशांतील मुलांना उष्णतेच्या लाटा, पूर, दुष्काळ आणि इतर नैसर्गिक आपत्तींसारख्या वातावरणातील बदलांमुळे सर्वाधिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. या समस्येमध्ये सर्वात जास्त सहभाग असलेले देश सुमारे ७० टक्के वायू उत्सर्जनासाठी जबाबदार आहेत. यापैकी फक्त एका देशाला मुलांसाठी सर्वाधिक धोका असलेल्या देशांमध्ये स्थान देण्यात आले आहे. याचा अर्थ हवामान बदलामुळे या समस्येला फारसे जबाबदार नसलेल्या देशांतील मुलांचे सर्वाधिक नुकसान होत आहे. हवामान बदलाचे परिणाम अतिशय असमानपणे पसरत असल्याचे या परिस्थितीवरून दिसून येते. हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करणाऱ्या देशांच्या मुलांवर जास्त परिणाम होत आहे, तर जास्त उत्सर्जन करणाऱ्या देशांच्या मुलांवर हा परिणाम कमी आहे. 'चिल्ड्रेन क्लायमेट रिस्क इंडेक्स'नुसार, मध्य आफ्रिकन रिपब्लिकला ८.७ गुणांसह मुलांसाठी हवामान बदलाचा सर्वाधिक धोका असलेला देश म्हणून स्थान देण्यात आले आहे. यानंतर नायजेरिया आणि चाड ८.५ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहेत. भारत हा देश ७.४ गुणांसह २६ व्या स्थानावर आहे. याशिवाय भारताचे शेजारी देश म्हणजे पाकिस्तान, अफगाणिस्तान, बांगला देश या देशांमध्ये पाकिस्तान (७.७ गुण) आणि अफगाणिस्तान, बांगला देश, इथियोपिया ७.६ गुणांसह १४ व्या आणि १५ व्या स्थानावर आहेत. सर्वात सुरक्षित देश या निर्देशांकात, युरोपियन देश लिकटेंस्टिन हा मुलांसाठी २.२ गुणांसह हवामान बदलापासून सर्वात सुरक्षित देश मानला गेला आहे आणि हा देश या यादीत शेवटच्या स्थानावर आहे, म्हणजेच १५३ व्या क्रमांकावर आहे. युनिसेफ (युनायटेड नेशन्स इंटरनॅशनल चिल्ड्रन्स इमर्जन्सी फंड) ही एक आंतरराष्ट्रीय संस्था आहे, जी मुले आणि मातांच्या हक्कांचे आणि कल्याणाचे रक्षण करण्यासाठी कार्य करते. हा संयुक्त राष्ट्रांचा एक भाग आहे आणि १९४६ मध्ये जगभरातील मुलांना, विशेषतः दुसऱ्या महायुद्धानंतर भेडसावणाऱ्या समस्या लक्षात घेऊन त्याची स्थापना करण्यात आली. 'युनिसेफ'चे उद्दिष्ट जगातील मुलांचे जीवनमान सुधारण्याचे आहे. त्यांचे शिक्षण, आरोग्य, पोषण, सुरक्षा आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी ही संस्था काम करते. 'युनिसेफ' मुलांसाठी आरोग्य सेवा, लसीकरण, शुद्ध पाणी, पोषण आणि शिक्षण यासारख्या आवश्यक मूलभूत सेवा पुरवते. याव्यतिरिक्त ती हिंसा, शोषण आणि मुलांवरील भेदभाव दूर करण्यासाठीदेखील कार्य करते. संस्था विशेषतः अशा देशांमध्ये सक्रिय आहे, जिथे गरिबी, युद्ध किंवा इतर आपत्कालीन परिस्थितींचा मुलांच्या जीवनावर परिणाम होत आहे. युनिसेफ जगभरातील मुलांच्या हक्कांसाठी मोहीम राबवते आणि मुलांसाठी धोरणात्मक बदल आणि चांगल्या सेवा साध्य करण्यासाठी सरकार आणि इतर संस्थांसोबत काम करते. जगातील सर्वात लहान बेट राष्ट्र असलेल्या नाउरूमध्ये हरितगृह वायूंचे उत्सर्जन अत्यंत कमी आहे. हा देश आकाराने लहान आहे आणि लोकसंख्या खूपच कमी आहे. त्यामुळे त्याचे एकूण उत्सर्जन खूप कमी आहे. तुवालु या देशात हरितगृह वायू उत्सर्जन खूप कमी आहे. तुवालूचे मुख्य कारण म्हणजे त्याचा लहान आकार आणि मर्यादित औद्योगिकीकरण. भूतानमध्ये हरितगृह वायूंचे उत्सर्जन खूपच कमी आहे. याचे कारण अधिक जंगले आणि वनक्षेत्रे आहेत. ती कार्बन डाय ऑक्साईड शोषून घेतात. माली हा पश्चिम आफ्रिकेतील एक अतिशय कमी औद्योगिकीकरण असलेला देश. तिथे हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी आहे. क्युबाचे हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी आहे. वातावरणातील बदलामुळे मुलांना पूर, उष्णतेची लाट, दुष्काळ अशा आपत्तींचा धोका वाढतोच; पण त्यांच्या आहारातील पोषक घटकही कमी होत आहेत. 'द स्टेट ऑफ द वर्ल्ड्स चिल्ड्रन'च्या अहवालानुसार, हवामान-संबंधित आपत्ती, लोकसंख्येतील बदल आणि तंत्रज्ञानाच्य प्रवेशातील असमानता ही आव्हाने आहेत. त्यामुळे २०५० पर्यंत मुलांच्या जीवनात नाट्यमय बदल घडतील तसेच मोठ्या समस्या निर्माण होऊ शकतात.

जागतिक स्तरावर ज्या प्रकारे तापमान वाढत आहे, ते भविष्यात मोठा धोका दर्शवत आहे. २०२३ हे हवामान इतिहासातील आतापर्यंतचे सर्वात उष्ण वर्ष होते. यंदा जागतिक तापमानातील वाढ दीड अंश सेल्सिअसची लक्ष्मणरेषा ओलांडण्याची शक्यताही वर्तविली जात आहे. अशा परिस्थितीत, हवामानाच्या वाढत्या धोक्यांचा परिणाम इतर लोकांपेक्षा लहान मुलांवर अधिक गंभीर होण्याची भीती या अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. अतिउष्णतेचा सामना करावा लागणाऱ्या मुलांच्या संख्येत सर्वात मोठी वाढ पूर्व आणि दक्षिण आशिया तसेच पॅसिफिक, मध्य पूर्व, उत्तर, पश्चिम आणि मध्य आफ्रिका या देशांमध्ये होऊ शकते, असे अहवालात म्हटले आहे. पुरामुळे पूर्व आफ्रिका आणि पॅसिफिक प्रदेशातील मुलांना सर्वात जास्त फटका बसण्याची शक्यता आहे. या संदर्भात 'युनिसेफ'च्या कार्यकारी संचालक कॅथरीन रसेल यांनी म्हटले आहे की, मुलांना हवामान आपत्तींपासून ते ऑनलाईन धोक्यांपर्यंत विविध प्रकारच्या आव्हानांचा सामना करावा लागत आहे. हे धोके काळाच्या ओघात अधिक गंभीर होतील. हवामान बदल आणि बालविवाह अशा दुहेरी संकटाचा सामना करणाऱ्या मुली अजूनही योजनांपासून वंचित आहेत. त्यांच्या मते, २०५० मध्ये चांगले भविष्य घडविण्यासाठी कल्पनेपेक्षा जास्त प्रयत्न करावे लागतील.

या अहवालात लोकसंख्येमध्ये होणाऱ्या नाट्यमय बदलांवरही प्रकाश टाकण्यात आला आहे. यानुसार पुढील २६ वर्षांत उप-सहारा आफ्रिका आणि दक्षिण आशियामध्ये मुलांची लोकसंख्या सर्वाधिक असेल; मात्र त्याचवेळी वृद्धांची संख्याही वाढत आहे. असा अंदाज आहे की, जगातील प्रत्येक प्रदेशातील लोकसंख्येतील मुलांचा वाटा कमी होऊ शकतो. आफ्रिकेत मुलांची संख्या सर्वाधिक असूनही त्यांची लोकसंख्या ४० टक्क्यांच्या खाली पोहोचू शकते. याचप्रमाणे पूर्व आशियामध्ये जिथे हा वाटा २००० मध्ये २९ टक्के होता, तो १७ टक्क्यांच्या खाली जाईल. पश्चिम युरोपातही असेच काहीसे पाहायला मिळेल. या बदलांमुळे जगासमोर नवी आव्हानेही निर्माण होतील. जेथे काही देशांमध्ये लहान मुलांसाठी सेवा विस्तारित करण्याचा ओढा वाढेल. त्याच वेळी काही देश वृद्ध लोकांच्या वाढत्या गरजा पूर्ण करण्यासाठी संघर्ष करीत असतील. बदलत्या जगात मुलांच्या विकासाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. मुले उद्याचा पाया आहेत. त्यांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी पावले उचलली नाहीत, तर त्यांचे भवितव्य टांगणीला लागेल. (लेखक अभ्यासक आहेत.)




विशेष

तेजस परब



# भारत 'एआय' क्षेत्रातील भरारीसाठी सज्ज

**'कृत्रिम बुद्धिमत्ता' अर्थात 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'बद्दल अजूनही दोन मतप्रवाह आढळून देतात. एक 'एआय'ला वरदान मानणारा, तर दुसरा नोकरी-उद्योगधंद्यांसाठी 'एआय'ला शाप मानणारा. पण, शेवटी वास्तव हेच की, आगामी युग हे 'एआय'चे असेल. भारतानेही अत्यंत वेगाने 'एआय' तंत्रज्ञान आत्मसात करुन भरारी घेतली आहे. त्याचे आकलन...**



कृत्रिम बुद्धिमत्ता (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) म्हणजेच 'एआय' नोकऱ्या खाणार का? 'एआय'मुळे बेरोजगारी ओढावणार, अशी आवई आजही उठवली जाते. मात्र, हे खोटे ठरवत भविष्यात हे तंत्रज्ञान भरपूर संधी निर्माण करणार आहे. भारत हा भविष्यात जनरेटिव्ह 'एआय'च्या क्षेत्रात मोठी भूमिका निभावणार आहे, असा विश्वास नुकताच 'अमेझॉन वेब सर्व्हिस'चे भारतातील बिझनेस पार्टनर हेड, प्रवीण श्रीधर यांनी व्यक्त केला.

भारतातीत ६ कोटी, ५० लाख उद्योगांचे भविष्य 'एआय'मुळे बदलणार आहे, असेही ते म्हणाले. तशी क्षमता भारताकडे असून, भविष्यात हा बदल निश्चित दिसेल. केवळ देशांतर्गतच नव्हे, तर जगाच्या अर्थव्यवस्थेसाठीही योगदान असेल.

'एआय'चा वापर आता केवळ व्हिडिओ आणि फोटोनिर्मितीसाठी मर्यादित राहणार नसून तो शिक्षण, आरोग्य आणि बँकिंगसह इतर महत्त्वाच्या क्षेत्रातही केला जाईल. संगणकयुगाची जेव्हा सुरुवात झाली, त्यावेळीही नोकऱ्यांवर कुऱ्हाड येईल, हजारो बेरोजगार होतील, अशी आवई उठवण्यात आली होती. कालसुसंगत राहणार्यांसाठी संगणकाचे स्वागत करणे भाग होते. मात्र, ज्यांनी ते केले नाही, त्यांच्या नोकऱ्या आपसूकच गेल्या. मात्र, ज्यांनी संगणकाशी मैत्री केली, तत्संबंधीचा अभ्यासक्रम पूर्ण केला, त्यांच्यासाठी अगदी परदेशातही कुशल मनुष्यबळासाठी 'रेड कार्पेट' अंथरण्यात आले.

भारतात इंटरनेट सर्वसामान्यांच्या आवाक्यात आल्यानंतर देश डिजिटलायझेशनकडे वळला. इथवरचा इतिहास आपण पाहिला. मात्र, आता वेळ आली आहे, ती एक पाऊल आणखी पुढे टाकण्याची. 'एआय' आणि 'मशिन लर्निंग' आणि 'डेटा सायन्स' आणि 'एआय' हे अभ्यासक्रम आता विविध विद्यापीठ आणि संस्थांमार्फत शिकवण्यासही बरेच ठिकाणी सुरुवात झाली आहे. भारताची तरुण देश म्हणून याची गणना केली जाते. या तरुणांनी गरज आहे ते या मिळणार्या संधीचे अधिकाधिक सोने करण्याची.

जसा अपप्रचार इतर कुठल्याही क्षेत्राबद्दल केला जातो, तसा तो शिक्षण क्षेत्राबद्दलही हमखास केला जातो. मात्र, शिक्षण क्षेत्रात 'एआय'च्या वापरामुळे मोठा क्रांतिकारी बदल घडणार आहे. 'एआय'कडे आव्हान म्हणून पाहणार्या शिक्षण व्यवस्थेलाच शिक्षणात मूलभूत बदल घडवून आणण्याची गरज भासणार असल्याचे मत शिक्षणतज्ज्ञांचे आहे. अनेक शिक्षकांच्या तक्रारी याच असतात की, काही विद्यार्थ्यांनी त्यांचा संपूर्ण शालेय प्रकल्प हा मुळात 'चॅट-जीपीटी'सारख्या 'जनरेटिव्ह एआय'द्वारे बनवला. यापूर्वी अशाच तक्रारी गुगल आणि अन्य सर्च इंजिनबद्दल केल्या जात होत्या. दुसरी बाजू म्हणजे, विद्यार्थ्यांनी किमान त्याचा वापर करण्याचा प्रयत्न तरी केला, असा असायला हवा. अशा गोष्टी ओळखण्यासाठीही वेगवेगळी टूल्स उपलब्ध आहेतच, हा भागही वेगळा.

'एआय'चा वापर करून अनेक उद्योजकांनी आपल्या स्वतःची स्टार्टअप्सही सुरू केली. दैनंदिन व्यवहारात लागणाऱ्या ई-मेल्स, फोटो एडिट, व्हिडिओ एडिट्ससह अन्य प्रकारच्या सर्वच गोष्टी सोप्या झाल्या आहेत. वृत्तपत्रांतही आता 'एआय'वर आधारित फोटो सर्रास प्रकाशित केले जातात. पण, मग त्यामुळे छायाचित्रकारांच्या नोकऱ्या गेल्या का? तर नाही. उलट 'एआय'वर काम करणार्या व्यक्तीलाही वृत्तपत्रांसह, चॅनलमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. हाच बदल आगामी दहा वर्षांत पाहायला मिळणार आहे.

भारतातील कित्येक छोटेखानी उद्योगही हळूहळू हे तंत्रज्ञान आत्मसात करू लागतील. ग्राफिक डिझायनरपासून ते कोडिंगपर्यंत 'एआय'चे जग व्यापले आहे.

आज इंटरनेट हा सर्वसामान्य व्यक्तीच्या आयुष्यातील अविभाज्य भाग बनला, तसा तो 'एआय'ही बनणार आहे. सुरुवातीला काही व्हिडिओ क्रिएटर किंवा डिजिटल आशयनिर्मिती करणार्यांपासून टेक्नोसेव्हींनी याचा वापर केला. मात्र, भविष्यात प्रत्येकजण याचा भाग असेल. या संधीचे सोने कसे करता येईल आणि त्याला कल्पकतेची जोड कशी देता येईल, याचा विचार आता सृजनशील वापरकर्त्यांवर आहेच. शिवाय, तो उद्यमींनाही करायचा आहे. याचा प्रत्यय नेहमी सोशल मीडियाद्वारे येतच असतो. 'एआय'च्या वापराद्वारे बनवलेला सिनेमा असो, गाणी असो वा रिल्सचा महापूर आहे.

याला जे व्यावसायिक जोड देतील आणि त्याचे मार्केटिंग जमेल, त्यांनाच हा खेळ खेळता येईल. ज्याप्रकारे संगणकयुग अवतरल्यानंतर हॅकर्सना रोखण्यासाठी एक मोठी व्यवस्था उभी राहिली, त्याचप्रकारे 'एआय'साठीही मोठी शासकीय आणि खासगी क्षेत्रात अर्थव्यवस्था उभी राहील, हेही तितकेच खरे.

साहजिकच हे दुधारी शस्त्र म्हणूनच काम करणारे आहे. याचेच एक गमतीशीर उदाहरण म्हणजे नुकताच व्हायरल झालेला एक व्हिडिओ. शांघायच्या शोरूममध्ये एका छोट्याशा रोबोटने तब्बल १२ रोबोटना किडनॅप केल्याचा दावा या व्हिडिओत करण्यात आला होता. कंपनीनेही ही चूक मान्य केली आणि याबद्दल सुधारणा सुरू असल्याचेही सांगितले. अशा अनेक गमतीदार गोष्टीही येत्या काळात पाहायला मिळतील. पण, 'एआय'चे विश्वही भारतामुळे अधिक समृद्ध होईल, हा विश्वासही पुढच्या वाटचालीसाठी आशादायक आहे



## उंच मला नेशील का?

पंख जर पसरले मी तर बळ
त्यात भरशील का?
देवा एकदातरी
उंच मला असे नेशील का?

हात दिला तुझ्या हाती पावलांना
रस्ता माझ्या दाखवशिल का?
ध्यास माझा श्वास माझा तूच रे एकदा तरी
उंच मला नेशील का?

स्वप्नात माझ्या येऊन
साद मला देशील का?
देवा एकदा तरी
उंच मला नेशील का?

आकाशाच्या कॅनव्हास वर
रंग मला भरू देशील का?
देवा एकदा तरी
उंच मला नेशील का?

संध्या मोहिते

## सांज रंग........

सांज रंगांनी भरले
आकाश सारे सारे !
हळूहळू डोकाऊ लागले
आकाशातील तारे...

सुंदर देखण्या रंगांनी
आकाशी काढली नक्षी !
काळोख होणार म्हणून
घरट्याकडे निघाले पक्षी..

आकाशाचे सांजरंग बघून
कुतूहल वाटते आपल्याला !
सारेच होतात आवाक
एवढे देखणे रूप त्याला..

सांजरंगांचा हा खेळ
असतो काही क्षणांचा !
भरपूर आनंद देतो
असा साज सांजरंगांचा...

अनिल दाभाडे

क्रिडा

श्रीशा वागळे

# जगज्जेता!

**वयाच्या सातव्या वर्षी त्याने एक स्वप्न पाहिले... बुद्धिबळाचा जगज्जेता होण्याचे. आणि वयाच्या अठराव्या वर्षी त्याने ते स्वप्न साकार केले. फक्त साकारच केले नाही तर तो बुद्धिबळाच्या इतिहासातला सर्वात तरुण जगज्जेता ठरला. भारताच्या डोमाराजू गुकेशने जागतिक अजिंक्यपद बुद्धिबळ लढतीत चीनच्या डिंग लिरेनला पराभूत करून बुद्धिबळाच्या पटावरचा एक नवा अध्याय लिहिला.**



भारत हा बुद्धिबळाचा जन्मदाता आणि याच भारतभूमीच्या सुपुत्राने बुद्धिबळाचा सर्वांत युवा जगज्जेता होण्याचा मान पटकावणे ही तमाम भारतवासीयांसाठी अभिमानास्पद बाब आहे. भारताचे बुद्धिबळातले आशास्थान असणाऱ्या डोमाराजू गुकेशने ही अलौकिक अशी कामगिरी करून दाखवली आहे. सिंगापूर येथे पार पडलेल्या जागतिक बुद्धिबळ लढतीत गुकेशने गतविजेत्या डिंग लिरेनवर १४ व्या डावात ५८ चालींमध्ये विजय मिळवला. ही लढत ७.५-६.५ अशी जिंकत त्याने जगज्जेतेपद पटकावले. वयाच्या अवघ्या अठराव्या वर्षी त्याने ही कामगिरी करून दाखवली.

सिंगापूरच्या भूमीवर ही जगज्जेतेपदाची लढत सुरू झाल्यानंतर साऱ्या बुद्धिबळजगताचे लक्ष त्याकडे लागून राहिले होते. डिंग लिरेन आपले जगज्जेतेपद राखणार की युवा डी. गुकेश त्याची मक्तदारी मोडून काढणार याबाबतची उत्सुकता शिगेला पोहोचली होती. अखेर गुकेशने संयमी खेळाचे दर्शन घडवत बाजी मारली. गुकेश हा विश्वनाथन् आनंदनंतरचा दुसराच भारतीय जगज्जेता. त्यामुळे त्याच्या या विजयाला एक वेगळेच कोंदण आहे. २५ नोव्हेंबरला जगज्जेतेपदाची ही लढत सुरू झाली. लिरेन आणि गुकेशमध्ये तब्बल सतरा दिवस जगज्जेतेपदासाठीचा लढा सुरू होता. गुकेशने या काळात संयम, विजिगीषुवृत्ती, एकाग्रता यांचे प्रभावी दर्शन घडवले. आपले चित्त कधीही विचलित होऊ दिले नाही. पहिल्या डावात पराभूत झाल्यानंतरही त्याने आत्मविश्वास ढळू दिला नाही. तेराव्या डावात गुकेश आणि लिरेन यांनी ६.५-६.५ गुण मिळवत बरोबरी गाठली होती. त्यानंतर चौदाव्या डावात लिरेनने केलेल्या चुकीचा लाभ उठवत गुकेशने जगज्जेतेपदाचे स्वप्न साकार केले.

या संपूर्ण डावात गुकेशने आक्रमक आणि आत्मविश्वासपूर्ण खेळ केला. त्याने कोणतेही दडपण घेतले नाही. दुसरीकडे लिरेन टायब्रेकरवर अतिविसंबून राहिल्याचे दिसून आले. त्याची मानसिक तंदुरुस्तीही काहीशी ढासळलेली होती. त्याने या लढतीत बचावात्मक पवित्र्यावर अधिक भर दिला होता. मात्र गुकेशकडे लिरेनच्या प्रत्येक चालीची उत्तरे होती. ती त्याने दिली आणि लिरेनला चेकमेट केले. विजय समोर दिसू लागताच गुकेशच्या डोळ्यात आनंदाश्रू तरळले. विजेतेपदानंतर त्याने वडिलांना मिठी मारून अश्रूंना वाट मोकळी करून दिली.

गुकेशने जगज्जेतेपदाचे स्वप्न पाहिले होते. मात्र त्याच्यासह संपूर्ण भारत हे स्वप्न जगला, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. बुद्धिबळ म्हटले की आपल्यासमोर विश्वनाथन् आनंदचे नाव येते. आनंदने भारतीय बुद्धिबळाला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले होते. २०१२ मध्ये आनंदने शेवटचे जगज्जेतेपद पटकावले. त्यानंतर तब्बल बारा वर्षांनी एका भारतीयाने हे जगज्जेतेपद पटकावले आहे. विश्वनाथन् आनंदनंतर कोण याचे उत्तर गुकेशने आपल्या प्रभावी खेळाने देऊन टाकले आहे. येत्या काळात गुकेश हा विश्वनाथन् आनंदचा वारसा चालवणार आहे. भारताच्या शिरपेचात अनेक तुरे खोवले जाणार आहेत.

गुकेशने आज जगज्जेतेपद पटकावले असले तरी त्याचा इथपर्यंतचा प्रवास संघर्षपूर्ण राहिला आहे. ७ मे २००६ रोजी चेन्नईमध्ये जन्मलेल्या गुकेशने वयाच्या सातव्या वर्षापासूनच बुद्धिबळ खेळायला सुरुवात केली. सुरुवातीच्या काळात त्याने भास्कर नेगैय्या यांच्याकडून प्रशिक्षण घेतले. त्यानंतर त्याला खुद्द विश्वनाथन् आनंदचे मार्गदर्शन लाभले. गुकेशचे वडील डॉक्टर तर आई मायक्रोबायोलॉजिस्ट, पण गुकेशचे मन बुद्धिबळातच रमले. आई-वडिलांनीच गुकेशच्या गुणवत्तेला प्रोत्साहन दिले. मुलाने बुद्धिबळात नाव कमवावे यासाठी त्यांनीही अथक प्रयत्न केले. घरात शैक्षणिक वातावरण असूनही आई-वडिलांनी गुकेशला शिक्षणातून सूट दिली. चौथीनंतर तो नियमितपणे शाळेत जात नसे. त्याने आपले सगळे लक्ष फक्त आणि फक्त बुद्धिबळावर केंद्रित केले. बुद्धिबळ हाच त्याचा ध्यास आणि श्वास बनला.

गुकेश बुद्धिबळाच्या पटलावरील एक एक चाली शिकत गेला. व्यावसायिक बुद्धिबळ खेळू लागल्यानंतर गुकेशने शाळेची वार्षिक परीक्षाच दिली नाही. मात्र बुद्धिबळाची परीक्षा तो उत्तम गुणांनी उत्तीर्ण होत राहिला. मुलाला बुद्धिबळ स्पर्धांसाठी देश-विदेशात नेण्याची जबाबदारी वडिलांनी घेतली. त्यामुळे त्यांना काही काळ दवाखाना बंद करावा लागला. तेव्हा घरखर्च चालवण्याची जबाबदारी आईने स्वीकारली. मात्र त्यांनीही हार मानली नाही. सुरुवातीच्या काळात प्रायोजकांअभावी गुकेशला परदेश दौऱ्यांदरम्यान आर्थिक अडचणींचा सामना करावा लागला. परदेशातल्या स्पर्धांमध्ये भाग घेण्यासाठी त्याच्या आई-वडिलांना अनेकदा कर्जही घ्यावे लागले. मात्रा आता जगज्जेतेपद पटकावत त्याने परिश्रमाचे आणि आई-वडिलांच्या त्यागाचे चीज केले आहे. युवा गुकेशने बुद्धिबळजगतात अनेक कारनामे केले आहेत. लहान वयापासूनच तो आपल्या गुणवत्तेची, प्रतिभेची चुणूक दाखवत आला आहे. २०१५ मध्ये वयाच्या नवव्या वर्षी त्याने नऊ वर्षांखालील मुलांची आशियाई शालेय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धा जिंकली. २०१७ मध्ये वयाच्या अकराव्या वर्षी तो आंतरराष्ट्रीय मास्टर बनला. २०१८ मध्ये बारा वर्षांखालील विभागात त्याने जागतिक युवा अजिंक्यपद स्पर्धा जिंकली. २०१९ मध्ये त्याने ग्रँडमास्टर किताब पटकावला. यावेळी त्याचे वय होते फक्त १२ वर्षे, ७ महिने आणि १७ दिवस. तो बुद्धिबळ जगतातला दुसरा युवा ग्रँडमास्टर बनला. एप्रिल २०२४ मध्ये वयाच्या सतराव्या वर्षी त्याने फिडे कँडिडेट्स बुद्धिबळ स्पर्धा जिंकली. अशी कामगिरी करणारा तो सर्वांत युवा बुद्धिबळपटू ठरला. गुकेश सातत्याने बुद्धिबळात एक एक पायरी चढत होता. अनेक विक्रम रचत होता. वरिष्ठ पातळीवरही गुकेशने स्वत:ला सिद्ध केले.

२०२१ मध्ये त्याने ज्युलियन बेयर चॅलेंजर्स बुद्धिबळ गेलफँड चॅलेंज जिंकले. यात त्याने १९ पैकी १४ गुण मिळवले. २०२२ मध्ये एमचेस रॅपिड स्पर्धेत त्याने मॅग्नस कार्लसनला पराभूत केले होते. कार्लसन जगज्जेता झाल्यानंतर त्याला पराभूत करणारा गुकेश हा सर्वांत कमी वयाचा खेळाडू होता. २०२३ मध्ये बुद्धिबळाच्या आंतरराष्ट्रीय गुणतालिकेत २७५० गुण मिळवणारा गुकेश हा सर्वांत युवा खेळाडू ठरला होता. याच वर्षी भारतीय बुद्धिबळपटूंच्या पहिल्या दहा खेळाडूंच्या यादीत विश्वनाथन् आनंदला मागे टाकले होते. ३७ वर्षांमध्ये पहिल्यांदाच विश्वनाथन् आनंद पहिल्या दहा खेळाडूंच्या यादीतून बाहेर गेला होता. गुकेशने यंदा चमकदार कामगिरी केली. त्याने फिडे कँडिडेट्स बुद्धिबळ स्पर्धा तर जिंकलीच शिवाय सप्टेंबर महिन्यात त्याच्या सहभागात हंगेरीत झालेल्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमध्ये भारतीय संघाने सुवर्णपदक जिंकले होते. गुकेशने वैयक्तिक सुवर्णपदक जिंकत जगज्जेतेपदाची आपली दावेदारी अधिक बळकट केली होती. ऑलिम्पियाडमधल्या दहापैकी आठ सामन्यांमध्ये गुकेशने विजय मिळवला होता तर त्याचे दोन सामने बरोबरीत सुटले होते. त्याच्या अनेक चालींना प्रतिस्पर्ध्याकडे उत्तर नव्हते. या युवा बुद्धिबळपटूने स्पर्धेच्या दहाव्या फेरीमध्ये अमेरिकेच्या तिसऱ्या मानांकित फॅबिआनो कारुआनाचा पराभव केला होता. या कामगिरीमुळे गुकेशच्या जगज्जेतेपद मिळवण्याच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. गुकेश जगज्जेता होणार याची खात्री त्याच्या चाहत्यांना वाटू लागली होती. गुकेशनेही चाहत्यांचा विश्वास ढळू दिला नाही आणि जगज्जेतेपद पटकावून आपण 'लंबी रेस का घोडा' असल्याचे दाखवून दिले. विश्वनाथन् आनंदने पाच वेळा बुद्धिबळाचे जगज्जेतेपद पटकावले आहे. डी. गुकेशचे जगज्जेतेपद ही फक्त एक सुरुवात आहे. गुकेश अठराव्या वर्षी बुद्धिबळाचा अठरावा जगज्जेता ठरला आहे. हा खरे तर एक योगायोगच म्हणावा लागेल.

वयाच्या अवघ्या अठराव्या वर्षी जगज्जेतेपद पटकावून गुकेशने गॅरी कास्पोरोव्हचा विक्रम मोडला आहे. कास्पारोव्हने १९८५ मध्ये वयाच्या बाविसाव्या वर्षी हे यश मिळवले होते. गुकेश त्याच्यापेक्षा चार वर्षांनी लहान आहे. गॅरी कास्पारोव्हचा विक्रम कोणी मोडू शकेल, असे वाटले नसेल. मात्र भारताच्या गुकेशने तो मोडला. वयाच्या बाविसाव्या वर्षापर्यंत तो अजून बरेच काही साध्य करू शकतो. गुकेशला या वयापर्यंत अजून दोन जगज्जेतेपदाच्या लढती खेळायला मिळण्याची शक्यता आहे. गेली दहा ते बारा वर्षे नॉर्वेच्या मॅग्नस कार्लसनने बुद्धिबळ जगतावर अधिराज्य गाजवले. आता गुकेशची पाळी आहे. त्याने कमी वयात मोठे यश मिळवले आहे. त्याच्याकडे अजून बरीच वर्षे आहेत. गुकेश दृढनिश्चयी आहे. त्यामुळे येत्या काळात तो बुद्धिबळाचा अनभिषिक्त सम्राट ठरणार का, हे पाहणे उत्सुकतेचे ठरणार आहे. गुकेशने मिळवलेल्या या यशाबद्दल त्याचे करावे तेवढे कौतुक कमीच आहे.